# घटक -१

# (१ अ)

# भारतातील चालू शैक्षणिक पद्धती

# अ) औपचारिक शिक्षणाची कार्ये

**घटकाचे स्वरुप**

१ अ ०) उद्दिष्ट्ये

१ अ १) औपचारिक शिक्षण

१ अ २) औपचारिक शिक्षणाची कार्ये

१ अ ३) सारांश

## १ अ ०) उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टी तुम्ही करु शकाल.

- औपचारिक शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.
- औपचारिक शिक्षणाची कार्ये सांगा.

## १ अ १) औपचारिक शिक्षण

नियोजनबद्ध साचेबद्ध रचनाविषयक शिक्षण म्हणजेच औपचारिक शिक्षण होय.

कार्टर व्ही. गुड यांच्या मतानुसार, ''औपचारिक शिक्षण हे एक अशा प्रकारचे प्रशिक्षण किंवा शिक्षण आहे की ज्यामध्ये रुढी परंपरा, शिस्तबद्धता, तर्कशुद्धता, पूर्णनियोजित आणि पद्धतशीर पद्धती यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

According to Dr. Philip coombs, "Formal education as one which is given through formal institutions like school, college or university."

शाळा ही एक औपचारिक शिक्षण संस्था आहे. शाळा ही समाजाच्या शैक्षणिक गरजेतून निर्माण झाली आहे. कारण शिक्षण देण्यासाठीच तिची निर्मिती करण्यात आलेली आहे. शाळेत अभ्यासक्रम वेळापत्रक, अध्यापनपद्धती, शिक्षक इ. सर्व घटकांची सहेतूक योजना आखलेली असते त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभलेले असते. बदलत्या परिस्थितीनुसार जर जीवनविषयक गरजा व शैक्षणिक गरजा यामध्ये बदल झाला तर त्या गरजानुसार तिच्या कार्यातही वेळोवेळी बदल व सुधारणा करण्यात येतात. शाळा ही फक्त विद्यार्थ्यासाठीच असते व विद्यार्थी शाळेत केवळ शिकण्यासाठीच जातात.

## १ अ २)    औपचारिक शिक्षणाची कार्ये

शाळा हे औपचारिक शिक्षणाचे मुलभूत केंद्र आहे. शाळा हे असे ठिकाण आहे ज्याठिकाणी संस्कृती व संस्कृतीचा विकास होता, विद्यार्थ्याना चांगले नागरिक घडविते आणि त्यांच्या शारीरिक, सामाजिक व्यावसायिक नैतिक गरजा पूर्ण करते सर्व  प्रकारचे प्रशिक्षण शाळा पुरविते. शाळेचे शैक्षणिक कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

**१) बहुउद्देशीय शिक्षण**

आजची शिक्षण प्रणाली ही बहुउद्देशीय शिक्षण प्रणाली असून त्यामध्ये ळें याचा समावेश होता उदा. Redding (वाचन), Writing (वाचन) Arithmatic (संख्याशात्र), Recreation (करमणूक), Rights हक्क Responsibilities (जबाबदाऱ्या) आणि Relations (नातेसंबंध)

**२) लोकशाहीसाठी प्रशिक्षण:**

लोकशाहीयुक्त अनुभव पुरवुन लोकशाही समाजासाठी मुलांना घडविण्याचे (तयार करण्याचे) कार्य शाळा करते.

**३) संस्कृतीची जोपासना:**

शाळा ही अशी महत्त्वाची संस्था आहे ज्यामध्ये नैतिक मूल्य, रूढी परंपरा, आणि विविध प्रकारच्या सामाजिक पद्धती विद्यार्थ्यापर्यंत पोचविते.

**४) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास:**

विद्यार्थ्यांना माहितीचे उपयोजन करण्यासाठी त्यांच्याात चिकित्सक वृत्ती निर्माण करण्यासाठी व एकाद्या गोष्टींचे पृथ्थ:करण करण्यासाठी शाळा प्रशिक्षण देते.

**५) समाजसुधारक संघटना:**

बदलत्या परिस्थितीनुसार सामाजीक संस्कृतीमध्ये बदल करण्यासाठी शाळा मदत करतात.

**६) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध संधी :**

आजची शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धती आहे. शाळा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या तीन अंगाचा सर्वागीण  विकस करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देते. जसे. आकलनक्षमता, परिणामकारकता, व मानसिकता.

**७) नैतिक मूल्याचा विकास:**

नम्रता, सत्य, मोठ्यांचा आदर, आज्ञापालन, दुसऱ्यांना मदत करणे इ. नैतिक मूल्यांचा विकास शाळेत होतो.

**८) व्यावसायिक शिक्षण पुरविणे :**

शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसायविषयक मार्गदर्शन पुरविले जाते.

**९) उत्पादनशिलतेसाठी (कार्यक्षमता) शाळा हे ठिकाण :**

प्रायोगिक कृती जसे SUPW, कार्यानुभव, NSS इ. च्या माध्यमातून शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक कौशल्याचा विकास होतो.

**१०) समाजोपयोगी गुणांचा विकास**

शाळेमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे. खेळ, स्पर्धा समाजोपयोगी प्रकल्पांना भेटी देणे इ. जेणेकरुन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक गुणांचा विकास होतो व तसेच सहकार्य, समंजसपणा, सुव्यवस्था इ. गुणांचा विकास होतो.

**११) आंतरराष्ट्रीय सांमजस्याचा विकास**

आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणजे मानवी हक्काचा आदर व प्रतिष्ठा, शांततामय वातावरण, एकमेकांना सहकार्य करण्याची भावना इ. गुणांचा विकास होय. विद्यार्थ्यांमध्ये अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सामजस्यांशी संबंधीत मुलांचा विकास करण्यासाठी शाळा महत्त्वाची भूमिका बजावते.

**१२) राष्ट्रीय सण व उत्सव**

राष्ट्रीय सण व उत्सव साजरे करुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे कार्य शाळा करते.

## १ अ ३) सारांश

- औपचारिक शिक्षण - रचनात्मक शिक्षण
- औपचारिक शिक्षणाची कार्ये
- बहुउद्देशीय शिक्षण
- लोकशाहीसाठी प्रशिक्षण
- संस्कृतीची जोपासना/संवर्धन
- वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास.

**तुमची प्रगती तपासा - १**

१) औपचारिक शिक्षणाची कार्ये स्पष्ट करा.

◆ ◆ ◆

**(१ ब)**

# भारतातील चालू शैक्षणिक पद्धती- ब

## ब) शिक्षणाचे घटक - विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था.

**घटकाचे स्वरुप**

१ ब. ० उद्दिष्ट्ये

१ ब. १ प्रस्तावना

१ ब. २ शिक्षणाचे घटक

१ ब. २.१ विद्यार्थी

१ ब. २.२ शिक्षक

१ ब. २.३ अभ्यासक्रम

१ ब. २.४ शैक्षणिक संस्था

१ ब ३ शिक्षणातील घटकांचा परस्पर संबंध

१ ब ४ सारांश

## १ ब. ० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही खालील गोष्ट साध्य करु शकता.

- शिक्षणाच्या विविध घटकांविषयी माहिती मिळविणे जसे. विद्यार्थी, शिक्षण, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था.
- शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या भूमिकेविषयी चर्चा करणे.
- शिक्षणाच्या प्रक्रियेमधील अभ्यासकाची भूमिका स्पष्ट करणे.
- शिक्षण प्रक्रियेमध्ये शैक्षणिक संस्थेचे महत्त्व स्पष्ट करणे.
- शिक्षणामधील एकमेकांवर अवलंबून असणारे घटक स्पष्ट करणे.

## १ ब. १ प्रस्तावना

शिक्षण ही जीवनभर चालणारी अखंडीत अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची बाल्यावस्था व परिपक्वता (पूर्ण वाढ ) यांचा विकास होतो. यामध्ये मानवी व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणाऱ्या प्रत्येक बाबींचा समावेश होतो. या घटकामध्ये आपल्याला शिक्षणविषयक घटक कोणते आहेत व ते परस्परांवर कशा प्रकारे अवलंबून आहेत याची चर्चा

किंवा अभ्यास करावयाचा आहे.

शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे जी शिक्षणविषयक कोणतेही उद्दिष्ट या घटकाशिवाय पूर्ण करु शकत नाही. शिक्षणात्मक प्रक्रियेमध्ये स्वतंत्र अशा विविध घटकांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करता येते.

**शिक्षणात्मक प्रक्रिया**

| Why to Educate ? | Whom to educate? | Who is to educate | where to educate |
|---|---|---|---|
| (कशासाठी शिक्षण) | (कोणासाठी शिक्षण) | (शिक्षण कोण देणार ?) | (कोठे शिक्षण देणार ?) |
| उद्दिष्टे | मुले/विद्यार्थी | शिक्षक | शाळा |

| What to educate | How to educate |
|---|---|
| (शिक्षणामध्ये काय शिकविणार ?) | (कशा प्रकारे शिक्षण देणार ?) |
| अभ्यासक्रम | अध्यापन पद्धती |

## १ ब. २ शिक्षणाचे घटक

या पाठामध्ये आपण शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वाचे घटक कोणते आहेत ? हे अभ्यासणार आहोत.

शिक्षण ही सतत बदलत जाणारी (लवचीक) व प्रेरक अशी प्रक्रिया आहे. शिक्षण ही प्रक्रिया शिक्षक व विद्यार्थी या दोन स्तंभानी बनलेली आहे. याच्याविना शिक्षण ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. जॉन ड्युई यांच्या मते, ''शिक्षणामध्ये तीन स्तंभ पद्धती आहे. ज्यामध्ये त्यांनी फक्त शिक्षक व विद्यार्थी यांनाच महत्त्व दिले नसून अभ्यासक्रम हा शिक्षणाचा तिसरा स्तंभ आहे.'' एवढेच नसून आधुनिक शिक्षणपद्धतीमध्ये स्वयं-अध्ययनाला जास्त महत्त्व दिले म्हणूनच शिक्षण ही शाळेची मक्तेदारी नाही, शाळेशिवाय शिक्षण देणाऱ्या औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणसंस्था आहेत. म्हणून आधुनिक शिक्षणपद्धती ही बहुस्तंभीय शिक्षण पद्धती आहे. या पाठामध्ये आपण शिक्षणपद्धतीमध्ये हे घटक कशाप्रकारे कार्य करतात आणि ते एकमेकांवर कसे अवलंबून आहेत हे पाहणार आहोत.

### १ ब. २.१ विद्यार्थी:

जन्माला येणारे प्रत्येक मूल हे अपरिपक्व असते. चांगले जीवन जगण्यासाठी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन दिले जाते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे ही शिक्षणाची व्याप्ती आहे. यामध्ये आकलन, मूल्यमापन (परिणाम) या मुद्यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. प्राचीन शिक्षण पद्धतीमध्ये गुरुंना (शिक्षक) महत्त्व दिले जात असे. पण सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी हा महत्त्वाचा केंद्रबिंदू बनला असल्यामुळे आजची शिक्षणपद्धती विद्यार्थी केंद्री असल्यामुळे त्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या क्षमतेनुसार व आवडीनुसार शिक्षण दिले जाते. अभ्यासक्रमाची

रचनासुद्धा त्यानुसारच केली पाहिजे. सर्व शैक्षणिक संस्थानी विद्यार्थ्यांच्या मागण्या व गरजांची पूर्तता केली पाहिजे.

## १ ब. २.२ शिक्षक

वर्गखोल्यांमध्ये राष्ट्रांच्या स्वप्नांना आकार दिला जातो असे म्हटले जाते व शिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षकाने आपल्या भूमिकेबद्दल खूप जागरुक राहिले पाहिजे व ती जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी तो समर्थ असला पाहिजे. शिक्षकाचे वागणे व त्यांचे व्यक्तिमत्त्व चांगला नागरिक म्हणून वैशिष्ट्यपूर्ण असले पाहिजे. शिक्षकाने स्वातंत्र्य, एकात्मता, व्यक्तिप्रतिष्ठा, हक्क आणि कर्तव्य इ. संकल्पना आत्मसात केल्या पाहिजेत व त्या आमलात आणून नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य शिक्षकाने केले पाहिजे.

विद्यार्थी कोणत्या समाजातून आलेला आहे. त्या समाजाच्या गरजांचा अभ्यास करुन शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला पाहिजे. शिक्षकानी चर्चा सत्र (सेमीनार), वर्कशॉप (कार्यशाळा), रिफेशर कोर्स यांच्याद्वारे आपले ज्ञान नेहमी अद्ययावत ठेवले पाहिजे.

पारंपारिक पद्धतीमध्ये शिक्षकाचे कार्ये हे साचेबद्ध व यांत्रिक पद्धतीचे होते. पण विद्यार्थीकेंद्री शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांची भूमिका पूर्णपणे बदललेली आहे म्हणूनच शिक्षकांनी मानसशास्त्रात पारंगत असले पाहिजे. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या क्षमता, त्यांची आवड ओळखून त्यांना शिक्षण दिले पाहिजे. शिक्षक बुद्धीमान व कौशल्यपूर्ण असला पाहिजे. ज्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवू शकेल आणि त्यांना योग्य मार्गाने मार्गदर्शन करु शकेल. शिक्षकांचे चारित्र्य (स्वभाव) शाळेचा व देशाचा स्तर उंचावण्यास मदत करते. शिक्षक हे शाळा व जग यांच्यात विचारांच्या देवाणघेवाणीचे काम करतात.

**प्रगती तपासा**

**प्र.१ गाळलेल्या जागा भरा**

१ ------ हा विद्यार्थ्यीकेंद्री शिक्षणपद्धतीमध्ये केंद्रस्थानी आहे.

२. राष्ट्रांच्या स्वप्नांना आकार ----- मध्ये दिला जातो.

३. ------ हे शाळा व जग यांच्यात विचाराच्या देवाणघेवाणीचे काम करतात.

**प्र. २ टिपा लिहा**

१) विद्यार्थ्यीकेंद्री शिक्षण

___

___

___

___

२) आधुनिक समाजामध्ये शिक्षकाची भूमिका

३) विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील परस्पर संबंध

## १ ब २.३ अभ्यासक्रम

शिक्षण प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रम हा महत्त्वाचा घटक आहे.शिक्षण हे उत्पादन असून अभ्यासक्रम त्याचे नियोजन आहे. अभ्यासक्रमाचा एकमेव हेतू म्हणजे विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीमध्ये योग्य तो बदल घडवून आणणे.

विद्यार्थ्यांचा विकास व वाढ हे त्या विशिष्ट अभ्यासक्रमाचे फलित होय. (विशेषतः विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवड आणि सुप्तशक्तीमधील बदल होय.)

म्हणूनच अभ्यासक्रम हा विद्यार्थी तसेच समाजाच्या समस्या, गरजा व सामाजिक परिस्थीती (स्थिती) यावर आारित असावा. अभ्यासक्रमामुळे योग्य वातावरण निर्मिती झाली पाहिजे.

## १ ब २.४ शैक्षणिक संस्था

शिक्षण प्रक्रियतील चौथा व महत्त्वाचा घटक म्हणजे शैक्षणिक संस्था होय. विद्यार्थ्याच्या (मुलाच्या) शिक्षणाची जबाबदारी ही राज्य आणि समाज या दोघांवरही अवलंबून असते. लोकशाही राष्ट्रांमध्ये जरी संपूर्ण जबाबदारी ही समाजाची असून ते त्या परीने शैक्षणिक संस्थांमार्फत शिक्षण प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करते.

कुटुंब, शाळा आणि राज्य हे समाजाचे विविध घटक आहेत. आणि या सर्वांचा मुलावर परिणाम होत असतो. कुटुंब, शाळा आणि राज्य हे शैक्षणिक संघटनांमध्ये विभागलेले आहेत. ते खालीलप्रमाणे -

१) औपचारिक

२) अनौपचारिक

३) न औपचारिक

औपचारिक शिक्षण शाळा किंवा महाविद्यालयां मार्फत दिले जाते. शिक्षणाचे व्यवस्थित व अत्यंत काळजीपूर्वक नियोजन करुन शाळा व महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. सर्व शाळा, कॉलेज, विद्यापीठे यांचे शिक्षण नियोजित अभ्यासक्रम व प्रशिक्षित शिक्षकांमार्फत दिले जाते.

जे शिक्षण सहजही मिळत नाही व औपचारिकही मिळत नाही त्याला अनौपचारिक शिक्षण म्हणतात. अनौपचारिक शिक्षणाला वयाची, काळाची, पूर्वीच्या शिक्षणाची कोणतीही पूर्व अट नसते. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार कोणते विषय शिकवायचे, काय शिकवायचे हे निश्चित केले जाते. कालमर्यादेतच ते पूर्ण केले पाहिजे असे बंधन नसते.

**प्रगती तपासा - २**

१) 'अभ्यासक्रम हे नियोजन असून शिक्षण हे त्यांचे फलित (उत्पादन) आहे.' स्पष्ट करा.

२) शैक्षणिक संस्था कोणत्या आहेत ? शैक्षणिक संस्थेतील शिक्षण पद्धती स्पष्ट करा.

## १ ब ३ शिक्षणातील घटकांचा परस्परसंबंध

परस्परसंबंध म्हणजे एकमेकांवर अवलंबून राहणे म्हणूनच यापाठात आपण प्रत्येक शैक्षणिक घटक एकमेकांवर कसा अवलंबून आहे हे पाहणार आहोत.

शिक्षण प्रक्रियेमधील विविध घटक म्हणजे विद्यार्थी शिक्षक, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था हे आहेत.

विद्यार्थ्यांचे शिक्षण असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्याला असे समजते की विद्यार्थ्यांना शिक्षण दिले पाहिजे. पण प्रश्न असा उदभवतो की, विद्यार्थ्यांना शिक्षण देणार कोण? तर त्याचे उत्तर येईल शिक्षक. त्याचबरोबर दुसरा प्रश्न असा उद्भवतो की, शिक्षक विद्यार्थ्यांना काय शिकविणार? तर त्याचे उत्तर मिळेल अभ्यासक्रम. पण तरीही आपण समाधानी नाही. कारण विद्यार्थ्यांना शिक्षण कोठे दिले जावे ? अशा प्रकारचा नवीन प्रश्न आपल्यासमोर उभा टाकतो? तेव्हा याचे उत्तर 'शाळा' असे येते. यावरुनच आपल्याला असे समजते की, सर्व घटक परस्परांवर अवलंबून आहेत. एखाद्या घटकाच्या अभावी शिक्षणप्रक्रिया पूर्ण होऊ शकणार नाही.

शिक्षणामुळेचे विद्यार्थ्यांचा स्वभाव आणि त्यांच्या सुप्त गुणांचा विकास होतो. या प्रक्रियेमध्ये शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव थेट विद्यार्थ्यांवर होत असतो. ज्यामध्ये नियोजित शैक्षणिक अनुभवाद्वारे विद्यार्थ्यांचा विकास केला जातो. म्हणूनच विद्यार्थ्यांनी समाजात मिसळण्यासाठी विविध उपक्रमात सहभागी झाले पाहिजे. अशाप्रकारे प्रत्येक घटक एकमेकांवर अवलंबून असतात.




**प्रगती तपासा - ३**

१) शिक्षणाचे घटक एकमेकांवर कसे अवलंबून आहेत ते स्पष्ट करा.

## १ ब ४ सारांश

- शिक्षणाचे घटक
- विविध घटक आणि त्यांचे शिक्षणप्रक्रियेमधील भूमिका
- विद्यार्थीकेंद्री शिक्षण पद्धती
- शिक्षक एक मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार त्यांच्यात बदल घडवून आणण्याचे साधन तंत्र म्हणून विशद केले आहे.
- अभ्यासक्रमाची भूमिका
- शैक्षणिक संस्थांची भूमिका
- एक औपचारिक संघटना जी नियोजीत अभ्यासक्रम आणि प्रशिक्षित शिक्षकामार्फत शिक्षण दिले जाते.
- शिक्षण घटकांचा परस्परसंबंध.

## स्वाध्याय

१) शिक्षण म्हणजे काय? शिक्षणाचे विविध घटक स्पष्ट करा.

२) शिक्षणाचे विविध घटक स्पष्ट करुन शिक्षणप्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचे स्थान काय आहे ते स्पष्ट करा.

३) 'शिक्षण ही बहुउद्देशीय (बहुस्तंभीय) प्रक्रिया आहे.' स्पष्ट करा.

४) तुमच्या मते शिक्षणाचा महत्त्वाचा घटक कोणता? का?

५) टिपा लिहा.

   १) विद्यार्थीकेंद्री शिक्षण

   २) द्विस्तंभीय शिक्षण प्रक्रिया

   ३) अभ्यासक्रमाचे महत्त्व

   ४) शैक्षणिक संस्थाची भूमिका

   ५) विद्यार्थी आणि शिक्षण यांच्यातील संबंध.

♦ ♦ ♦

# घटक - २
# शिक्षणाची समान रूपे
# अनौपचारिक आणि न-औपचारिक

**घटकाचे स्वरुप**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ अनौपचारिक शिक्षण

२.३ न-औपचारिक शिक्षण

२. ४ सारांश

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही खालील गोष्ट साध्य करू शकता.

- अनौपचारिक शिक्षणाविषयी ज्ञान मिळविणे.
- न-औपचारिक शिक्षणाविषयी ज्ञान मिळविणे.

## २.१ प्रस्तावना

शिक्षण ही लोकांमधील एकप्रकारची गुंतवणूक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या क्षमता किंवा सामर्थ्य ओळखून त्यांचे संगोपन करून त्या वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

शिक्षण हे बहुउद्देशीय, बहुप्रसारमाध्यम व बहुस्त्रोत यांनी बनलेले असून त्याचा समावेश मुक्त अध्ययन पद्धतीमध्ये करण्यात आला आहे.

घटक-१ मध्ये आपण औपचारिक शिक्षणविषयक माहिती पाहिली. या घटकात आपण अनौपचारिक शिक्षण व न-औपचारिक शिक्षण या विषयी माहिती अभ्यासणार आहोत.

## २. २ अनौपचारिक शिक्षण

फिलिप कोंबस **(Philip Combs)** आणि मनसूर अहमद **(Mansoor Ahmad)** यांनी प्रथम अनौपचारिक शिक्षणाची संकल्पना मांडली. ज्याद्वारे व्यक्ती ज्ञान संपादन करतो. कौशल्याचा विकास करतो त्याचबरोबर मूल्यांची जोपासना करतो.

अनौपचारिक शिक्षण ही एक अशी अध्ययन प्रक्रिया आहे जी कामाच्या ठिकाणी, खेळाच्या ठिकाणी, किंवा प्रवासामध्येही घेता येते. या शिक्षणपद्धतीला औपचारिकता नसते. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. आणि तिला विशिष्ट असे स्वरूप नसते.

## २.३ न - औपचारिक शिक्षण

न-औपचारिक शिक्षण पद्धती वैकल्पिक(पर्यायी) स्वरूपाची शिक्षणपद्धती आहे. ज्यामध्ये व्यक्तिसमूहाला शिक्षणाच्या संधी पुरविल्या जातात. या शिक्षण पद्धतीमध्ये अशा लोकांना शिक्षण दिले जाते जे लोक शिक्षणापासून वंचित आहेत आणि जे औपचारिक शिक्षणाला पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत.

न-औपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- नियोजित उद्दिष्ट्ये आणि विविध कार्यक्रम
- अध्ययनकर्ता, जीवन आणि वातावरणामध्ये लवचिता
- माध्यमांमध्ये विविधता.
- अध्ययनकर्त्यांचा सहभाग.
- स्थानिक संसाधनाची गतीशिलता
- यामध्ये हुकुमशाही पद्धती नाही
- याला पूर्वशिक्षणाची आवश्यकता नाही.
- वयोमर्यादेची आवश्यकता नाही.

## २.४ सारांश

शिक्षणाचे तीन प्रकार आहेत - औपचारिक, अनौपचारिक, व न-औपचारिक

१) औपचारिक - रचनात्मक शिक्षणपद्धती

२) अनौपचारिक - प्रासंगिक शिक्षणपद्धती

३) न-औपचारिक- या शिक्षणपद्धतीमध्ये लवचिकता व मोकळेपणा (स्पष्टपणा) आहे.

**प्रगती तपासा**

**टिपा लिहा**

१) न-औपचारिक शिक्षण

२) अनौपचारिक शिक्षण

◆ ◆ ◆

**३ अ)**

# घटक - ३
# ३ अ) कुटुंब या संस्थेची शिक्षणातील भूमिका

**घटकाचे स्वरुप**

३ अ. ०) उद्दिष्टे
३ अ. १) प्रस्तावना
३ अ. २) कुटुंब - एक अनौपचारिक शिक्षण संस्था
३ अ. ३) कुटुंबाचे स्वरुप /रचना
३ अ. ४) परिणामकारक घटक
३ अ. ४.१) आईवडिलांचा परिणाम
३ अ. ४.२) जमावांचा (मित्रगटाचा) परिणाम.
३ अ. ४.३) बाहेरच्या संस्कृतीचा परिणाम.
३ अ. ५) कुटुंब आणि शाळा यामधील संबंध
३ अ. ६) सारांश
३ अ. ७) चर्चेसाठी मुद्दे

## ३ अ. ०) उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर, तुम्ही खालील गोष्टी साध्य कराल.

- कुटुंबाच्या संकल्पनेविषयी (अर्थ) माहिती मिळविणे.
- कुटुंब एक अनौपचारिक शिक्षणसंस्था आहे. स्पष्ट करणे.
- प्राथमिक गट, सामाजिक संस्था, व सामाजिक व्यवस्था म्हणून कुटुंबाविषयी माहिती घेणे.
- मुलांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये कुटुंबाची परिणामकारकता स्पष्ट करणे.
- कुटुंब आणि शाळा यामधील संबंध स्पष्ट करणे.

## ३ अ. १) प्रस्तावना

शैक्षणिक संघटना म्हणजेच शैक्षणिक संस्था ज्या शिक्षणप्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध शिक्षण तज्ज्ञांनी यांची विभागणी पुढील तीन घटकांमध्ये केलेली आहे.

१) औपचारिक शिक्षण संघटना.

२) अनौपचारिक शिक्षण संघटना.

३) न - औपचारिक शिक्षण संघटना.

सर्वप्रथम आपण अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा अभ्यास करु. उदा. कुंटुंब.

**अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा अर्थ -**

ज्या शैक्षाणिक संघटना समाज आणि शैक्षणिक गरजा भागविण्याचे कार्य करतात. त्यांना अनौपचारिक शिक्षण संस्था असे म्हणतात. उदा. कुटुंब, म्युझियम, दुरदर्शन, प्रेस इत्यादि.

या घटकामध्ये आपण कुटुंब एक शिक्षण संस्था या विषयी चर्चा करणार आहोत.

कुटुंब हे सर्वात प्राचीन व खूप महत्त्वाची अनौपचारिक शिक्षण पद्धतीचे उदाहरण आहे. कुटुंबाच्या माध्यमातून मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक पैलूवर परिणाम होतो. अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत.

## ३ अ. २) कुटुंब - एक अनौपचारिक शिक्षणपद्धती

कुटुंब हे एक अशा व्यक्तिचा समूह आहे ज्यामध्ये प्रेम, सहकार्य, सदभावना, सहानभुती आणि मित्रता इ. गुण आढळतात.

क्लेअरच्या मते, 'कुटुंब ही एक अशा प्रकारची शैक्षणिक पद्धती आहे ज्यामध्ये पालक आणि त्यांच्या पाल्यासोबत असणारा संबंध होय.'

आई ही मुलांची पहिली आणि आदर्श शिक्षिका असते. भारतीय साहित्यामध्येसुद्धा आईला पहिल्या शिक्षकाचा दर्जा देण्यात आलेला आहे. थोडक्यात आपण असे म्हणू शकतो की, कुटुंब म्हणजे एकमेकांशी संवाद साधण्याऱ्या लोकांचा समुह ज्यामध्ये प्रत्येकाला आपली भूमिका सादर करावी लागते.

खालील भूमिकेवरुन असे म्हणता येईल की कुटुंब ही एक अनौपचारिक शिक्षणपद्धती आहे. जी मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, चारित्र्य, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि त्यांच्या सर्वांगसुदर व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्यास मदत करते.

### १) शारीरिक विकास:

शारीरिक विकास हे कुटुंबाचे एक महत्त्वाचे कार्य आहे. मुलांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक व योग्य अशा संधी कुटुंब उपलब्ध करुन देते. उदा. पौष्टीक आहार, कपडे, विश्रांती, झोप, खेळ, शारीरिक व्यायाम, औषधे इत्यादि.

### २) बौद्धिक विकास:

मुलाच्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक व पुरेशा संधी उपलब्ध करुन देणे हे कुटुंबाचे दुसरे महत्त्वाचे कार्य आहे. उदा. भाषेचा विकास, विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची निर्माण करणे. जर मुलाला बौद्धिक वातावरण चांगले मिळाले तर मुलांचा मानसिक विकास जास्त होतो.

**३) चारित्र्य विकास:**

कुंटुंबातील वातावरण चांगले असेल तर मुलांच्या स्वभावात चांगले गुण समाविष्ट होतात. त्यातूनच चांगल्या सवयी, मोठ्यांचा आदर, नैतिक मूल्य इत्यादिचा विकास कुटुंबातूनच होतो. याचाच परिणाम म्हणजे त्या विशिष्ट मुलाच्या चारित्र्याला चांगले वळण लागते.

**४) भावनिक विकास:**

भावनिक सुरक्षितता, पालकांचे सहानुभूतीपूर्वक वागणे, प्रेम, दया, इत्यादी गोष्टी मुलाच्या भावनिक समस्या सोडविण्यास मदत करतात. मुलांच्या भावी व आनंदी जीवनासाठी भावनिक स्थैर्य मदत करते.

**५) सामाजिक विकास:**

कुटुंबाला सामाजिक सद्वर्तन व मूल्यांचे उगमस्थान म्हटले जाते. कुटुंबात मुल जन्माला आल्यापासूनच त्याच्या सामाजिक विकासाला सुरुवात होते. कसे बोलायचे ? कसे खायचे ? कपडे कसे घालावयाचे, दुसऱ्यांना आदरपुर्वक कसे बोलायचे ?इतरांना सहकार्य कसे करावे ? दुसऱ्यासोबत जुळवुन घेणे अशाप्रकारच्या अनेक गोष्टी मुल कुटुंबातूनच शिकतो आणि त्यामुळेच या सामाजिक गुणांचा फायदा त्याला शाळेत आणि समाजात जुळवून घेण्यास मदत होते.

**६) सांस्कृतिक विकास :**

समाजाचा सांस्कृतिक वारसा मुलांपर्यंत पोहोचवण्यात कुटुंब महत्त्वाची भूमिका बजावते. कुटुंबातूनच समाजाच्या रुढी, परंपरा, मूल्य इत्यादिची मुलांना माहिती होते.

**७) धार्मिक आणि अध्यात्मिक विकास :**

धार्मिक नेत्यांची, देवदेवतांची कथा किंवा त्याचा इतिहास सांगून मुलांना कुटुंबामध्ये धार्मिक अनुभव दिले जातात.

**८) आर्थिक कार्ये:**

ज्या मुलांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय करायचा असतो. अशांना त्यांच्या कुटुंबातूनच व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते त्यामुळे त्यांचा आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होते.

**९) नागरी कार्ये :**

विविध नागरी मूल्यांची शिकवण कुटुंबातूनच दिली जाते. कुटुंब हा असा घटक आहे जो व्यक्तिंना त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखून कर्तव्य पार पाडण्यास मदत करते.

अशा प्रकारे आपण असे म्हणू शकतो की, मुलाचा सर्वांगीण विकासासाठी कुटुंब महत्त्वाची भूमिका बजावते. यामध्ये शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अशा सर्व पैलूंचा विकास होतो.

## ३ अ. ३) कुटुंबाचे स्वरुप/रचना

खालील तीन प्रकारचे कुटुंब स्वरुप स्पष्ट करता येईल.

### १) कुटुंब - एक प्राथमिक घटक

कुटुंब हे एक प्राथमिक संघाचे उदाहरण आहे ज्यामध्ये खूप कमी संख्येने लोक एकत्र राहतात. या प्राथमिक घटकात स्वतःच्या आवडीनिवडी आणि दर्जाकडे जास्त लक्ष दिले जाते.

### २) कुटुंब एक सामाजिक संस्था

कुटुंब ही सर्वात जुनी आणि मुलभूत सामाजिक संस्था आहे. कारण त्यापासूनच विविध सामाजिक संस्था निर्माण होतात. कुटुंबातून मुलांमध्ये सामाजिक मूल्ये आणि गुणांचा विकास होतो. जसे सहकार्य, एकमेकांशी जुळवून घेणे, समजूतदारपणा आणि मोठ्याविषयी आदर बाळगणे इत्यादी.

### ३) कुटुंब - एक समाजपद्धती/ सामाजिक प्रणाली

समाजपद्धती ही एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर विचारांची देवाण-घेवाण, समान आवडी-निवडी, उद्देश आणि कृती यामधून निर्माण होते. म्हणूनच कुटुंब ही एक समाजपद्धती /सामाजिक प्रणाली आहे. ज्यामध्ये सदस्यसंख्या कमी असते पण बऱ्याचशा सामाजिक गुणांना प्रोत्साहन दिले जाते. म्हणून खालील वृक्षालेखातून आपण कुटुंबाचे स्वरुप दाखवू शकतो.

**कुटुंब**

प्राथमिक संघ | सामाजिक संस्था | समाजपद्धती

## ३ अ. ४) परिणामकारक घटक

या मध्ये आपण व्यक्तिमत्वावर परिणाम करणारे मूल्यांचे घटक यावर चर्चा करणार आहोत.

### ३ अ. ४.१) आईवडिलांचा परिणाम:

मुलांचे पहिले आदर्श हे त्यांचे आईवडील असतात. व लहान वयातच मुले आपल्या आईवडीलाची नक्कल करत असतात. विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये जास्तीत जास्त मुले आईवडीलांचीच नक्कल करतात. विभक्त कुटुंबात पालकांचा परिणाम जास्त प्रमाणात असतो आणि एकत्रित कुटुंबपद्धतीमध्ये मुले आपल्या मोठ्या भावांच्या किंवा बहीणीच्या प्रभावाखाली असतात. व ते त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. पालकांचे वागणे मुलाच्या व्यक्तीमत्वावर परिणाम घडवून आणते. त्यासाठी आईवडीलांनी आपल्या मुलांसमोर योग्य रितीने वागले पाहिजे जेणेंकरुन त्यांच्यामध्ये चांगल्या गुणांचा विकास होईल.

### ३ अ. ४.२) सहकाऱ्यांचा /मित्रगटाचा) परिणाम:

मुलांवर आईवडीलाप्रमाणेच त्यांच्या मित्रांचाही खूप प्रभाव असतो. आणि त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. मित्रगटाचा त्या मुलावर खूप परिणाम होतो. जर एखाद्या मुलाला चांगल्या मित्रांची संगत असेल तर त्या मुलांमध्ये चांगलेच गुण विकसित होतात. आणि जर वाईट मुलांची एखाद्या मुलांला संगती असेल तर नक्कीच त्याच्यामध्ये वाईट गुण विकसित होतात.

म्हणूनच आपले मुल कोणाच्या संगतीत आहे हे वेळोवेळी कुटुंबाने आणि कुटुंबातील व्यक्तिने पाहिले पाहिजे.

### ३ अ. ४.३) बाह्य संस्कृतीचा परिणाम. (पाश्चिमात्य संस्कृतीचा परिणाम):

प्रसारमाध्यम हा एक असा बाह्य घटक आहे जो मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम घडवून आणतो. उदा. दूरदर्शन, रेडिओ, वर्तमानपत्र, मासिके इत्यादी. ही सर्व प्रसारमाध्यमे आपण राहत असलेल्या समाजाच्या संस्कृतीवर परिणाम घडवून आणतात. पूर्वीपासूनच आपल्या मनावर मुद्रण कलेचा, छपाई यंत्राचा परिणाम झालेला आहे. जसे. कॉमीक्स बुकचे वाचन, मासिकाचे वाचन इत्यादि.

दुरदर्शन आणि चित्रपटाद्वारे सांस्कृतिक मूल्यांची देवाणघेवाण होते आणि मुले दूरदर्शनमधील कलाकाराची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. मूल त्यांच्या केस रचना, कपडे घालण्याच्या पद्धती, त्यांचे बोलणे, वागणे इत्यादीची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच पालकांनी दक्ष असायला हवे. आपले मूल कोणत्याप्रकारचे चित्रपट पाहतात तसेच ते कितीवेळा पाहतात त्याची खबरदारी पालकांनी घेतली पाहिजे. मूले वाईट मार्गाचा अवलंब करीत असतील तर त्यांना योग्य ते मार्गदर्शन पालकांनीच योग्यवेळी केले पाहिजे.

म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की कुटुंबातील सदस्य नेहमी दक्ष असले पाहिजेत आणि वेळोवेळा मुलांना मार्गदर्शन केले पाहिजे जेणेकरुन मुलांच्या वर्तनात बदल होईल.

### ३ अ. ५) कुटुंब आणि शाळा यांच्यातील परस्परसंबंध:

शाळा ही औपचारिक शिक्षण संघटना आहे. या शैक्षणिक संस्थेला खूप महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. पण शाळा कुटुंबाच्या सहकार्याशिवाय आपले कार्य व्यवस्थितपणे पार पाडू शकत नाही. उदा. मूल फक्त ५ ते ६ तास शाळेमध्ये घालवते. पण बाकीचा सर्व वेळ तो आपल्या कुटुंबियासोबत घालवतो.

शाळा आणि कुटुंब एकमेकांच्या सहकार्यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधू शकतात आणि म्हणूनच शाळा आणि कुटुंब या दोघांनीही मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एकमेकांना सहकार्य करायला हवे.

शाळा आणि कुटुंब या दोघांमधील संबंध खूप घनिष्ठ आणि तीव्र असा आहे. या दोघांतील परस्परसंबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट होतील.

### १) मुलांना शाळेसाठी सक्षम बनविणे:

मुलांना शाळेसाठी सक्षम बनविण्यात कुटुंब खूप महत्त्वाची भूमिका बजावते. मुलाचे संप्रेषण, कौशल्याची तयारी तो शाळेत येण्यापूर्वीच कुटुंबाकडून करुन घेतली जाते.

### २) परंपरा आत्मसात करणे:

मुलांना परंपरा व मूल्ये आत्मसात करण्यासाठी 'शिक्षण' मदत करते. पण फक्त शाळा हे कार्य पूर्ण करु शकत नाही. त्यासाठी त्यामध्ये समाजाचा (कुटुंबाचा) सहभाग असणे आवश्यक आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना आणि समाजपद्धती मूल्यापर्यंत पोहचविण्याचे काम शाळा करते.

### ३) चारित्र प्रशिक्षण:

विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविण्यात शाळा महत्त्वाची भूमिका बजावते. जसे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना बऱ्याच वाईट सवयी असतात. उदा. खोटे बोलणे, चोरी करणे इत्यादी. म्हणूनच विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुता, परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी इत्यादी गुण मुलांमध्ये रुजविणे हा शाळेचा महत्त्वाचा उद्देश असतो.

### ४) कुटुंबाबद्दल कृतज्ञता, प्रेम आणि आदर या भावनांचा विकास:

कौटुंबिक जीवनामध्ये प्रेम आणि आदर या महत्त्वाच्या गरजा आहेत. जर कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम आणि आदराची भावना नसेल तर त्याचा परिणाम त्या कुटुंबातील लहान मुलांच्या व्यक्तिमत्वावर होतो. म्हणूनच अशा कुटुंबातील मुलांमध्ये शाळेमधून कुटुंबाबद्दल प्रेम आणि आदर या भावनांचा विकास करणे गरजेचे आहे.

### ५) निर्मितीक्षम आणि विधायक भूमिका:

टिकात्मक विचारसरणी, तर्कशुद्ध विचार, स्पष्टपणा इत्यादी गुणांचा विकास शिक्षणामुळे होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना तुलनात्मक अभ्यास करुन कोणत्या गोष्टीचा स्विकार करावा हे ठरविता येते. जेणेकरुन स्वतःचा, आपल्या कुटुंबाचा तसेच समाजाला हितकारक अशा गोष्टींचा अवलंब करतात.

### ६) समाज जीवनासाठी प्रशिक्षण:

समाज (कुटुंब आणि शाळा विद्यार्थ्यांना त्याचे सामाजिक जीवन जगण्यासाठी प्रशिक्षण देतात. N.C.C., N.S.S., समाजसेवा, खेळ इत्यादी उपक्रम शाळेच्या माध्यमातून राबवून आज्ञाधारकता, सहकार्य, प्रामाणिकपणा, शिस्त इ. गुणांचा विकास करु शकतात. त्याचप्रमाणे विविध सण, प्रार्थना याद्वारे कुटुंबांच्या माध्यमातून विविध गुणांचा विकास करु शकतात.

### ७) व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास:

कुटुंब आणि शाळा यांच्या परस्पर सहकार्यातून मूलांचा सर्वांगीण विकास करणे शक्य आहे. समाज जोपर्यंत सामाजिक, आध्यात्मिक, नैतिक, धार्मिक इत्यादी मूल्ये मूलांमध्ये रुजवत नाही तोपर्यंत समाजाचा विकास होणार नाही म्हणूनच शाळा आणि समाज विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

**शाळा आणि कुटुंब (समाज) यांच्यात सहकार्याची भावना निर्माण करण्याची माध्यमे (साधने):**

**१) पालक दिन (Parents Day):**

कमीत कमी वर्षातून एकदा सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेत आमंत्रित करायला पाहिजे. त्यापेक्षाही स्वतः विद्यार्थ्यांने आपल्या पालकांना शाळेत आणून शाळेच्या विविध उपक्रमाविषयी माहिती द्यायला हवी. शाळेच्या माध्यमातून अनेक प्रकारचे प्रदर्शन भरवून पालकांचा संपर्क वाढविणे गरजेचे आहे.

**२) पालक - शिक्षक संघ:**

कुटुंब आणि शाळा यामध्ये सामंजस्य निर्माण करणे व दोघांना एकत्रित आणण्याचे पालक शिक्षक संघ हे महत्त्वाचे साधन आहे.

**३) व्यवस्थापन समितीमध्ये पालक प्रतिनिधी:**

शाळेच्या व्यवस्थान समितीमध्ये पालक प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. ज्यामुळे शालेय कामकाजाबाबत पालकांमध्ये उत्सुक्ता आणि आवड निर्माण होईल.

**४) विद्यार्थ्यांच्या घरी शिक्षकांच्या भेटी:**

शाळेतील काही शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालकांची भेट घेण्याचे काम द्यावे जेणेकरुन विद्यार्थ्याबाबत संपूर्ण माहिती मिळविता येईल.

**५) शालेय कार्यक्रमांना (उपक्रमांना) पालकांस आमंत्रित करणे:**

प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन U.N.O. दिन, क्रिडामहोत्सव इत्यादी राष्ट्रीय सण साजरे करत असताना पालकांना आमंत्रीत करायला हवे. जेणेकरुन समाज (कुटुंब) आणि शाळा यामध्ये विचारांची देवाघ-घेवाण होऊन सहकार्याची भावना निर्माण होईल.

**६) प्रगती पुस्तक पालकांना पाठविणे:**

मुलांची अभ्यास, खेळ, शारीरिक उपक्रम इ. मधील प्रगती पालकांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रगतीपुस्तक पालकांपर्यंत पाठविणे शाळेचे कार्य आहे.

**७) पालकांकडून विद्यार्थ्यांची माहिती पाठविणे आवश्यक:**

पालकांनीसुद्धा आपल्या पाल्याच्या खाण्याच्या सवयी अभ्यास तसेच खेळ यांना पाल्य किती वेळ देतो याबाबतचा अहवाल शिक्षकांना पोहचविणे आवश्यक आहे.

**८) शैक्षणिक परिषद:**

शाळेच्या माध्यमातून शैक्षणिक परिषद आणि सभेचे आयोजन करुन पालक, शिक्षक आणि विश्वस्थ मंडळीचा सहभाग वाढवावा ज्यामध्ये शैक्षणिक नियोजन व त्यातील समस्या मांडता येतील.

**९) विशिष्ट कार्यक्रम:**

विशिष्ट असे करमणुकीचे कार्यक्रम शाळेत आयोजित करुन त्या कार्यक्रमाद्वारे घटस्फोट, हुंडापद्धती अशा प्रकारच्या सामाजिक समस्या मांडण्याचा प्रयत्न करावा.

---

## ३ अ. ६) सारांश

- कुटुंबाचे कार्य– आर्थिक भौतिक, बौद्धिक, चारित्र्य, भावनिक, नागरी , सांस्कृतिक विकास.
- कुटुंबाचे स्वरुप - प्राथमिक घटक
- कुटुंब एक सामाजिक संस्था
- सामाजिक संघ
- परिणामकारक घटक.
- पालकांचा प्रभाव.
- सहकाऱ्यांचा प्रभाव
- बाह्य संस्कृतीचा प्रभाव.
- कुटुंब आणि शाळा यांचा परस्परसंबंध

**प्रगती तपासा:**

१) अनौपचारिक शिक्षणात कुटुंब महत्त्वाची भूमिका बजावते' यावर चर्चा करा.

---

---

---

---

२) कुटुंब एक प्राथमिक समूह वर्णन करा.

---

---

---

---

३) कुटुंबाच्या स्वरुपावर चर्चा करा.

---

---

---

---

४) कुटुंबाचे विविध कार्ये लिहा.

५) 'मुलाच्या विकासावर पालकांचा प्रभाव कसा होतो' ते स्पष्ट करा.

६) 'मूल आपल्या मित्राची नक्कल करतो - ' चर्चा करा.

७) 'मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी घर (कुटुंब) आणि शाळा एकमेकांशी संबंधीत राहून सहकार्य करणे आवश्यक आहे.' यावर चर्चा करा.

८) शिक्षक पालकांसोबत चांगले संबंध विकसित करुन ते कसे टिकवून ठेवतो ?

## ३ अ. ७) चर्चेसाठी मुद्दे

१) विभक्त आणि एकत्रित कुटुंब पद्धतीमध्ये मुल्यांच्या विकासावर परिणाम करणारे घटक कोणते आहेत ?

♦ ♦ ♦

# ३ ब)

# शाळा एक शैक्षणिक संस्था म्हणून शिक्षणातील भूमिका

**घटकाचे स्वरुप**


३ ब. १) उद्दिष्ट्ये

३ ब. २) प्रस्तावना

३ ब. ३) शाळा - औपचारिक शिक्षण

३ ब. ४) शाळेमधील सामाजिक स्वरुप

३ ब. ४.१) औपचारिक सामाजिक पद्धती

३ ब. ४.२) अनौपचारिक सामाजिक पद्धती

३ ब. ५) बाह्य समाजापासून वेगळा असा शालेय समाज

३ ब. ६) शाळेतील सामाजिक आंतरक्रिया

३ ब. ७) व्यक्तिचे सामाजिकीरण

३ ब. ८) शिक्षक विद्यार्थी संबंध

३ ब. ९) शाळेची शैक्षणिक कार्ये

३ ब. १०) सारांश


## ३ ब. १) उद्दिष्ट्ये

- शाळेतील सामाजिक स्वरुपाच्या प्रकाराचे ज्ञान करुन घेणे.
- शाळा आणि बाह्य समाज यातील फरक समजून घेणे.
- शाळेतील सामाजिक आंतरक्रियेचे ज्ञान घेणे.
- व्यक्तिच्या सामाजिकीकरणात शिक्षकाची भूमिका
- शिक्षक - विद्यार्थी संबंधामध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करणे आणि शाळेच्या शैक्षणिक कार्याचे वर्णन करणे.

## ३ ब. २) प्रस्तावना

शिक्षण हे आईच्या गर्भाशयापासून ते मृत्यूपर्यंत अविरतपणे चालू राहते. शिक्षणतज्ज्ञाच्या मतानुसार, ''जेवढे शिक्षण आपण आपल्या जीवनात घेतो त्यापैकी फक्त एक चर्तुर्थांश (१/४) एवढे ज्ञान हे शिक्षकांकडून घेतो, एक चतुर्थांश (१/४) ज्ञान पुस्तकातून घेतो, एक चर्तुथांश ज्ञान महाविद्यालयातून घेतो आणि एक चर्तुर्थाश ज्ञान हे आपल्या आजूबाजूच्या

वातावरणातून किंवा पर्यावरणातून घेतो. यामधून असे समजते की प्रत्येक शिक्षणाचा स्त्रोत हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या ज्ञान देण्याचा प्रयत्न करतो. म्हणून शैक्षणिक संस्था, संघटना आणि ज्ञानाचे स्त्रोत हे शिक्षणात महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून त्यांना शैक्षणिक सेवा पुरविणाऱ्या संस्था असे म्हटले जाते. खऱ्या अर्थाने शैक्षणिक संस्थाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१) औपचारिक शिक्षण संस्था

२) अनौपचारिक शिक्षण संस्था

३) न औपचारिक शिक्षण संस्था

**शैक्षणिक संस्था पुढीलप्रमाणे**

| औपचारिक | अनौपचारिक | न औपचारिक |
|---|---|---|
| कार्यक्षम | निष्क्रीय | कार्यक्षम /निषक्रीय |
| शाळा | कुटुंब | प्रौढ आणि सामाजिक |
| महाविद्यालये | संग्रहालय | शिक्षण केंद्र |
| प्रौढ शाळा | समवयस्क गट | दूरस्थ शिक्षण उपक्रम |
| | (मित्र गट) | |
| चर्च | | |
| ग्रंथालय | वर्तमानपत्रे | |
| | रेडिओ | |
| | दूरदर्शन | |
| | ऐच्छिक संघटना | |
| | चित्रपट | |

**औपचारिक शिक्षण संस्था:**

अशा प्रकारच्या शैक्षणिक सेवा पुरविणाऱ्या संस्था ह्या पूर्वनियोजित असतात ज्यांचा एकमेव उद्देश शिक्षणाची प्रगती व प्रसार करण्याचा असतो.

उदा. शाळा, महाविद्यालये, चर्च इत्यादी.

**अनौपचारिक शिक्षण संस्था:**

ज्या संस्था सामाजिक गरजांबरोबरच ज्यांच्या शैक्षणिक गरजा (कार्ये) पूर्ण करण्याच्या हेतूने संघटित केल्या जातात यालाच अनौपचारिक शिक्षण संस्था म्हणतात.

उदा. कुटुंब, संग्रहालय, प्रसारमाध्यमे इत्यादी.

**न - औपचारिक शिक्षण संस्था:**

अशा प्रकारच्या संस्थामध्ये लवचिकता असते. अशा प्रकारच्या संस्था व्यक्तिंना मनोरंजन

आणि त्यांच्या विकासासाठी चालविल्या जातात.

उदा. सामाजिक क्लब, प्रौढशिक्षण केंद्र, दूरस्थ शिक्षण इत्यादी.

या घटकांमध्ये आपण 'शाळा' या औपचारिक शिक्षणिक संस्थेविषयी अभ्यास करणार आहोत.

## ३ ब. ३) शाळा - औपचारिक शिक्षण

शाळा हे औपचारिक शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. शाळेच्या आंतरक्रिया, स्वरुप व त्यांच्या संघटित कार्यानुसार आपण असे म्हणू शकतो की, शाळा ही एक सामाजिक पद्धती आहे. उदा. लोक समाजामध्ये राहतात व शाळा स्थापन करतात. तसेच शिक्षक-पालक, विद्यार्थी-विद्यार्थी, शिक्षक-विद्यार्थी इत्यादीमधील आंतरक्रिया.

शाळेमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. ज्यामध्ये प्रत्येकाला एक विशिष्ट असा सामाजिक दर्जा प्राप्त झाला आहे. असा हा सामाजिक दर्जा वर पासून ते खालतीपर्यंत विभागला गेला आहे. जेव्हा एखादी व्यक्ती अशा या सामाजिक संस्थामध्ये उच्च पदावर रुजू होते तेव्हा त्या त्या समस्येतील इतर व्यक्तिंशी विचारांची देवाण-घेवाण होते. वर्गामध्येसुद्धा विद्यार्थ्यांमध्ये भांडण किंवा वादविवाद होतात. यावरुन  असे म्हणता येईल की ते शाळेच्या सामाजिक पद्धतीवर टिका करत आहेत.

## ३ ब. ४) शाळेमधील सामाजिक स्वरुप

शाळेतील सामाजिक स्वरुपाचे दोन प्रकार पडतात.

३. ब ४.१ औपचारिक सामाजिक पद्धत

३. ब ४.२ अनौपचारिक सामाजिक पद्धत

**३ ब. ४.१) औपचारिक सामाजिक पद्धती:**

शाळेची औपचारिक सामाजिक पद्धती ही विविध स्तरात विभागली आहे. त्या - त्या पद्धतीनुसार ती उतरत्या क्रमाने आहे. या श्रेणीतील पद हे तेथील अध्यक्षावर अवलंबून असते. एकदम वरच्या स्तरात किंवा श्रेणीत जास्तीत जास्त अधिकार असणारे आणि जबाबदार व्यक्तिचा समावेश असतो. मध्यम श्रेणीमध्ये साधारण जबाबदारी असणारे तर खालच्या स्तरावर एकदम कमी जबाबदारी असणाऱ्या व्यक्तिचा समावेश होतो.

वरील स्पष्टीकरण खालील आकृतीच्याद्वारे सुद्धा दर्शविता येतो.

लोकं (जनता)

↓

कायदेमंडळ

↓

प्रशासक
↓
शिक्षक
↓
विद्यार्थी

वरील आकृतीमध्ये दाखविलेल्या बाणानुसार उतरता क्रम असतो. ज्यामध्ये प्रत्येक स्तरांमधील व्यक्तिला आपली जबाबदारी पार पाडावी लागते हे कार्य त्या त्या समाजाशी व संस्थेशी निगडीत राहून पार पाडावे लागते. उदा. शाळेमध्ये मुख्याध्यापक हे शाळा चालविण्यासाठी आणि शाळेच्या व्यवस्थापनासाठी जबाबदार असतात. शिक्षकांना शिकविण्याची जबाबदारी पार पाडावी लागते तर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी पार पाडावी लागते.

## ३ ब. ४.२) अनौपचारिक सामाजिक पद्धती

अशा प्रकारच्या सामाजिक पद्धतीमध्ये शाळा या गृहीतकावर आधारित असतात जेथे लोक औपचारिक शिक्षणातील पद सोडून दुसऱ्या एखाद्या श्रेणीत स्वत:ला लपवण्याचा प्रयत्न करतात. खालील आकृतीच्या माध्यमातून ते स्पष्ट होईल.

प्रशासक → लोक (जनता)

शिक्षक → विद्यार्थी

अशा प्रकारच्या सामाजिक स्वरुपात एकमेकांतील समजूतदारापणा आणि आदर हा महत्त्वाचा आहे. उदा. शाळेतील विद्यार्थ्यांना एखादे शिक्षक /शिक्षिका आवडत नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थी एकमेकांच्या सहाय्याने शिक्षकांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. ते शिक्षकांचे अजिबात ऐकत नाहीत म्हणजेच येथे अपेक्षित अशा विद्यार्थीदशेचे वागणे नसून ते वेगळ्या पद्धतीने वागण्याचा प्रयत्न करतात.

## ३ ब. ५) बाह्य समाजापासून वेगळा असा शालेय समाज

**बाह्यसमाज:**

अशा प्रकारचा समाज ज्यामध्ये लोकांचा समूह असतो जो विशिष्ट अशा देशाच्या मर्यादेत (सिमेमध्ये) राहतो आणि ज्याला विशिष्ट अशी संस्कृती असते. शाळा हा समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहे. शाळा ही सुद्धा एक समाजव्यवस्था आहे. बाह्यसमाजापेक्षा शालेय समाज हा वैशिष्टपूर्ण आहे.

आता आपण शालेय समाज हा बाह्य समाजापेक्षा कसा वेगळा आहे (भिन्न) ते पाहू.

१) प्रवेश, उत्तीर्ण होऊन बाहेर जाणे, शैक्षणिक आर्हता इत्यादी गोष्टींचाच समावेश शालेय

समाजामध्ये होतो पण बाह्य समाजामध्ये व्यक्ति जन्मापासून तर त्याच्या मृत्यूपर्यंत एकत्र राहतात.

२) शालेय समाजामध्ये प्रत्येक व्यक्तिची भूमिका ही ठरवून दिलेली असते पण बाह्य समाजात प्रत्येक व्यक्तीची भूमिका परिस्थितीनुसार बदलते म्हणजे व्यक्तीची भूमिका ही लवचिक असते.

३) शालेय समाजात एकमेकांतील आंतरक्रिया खूप कमी असतात तर बाह्यसमाजात आंतरक्रियांची व्याप्ती खूप मोठी असते.

४) शालेय समाज हा बाह्य समाजाचा एक घटक आहे.

५) समाजाच्या साचेबद्ध पद्धतीमध्ये शाळेला काम करावे लागते.

६) शाळेतील विविध उपक्रम हे पूर्वनियोजित आणि सतत असतात. पण बाह्य समाजात त्या - त्या समाजाच्या स्वरुपानुसार आणि सोयी सुविधानुसार उपक्रम राबविले जातात.

७) शाळा जास्तीत जास्त भर ज्ञान देण्यावर देते तर बाह्य समाज हा व्यक्तिंच्या सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकासावर भर देते.

८) शाळा हे असे ठिकाण आहे ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमता, कौशल्य आणि सवयी (छंद) सक्षम बनवाव्या लागतात. तर बाह्यसमाजात व्यक्तींना आत्मसात केलेली कौशल्य आमलात आणावी लागतात.

९) शालेय समाजात व्यक्तिच्या बुद्धीचा जास्त विचार केला जातो. पण बाह्य समाजात व्यक्तिच्या शारीरिक, सामाजिक, भावनिक, बौद्धिक पैलूंचा विचार केला जातो.

१०) शालेय समाजात नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांना जास्त महत्त्व दिले जाते. तर बाह्य समाजात विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिकांची भूमिका पार पाडावी लागते. म्हणजे त्यांनी आत्मसात केलेली मूल्य उपयोगात आणावी लागतात.

## ३ ब. ६) शाळेतील सामाजिक आंतरक्रिया

शाळा ही एक लहान समाज आहे. अध्ययनकर्ता जो शाळेमध्ये शिक्षण घेतो तो समाजशील असतो. म्हणजेच शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-विद्यार्थी, विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील आंतरक्रिया ह्या चार भिंतीमध्ये न राहता त्या समाजापर्यंत पोहचतात. म्हणून आपण असे म्हणू शकतो की, सामाजिक आंतरक्रिया ह्या शाळेत शक्य आहेत.

येथे आपण शाळेत सामाजिक आंतरक्रिया कशा होतात यावर चर्चा करु या.

१) शाळेचा अभ्यासक्रम हा समाजाच्या गरजांशी निगडीत असतो.

२) विविध सामाजिक सेवा केंद्र तसेच विविध उपक्रम शाळेत राबविले जातात. उदा. रक्तदान शिबिर, प्रौढ शिक्षण इत्यादी.

३) शाळेत विविध राष्ट्रीय सण आणि दिवस साजरे केले जातात. संबंधित व्यक्तीचे योगदान राष्ट्राच्या प्रगतीसाठी कसे पोषक ठरले जाते ते शाळेत सांगितले जाते.

४) उन्हाळी वर्ग आणि व्यक्तीमत्त्व विकासाचे विविध उपक्रम शाळेत राबविले जातात.

५) आंतरक्रिया ही फक्त शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांमध्येच मर्यादित न राहता बाह्य समाजातील व्यक्ती वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होऊन सुसंवाद साधू सकतात. उदा. क्षेत्रभेट, सहल इ.

६) विविध प्रकल्पाद्वारे सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. जसे. हुंडापद्धती, अंधश्रद्धा, प्रदूषण, बेकारी इत्यादी.

७) विद्यार्थी त्या त्या विषयांशी संबंधीत माहीती गोळा करतात. जसे. इंडस्ट्रीज, कारखाने, संस्था आणि समाजातील नागरिकांची भूमिका.

८) शाळेत विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. जेणेकरुन विशिष्ट समाजाचे चित्र डोळयासमोर राहील.

## ३ ब. ७) व्यक्तिच्या तडजोडींचे स्पष्टीकरण/वैयक्तिक सामाजिकीकरण-सामाजिक समायोजन

सामाजिकरण ही एक प्रक्रिया आहे. ज्यामुळे व्यक्ती वागायला शिकतात तसेच मूल्य आणि दुसऱ्यांचा अपेक्षा त्यांना समाजामध्ये विशिष्ट भूमिका पार पाडण्यास समर्थ बनवितात. व्यक्तींना समाजात आणि शाळेच्या वातावरणातच आपल्या जबाबदारीची जाणीव होते. आणि ते विशिष्ट अशी भूमिका पार पाडतात. शाळा ही अशी एक संस्था आहे ज्याठिकाणी पद्धतशीरपणे व्यक्तिचे सामाजिकीकरण घडून येते.

येथे आपण व्यक्तीचे सहकारी गटातील आणि शाळेतील सामाजिकीकरण याविषयी माहिती शिकणार आहोत. शाळेमध्ये आंतरक्रियेसाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करतात. जसे गटांतर्गत आणि गटा-गटातील आंतरक्रिया, म्हणूनच राष्ट्रीयीकरण व्यवस्थितरित्या साध्य केले जाते. समाजाचा सांस्कृतिक वारसा शाळेमधून जतन केला जातो. आणि शाळेच्या माध्यमातून सांस्कृतीक वारसा व्यक्तिपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करते.

शाळेतील राष्ट्रीयीकरणामध्ये शिक्षक हा महत्त्वाचा प्रतिनिधी आहे. खालीलप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांवर राष्ट्रीयीकरणाचा प्रभाव टाकू शकतात.

१) बौद्धीक उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे.

२) विद्यार्थ्यांना त्यांच्या वागण्याबद्दल आणि कार्याबद्दल प्रतिउत्तर देणे तसेच त्यांना समजावून सांगणे.

३) उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यापुढे कल्पनांचे सादरीकरण करणे.

४) ज्ञान आकलनासाठी विविध कल्पना वापरुन योग्य उदाहरणे देणे.

५) विद्यार्थ्यांसोबत घनिष्ठ संबंध तयार करणे.

## ३ ब. ८) शिक्षक विद्यार्थी संबंध

शाळेतील केंद्रस्थानाचा व सर्वोच्च स्थानाचा आणि अतिमहत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय. विद्यार्थ्यांचा स्वभाव, त्यांच्या सवयी कौशल्य वागण्याच्या पद्धतीत योग्य बदल आणि त्यांना योग्य तो आकार देण्यामध्ये शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षक हा सूर्यासारखा किंवा दिव्यासारखा जो दुसऱ्यांना प्रकाश देण्याचे कार्य करतो. शिक्षक हे राष्ट्राचे निर्माते आहेत तसेच सामाजिक बदल घडवून आणण्यात शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. या घटकांमध्ये आपण शिक्षक कसा असावा हे पाहणार आहोत.

शिक्षक विद्यार्थी परस्परसंबंध आणि त्यांच्या आंतरक्रिया ही द्विमार्गी पद्धत आहे. शिक्षक - विद्यार्थी परस्परसंबंध हे खालील प्रमाणे स्पष्ट होतात.

१) शिक्षकांनी सहकार्य करण्याची वृत्ती ठेवावी जेणेकरुन विद्यार्थी त्यांचे अनुभव शिक्षकांशी सांगून स्वतःच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतील.

२) शिक्षकाने मित्राची, मार्गदर्शकाची व पालकाची भूमिका पार पाडायला हवी.

३) शिक्षकाने विद्यार्थ्यांमधील संकूचित वृत्तीचा ऱ्हास करुन त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावणे आवश्यक आहे.

४) शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही वृत्तीचा विकास करायला हवा.

५) शिक्षक विद्यार्थ्यांमधील संबंध हा सुरक्षित आणि मृदु असावा.

६) शिक्षकाने शालेय आणि सहशालेय उपक्रम राबविण्यास उत्सुक असावे.

७) शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद हा स्पष्ट असावा.

८) शिक्षकाने वर्गात योग्य अशी वातावरण निर्मिती करावी.

९) शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्यापनामध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

१०) 'प्रेम द्या, प्रेम घ्या' या सूत्राचा शिक्षकाने अवलंब करावा.

११) शिक्षकांची विद्यार्थी आणि त्याचे पालक यांच्यासोबत सहकार्य, सहानुभूती, तसेच त्यांना समजून घेण्याची वृत्ती असावी.

१२) शिक्षकाने मैत्रीपूर्ण वातावरणात शिस्तता राखली पाहिजे.

१३) शिक्षकांने सामाजिक मूल्यांचा विकास केला पाहिजे. जसे. तडजोड, सहिष्णुता, सामंजस्य, सामाजिक बांधिलकी इत्यादी.

१४) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शंका विचारण्यास पोषक वातावरणनिर्मित करायला हवी.

१५) शिक्षकांचे वर्गनियंत्रण चांगले असायला हवे.

## ३ ब. ९) शाळेची शैक्षणिक कार्ये

शाळा हे औपचारिक शिक्षणाचे केंद्र आहे. याविषयी आपण घटक -१ मध्ये माहिती पाहिलेली आहे.

शाळा हे असे एकमेव ठिकाण आहे जेथे संस्कृतीचे जतन तसेच त्याचा विकासही केला जातो. चांगले नागरिक तयार करणे, मुलांच्या शारीरिक, व्यावसायिक, नैतिक आणि सामाजिक गरजा पूर्ण करणे अशाप्रकारचे शाळेत प्रशिक्षण दिले जाते. शाळेच शैक्षणिक कार्ये पुढीलप्रमाणे.

शैक्षणिक कार्ये.

**१) बहुअंगी/ बहुअयामी शिक्षण:**

आजचे शिक्षण हे बहुअंगी असून शाळेमध्ये '7 R' या सूत्राप्रमाणे शिकविणे हे घोषवाक्य बनले आहे. ते म्हणजे, Reading वाचन, Writing लेखन, Arithmatic संख्याशास्त्र recreation पुनर्निर्माण, rights अधिकार/हक्क, responsibilities जबाबदारी आणि relation संबंध इत्यादी.

**२) लोकशाहीसाठी प्रशिक्षण:**

लोकशाहीचे अनुभव पुरवून शाळा विद्यार्थ्यांना लोकशाही समाजासाठी तयार करतात.

**३) संस्कृतीचे जतन:**

शाळा ही महत्त्वाची संस्था आहे. ज्यामध्ये सामाजिक जीवन पद्धती, रुढी परंपरा, नैतीक मूल्यांचे जतन करुन त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोतविण्याचे कार्य केले जाते.

**४) वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावणे:**

विद्यार्थ्यांना त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचे उपयोजन, निर्णय घेण्याची क्षमता, माहितीचे पृथ्थकरण आणि त्यावर स्वतःचे विचार कसे मांडायचे इत्यादिचे शाळेत प्रशिक्षण दिले जाते.

**५) समाजसुधारक संस्था:**

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार आपल्या संस्कृतीमध्ये योग्य तो बदल करण्यास शाळा मदत करते.

**६) विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाच्या संधी:**

आजचे शिक्षण हे विद्यार्थीकेंद्री शिक्षण आहे. शाळा विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्वाच्या तीन्ही अंगाचा विकास साधण्याची संधी देते. जसे. शारीरिक, मानसिक, बौद्धीक

**७) नैतिक मूल्यांचा विकास:**

प्रामाणिकपणा, सत्य, मोठ्यांचा आदर, आज्ञापालन, दूसऱ्यांना मदत करणे इत्यादी नैतिक मूल्यांचा विकास शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून करता येतो.

**८) व्यावसायिक शिक्षण पूरविणे:**

शाळा विद्यार्थ्यांना विविध व्यवसायासंबंधी मार्गदर्शन करतात.

**९) उत्पादन कौशल्याचा विकास:**

S.U.P.W., W.E., N.S.S. इत्यादी प्रात्यक्षिक उपक्रमाद्वारे शाळेतून विद्यार्थ्यांच्या उत्पादन कौशल्याचा विकास करता येतो.

**१०) सामाजिक गुणांचा विकास:**

शाळेमध्ये खेळ, स्पर्धा, सामाजिक क्षेत्राला भेट, इत्यादी सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले जाते. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तडजोड, सहकार्य, सामंजस्य इत्यादी सामाजिक गुणांचा विकास होतो.

**११) आंतरराष्ट्रीय सामजस्याचा विकास:**

मानवी अधिकारांचा आदर करणे, शातंतामय वातावरण ठेवणे, सहकार्याची भावना, आंतरराष्ट्रीय सामंजस्य इत्यादींचा विकास होणे आवश्यक आहे आणि अशा गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी शाळा महत्त्वाची भूमिका बजावते.

१२) शाळा राष्ट्रीय दिवस आणि सण साजरे करुन विद्यार्थ्यांध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यास मदत करते.

## ३ ब. १०) सारांश

तीन प्रकारच्या शैक्षणिक संस्था आहेत.

१) औपचारिक

२) अनौपचारिक

३) न औपचारिक.

शाळा ही एक औपचारिक शिक्षण संस्था आहे. यावर आपण चर्चा केली. शाळेमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांना नेमून दिलेल्या विशिष्ट पदावर कार्ये करावे लागते किंवा योग्य भूमिका पार पाडाव्या लागतात. या संस्थेतील प्रत्येकजण त्या - त्या मर्यादेमध्ये राहून आंतरक्रिया करतात. म्हणून शाळेला एक सामाजिक संस्था असे म्हटले जाते.

तसेच आपण शाळेतील सामाजिक स्वरुप यावर सविस्तर माहिती पाहिली. तसेच शाळा समाज हा बाह्य समाजापेक्षा कसा वेगळा आहे हे सुद्धा बघितले. शाळेतील आंतरक्रिया, सामाजीकरण विद्यार्थी शिक्षक यातील परस्परसंबंध आणि त्याची कार्ये बघितली.

**प्रगती तपासा -**

१) शाळेतील सामाजिक स्वरुपाचे कोणते दोन प्रकार आहेत ?

२) शाळा हे बाह्य समाजापेक्षा कशी वेगळी आहे ?

३) शाळेतील सामाजिक आंतरक्रियेचे स्वरुप कसे आहे ?

४) शाळेतील आणि समाजातील आंतरक्रियेचा विकास करण्यासाठी कोणते उपक्रम राबविले जातात ?

५) सामाजिकीकरण म्हणजे काय

६) व्यक्तिच्या सामाजिकीकरणात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

७) शाळेत विद्यार्थ्यांसोबतच्या संबंधाचा विकास शिक्षक कसा करु शकतात.

८) शाळेचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करा.

९) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासात शाळा कशी महत्त्वाची भूमिका बजावते ?

♦ ♦ ♦

# ३ क)

# ३. क) शिक्षणाच्या वाहिन्या म्हणून समुदाय, प्रसारमाध्यमे आणि समवयस्क गट यांची शिक्षणातील भूमिका

**घटकांचे स्वरुप**

३ क. ०) उद्दिष्ट्ये
३ क. १) प्रस्तावना
३ क. २) न औपचारिक शिक्षण
३ क. २.१) न -औपचारिक शिक्षणाचे स्वरुप
३ क. २.२) न औपचारिक शिक्षणाचे उद्दिष्ट्ये
३ क. २.३) न औपचारिक शिक्षण या उपक्रमाचे प्रकार
३ क. २.४) न औपचारिक शिक्षणाचा व्यक्तिंना फायदा.
३ क. २.५) न औपचारिक शिक्षणाचे फायदे
३ क. २.६) न औपचारिक शिक्षणाच्या संघटना (संस्था)
३ क. ३) वर्तमानपत्रे (नियतकालिके)
३ क. ४) रेडिओ आकाशवाणी.
३ क. ५) दूरदर्शन
३ क. ६) चित्रपट
३ क. ७) सिनेमागृह, तमाशा, कीर्तन इत्यादी
३ क. ८) मित्रगट (समवयस्कर गट)
३ क. ९) सारांश

## ३ क. ०) उद्दिष्ट्ये

शाळेव्यक्तिरिक्त शिक्षण पुरविण्याचे कार्य करणाऱ्या न औपचारिक शिक्षणाच्या विविध संस्था आहेत. यामुळे या घटकाचा अभ्यास नक्कीच तुमच्या ज्ञानामध्ये भर टाकेल. या घटकांची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :-

- न औपचारिक शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करणे.
- न- औपचारिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करणे.
- न औपचारिक शिक्षण, औपचारिक शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षणातील फरक

स्पष्ट करणे.

- विविध उपक्रमाचे वर्णन करणे आणि न - औपचारिक शिक्षणाच्या पद्धती स्पष्ट करणे.
- नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन, तमाशा, कीर्तन आणि सिनेमागृहे इत्यादी न-औपचारिक शिक्षणाच्या भूमिका स्पष्ट करणे.
- मित्रगट - समवयस्क गटाच्या भूमिकेवर चर्चा करणे.

## ३ क. १) प्रस्तावना

अध्ययन प्रक्रिया ही मानवाच्या उत्पत्तीप्रमाणे खूप प्राचीन आहे. गेल्या तीन दशकामध्ये जग हे मुख्य तीन गोष्टींना जबाबदार आहे. त्या गोष्टी म्हणजे लोकसंख्या विस्फोट, ज्ञानविस्फोट, अपेक्षांचा विस्फोट इत्यादि. म्हणूनच असंख्य लोक जीवनामध्ये आणि त्यांच्या व्यवसायातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी जास्तीत जास्त ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि औपचारिक शिक्षण पद्धती ही वाढत्या शैक्षणिक पद्धती व तिच्या मागण्यांना जास्त काळ पुरेशी ठरणार नाही. म्हणूनच व्यक्तिच्या आवडी, क्षमता, स्वभाव इत्यादी गोष्टींच्या आवश्यकतेनुसार शिक्षणाच्या स्वरुपात बदल होणे आवश्यक आहे. औपचारिक शिक्षणपद्धती ही बदलत्या शैक्षणिक धोरणांना आणि आव्हानाना तोंड देऊ शकत नाही. असे लक्षात आल्यानंतर शासनाने अध्ययन मार्गात विस्तार करण्याचे ठरविले.

या घटकात आपण विविध शैक्षणिक संस्थांची माहिती बघणार आहोत. ज्या कमी खर्चीक व परिणामकारक शैक्षणिक पद्धती आहेत. यामध्ये आपण खालील बाबींचा अभ्यास करु.

- शैक्षणिक संस्थाचे प्रकार
- न औपचारिक शिक्षणाची संकल्पना आणि न - औपचारिक शिक्षणाचा विकास.
- विविध शिक्षण पद्धतीची उदाहरणे आणि न औपचारिक शिक्षणाचे उपक्रम.
- नियतकालिकांची न औपचारिक शिक्षण संस्था म्हणून भूमिका व प्रभाव.
- चित्रपटगृहे, तमाशा, कीर्तन इत्यादींच्या शिक्षणातील भूमिका.
- रेडिओ (आकाशवाणी) ची भूमिका आणि त्याचा प्रभाव.
- दूरदर्शन ची शिक्षणातील भूमिका आणि प्रभाव
- निष्कर्ष.

## ३ क १.१) शिक्षण संस्थांचे प्रकार

आपल्या सभोवतालचे वातावरण किंवा परिसर हे मानवी शिक्षणाचे प्रभावी साधन आहे. पण परिसरांतील कांही घटक वेगळे आहेत. जसे. घर, शाळा, चर्च, नियतकालिके, व्यवसाय, सार्वजनिक जीवन, करमणूक आणि छंद इत्यादी.

**- सर ग्रॉडफी थॉमसन**

शिक्षणाची प्रक्रिया ही जन्मापासून ते मुत्युपर्यंत अविरतपणे चालू राहते. पण कांही विशिष्ट संस्था त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात आणि सर्व शैक्षणिक संस्थांचा प्रभाव हा त्या मूलांवर प्रभावीपणे होतो.

अनेक शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण संस्थांचे बऱ्याच गटात वर्गीकरण केले आहे.









**औपचारिक शिक्षण :**

या प्रकारच्या संस्था पूर्वनियोजित असतात. ज्यांचा उद्देश समाजाच्या गरजा ओळखून त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ इत्यादींचा यामध्ये समावेश होतो. या संस्थाना विविध नियम आणि कायद्याचे पालन करावे लागते आणि या संस्थाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला औपचारिक शिक्षण म्हणतात.

अशा प्रकारच्या संस्थामार्फत शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करतात. औपचारिक शिक्षण हे पूर्वनियोजित अभ्यासक्रम, नियोजित वेळ, विशिष्ट ठराविक ठिकाण आणि विशिष्ट काळामध्ये दिले जाते. एकाचवेळी बऱ्याच विद्यार्थ्यांना या पद्धतीमध्ये ज्ञान दिले जाते.

**अनौपचारिक शिक्षण:**

अशा प्रकारच्या संस्था नैसर्गिक वातावरणात म्हणजेच समाजामध्ये निर्माण होतात. त्या पूर्वनियोजित नसतात. त्यांना विशिष्ट नियम किंवा कायद्याचे पालन करावे लागत नाही. कुटुंब, चर्च, समाज, आणि राज्य इत्यादी अनौपचारिक शिक्षण संस्थांची उदाहरणे आहेत.

अनौपचारिक शिक्षण हे औपचारिक शिक्षणाशी पुरक आहे. अशा प्रकारच्या शिक्षणाला वेळेचे, ठिकाणाचे किंवा अभ्यासक्रमाचे बंधन नसते. एखादा व्यक्ती हा खेळताना, कुटुंबातील व्यक्तीशी संवाद साधताना, समाजामध्ये वावरतांना म्हणजेच समाजातील व्यक्तीशी संवाद करताना अशाप्रकारचे शिक्षण आत्मसात करतो. अशा प्रकारच्या शिक्षणाला अंत नसतो. हा एक शिक्षणाचा अखंड प्रवाह आहे. या पद्धतीमध्ये मूल्यमापनासाठी विशिष्ट अशा तंत्राचा वापर केला जात नाही. या प्रकारच्या शिक्षणामध्ये प्रमाणपत्र किंवा पदवी बहाल केली जात नाही. पण खूप मौल्यवान आणि महत्त्वाच्या गोष्टी अशा संस्थामार्फत शिकता येतात.

## ३ क. २) न औपचारिक शिक्षण

अशा प्रकारच्या शैक्षणिक संस्था शालेय संस्थांच्या बाहेरच्या असतात म्हणजेच औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण यांच्या मध्यभागी असतात.

अशा प्रकारच्या शिक्षणात लवचिकता असते. प्रवेश अभ्यासक्रम, ठिकाण, शिक्षणाचे माध्यम, वेळ आणि कार्यकाल इत्यादी बाबतीत बंधने नसतात. मुक्तशाळा, मुक्त विद्यापीठे, दुरस्थ शिक्षण इत्यादी न - औपचारिक शिक्षणाची उदाहरणे आहेत. तसेच यामध्ये प्रौढ शिक्षण, शिक्षण नेहमी चालू ठेवणे, नोकरी करत करत घ्यावयाचे शिक्षण इत्यादी शिक्षणाचा यामध्ये समावेश होतो.

इ.स. १९६८ मध्ये फिलिफ कोंब यांनी आपले विचार मांडले आणि इ. स. १९७० मध्ये याची व्याख्या करण्यात आली. ती अशी, ''न - औपचारिक शिक्षण ही प्राचीन शिक्षणपद्धतीची नवी कल्पना आहे.

कोम्बस आणि अहमद यांनी १९७४ मध्ये न औपचारिक शिक्षणाची व्याख्या केली. त्यांच्या मते, ''एखादी संघटना जी पद्धतशीर आहे आणि औपचारिक शिक्षणाव्यतिरिक्त

शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.''

लाबेलाच्या मते, ''न - औपचारिक शिक्षण हे शाळेबाहेर राबविले जाते. ज्यामध्ये विशिष्ट लोकसंख्या गटासाठी अध्ययन अनुभव पुरविले जातात.

## ३ क. २.१) न औपचारिक शिक्षणाचे स्वरुप

अशा प्रकारचे शिक्षण हे व्यवस्थितरित्या पूर्वनियोजित आणि औपचारिक शिक्षणासारखे आर्थिकदृष्ट्या प्रबळ असते. या शिक्षणामध्ये वेळेचे, ठिकाणाचे बंधन नसते पण सामाजिक गरजा आणि त्याच्या बदलानुसार लवचिक आहे. म्हणून ग्रामीण विकासाचे ते खूप परिणामकारक असे साधन आहे.

मौलकोम ए. अदीसेसिग्राह (Malcom A. Adiseshiab) यांच्या मते, अशा प्रकारच्या शिक्षणात व्यावसायिक दृष्टिकोन असावा आणि यामध्ये स्वयं अध्ययन पद्धतीवर जास्तीत जास्त भर देण्यात यावा.

एच.एस.एस. लॉरेन्स (H.S.S. Lawrence) यांच्या मते, न औपचारिक शिक्षण औपचारिक शिक्षणास प्रतिस्पर्धी नसून त्यास पुरक असे शिक्षण आहे.''

जुलै १९७९ मध्ये माध्यमिक शालांत परिक्षा कमिटी, दिल्ली यांनी पहिली मुक्त शाळा सुरु केली. पण या कल्पनेला सुरुवात दुसऱ्या महायुद्धानंतर झाली होती.

## ३ क. २.२ न औपचारिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये

न - औपचारिक शिक्षणाच्या उद्दिष्टांचे तीन संच आहेत. ते खालीलप्रमाणे

- तात्पुरते उद्दिष्ट्य म्हणजे निरक्षरतेचे उच्चाटन करणे.
- मध्यम स्तरावरचे उद्दिष्ट्य म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांच्या सोडवणूकीसाठी नविन ज्ञानाचे उपयोजन करणे.
- दूरगामी उद्दिष्ट्य म्हणजे आजीवन शिक्षण पुरविणे.

## ३ क. २.३ न औपचारिक शिक्षण कार्यक्रमाचे प्रकार

| | |
|---|---|
| • शाळा मुक्त अभ्यास | - शिक्षक -विद्यार्थी संबंध कार्यक्रम |
| • पत्राद्वारे अभ्यासक्रम | - विद्याशाखा आणि संसाधन /तज्ज्ञ व्यक्ति |
| • प्रौढ साक्षरता कार्यक्रम | - प्रसार माध्यम उपागम |
| • सॅटेलाईट इनस्ट्रक्शन कार्यक्रम | - ६-१४ वयोगटातील विद्यार्थ्यांची गळती विषयक कार्यक्रम |
| • स्वतंत्र अभ्यास | - संध्याकाळची महाविद्यालये |

## ३ क. २.४ न औपचारिक शिक्षणातील उपयुक्तता

खालील प्रकारच्या व्यक्तिंना न - औपचारिक शिक्षणाचे फायदे होतात.

- **सर्व वयोगटातील लोकांना** - ज्यांना कोणत्याही औपचारिक शिक्षण कार्यक्रमाची संधी मिळत नाही असे सर्व वयोगटातील लोकांना न - औपचारिक शिक्षणाचा फायदा होतो.
- **विद्यार्थी** - जे विद्यार्थी प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत अशांसाठी.
- **अध्ययनकर्ते** - वैयक्तिक आणि विशेष विषयांत अभिरूची असलेले परंतु त्यातील खोलवर आणि सर्वकष ज्ञान हवे असणाऱ्या अध्ययनकर्त्यासाठी उपयुक्त.
- **मजूरवर्ग** - ग्रामीण आणि शहरी भागातील तरूण कामगार, लहान शेतकरी, जमीन नसलेले शेतमजूर, छोटे उद्योग करणारे अशा सर्वांना त्यांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करावा यासाठी ज्ञान हवे असलेल्या लोकांसाठी उपयुक्त.
- **शिक्षित रोजगार** - विविध समुहातील शिक्षित परंतु व्यवसायाशी संबंधित शिक्षण नसलेल्या लोकांसाठी उपयुक्त
- **पदवीधारक, व्यावसायिक, बुद्धीवान** - ज्यांना आपले ज्ञान अद्यावत करावयाचे आहे अशा सर्व लोकांसाठी उपयुक्त.
- **इतर** - वैयक्तिक समाधानासाठी वेळेचा सदुपयोग, पूर्वी राहून गेलेल्या काही कृती, संस्कृतीक आणि काहीतरी नवीन करावे अशी अपेक्षा असलेल्या सर्वांसाठी उपयुक्त.

## ३ क. २.५ न औपचारिक शिक्षणाचे फायदे

- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी
- प्रौढ साक्षरतेच्या वाढीसाठी
- लोकशाहीत्मक आव्हानांच्या सफलतेसाठी.
- कमवा आणि शिका यासाठी विद्यार्थ्यांना समर्थ बनविण्यासाठी
- काही कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या औपचारिक शिक्षणात खंड पडलेला आहे त्यांना समर्थ बनविण्यासाठी.
- आपले ज्ञान समृद्ध आणि अद्यावत बनविण्यासाठी
- जे शहरात राहतात आणि जे खेड्यात राहतात अशांमध्ये शिक्षणातील समानता आणण्यासाठी.
- समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने मागासलेल्या लोकांना शैक्षणिक सुविधा पुरविणे.

### न - औपचारिक शिक्षणाच्या वाहिनी/संस्था

खालील प्रकारच्या न - औपचारिक शिक्षणाच्या वाहिन्या न - औपचारिक शिक्षक कार्यक्रमांचे

आयोजन करतात.

- औपचारिक शिक्षणाच्या संस्था
- न - औपचारिक शिक्षणाची विशेष वाहिनी - नेहरू युवक केंद्र, कंपनीतील प्रशिक्षण केंद्र, लोकवाचनालय, पगाराद्वारे शिक्षण केंद्र.
- अशासकीय संघटना - मंडळे आणि सामाजिक केंद्रे.
- रेडिओ, दूरदर्शन, प्रसारमाध्यमे, उदा. छपाई, वार्ता, तमाशा, किर्तन, थिअेटर, चित्रपट इ.

न - औपचारिक शिक्षण हा शिक्षणाचा एक मार्ग आहे. जसे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण म्हणून न - औपचारिक शिक्षण औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाच्या सहकार्याने केले जाते. काही विशेष कार्यक्रम आणि प्रक्रिया यांच्याद्वारे संघटित केल्या जाऊ शकतात परंतु इतर वाहिन्यांतील संबंध दुर्लक्ष करून चालणार नाही. सर्व औपचारिक आणि अनौपचारिक वाहिन्या या न - औपचारिक शिक्षणाच्या वाहिन्या आहेत कारण त्या न - औपचारिक शिक्षणाची उद्दिष्टे आणि गरज लक्षात घेऊन शिक्षण पुरवितात. हे आणखीन स्पष्ट होईल जेव्हा शिक्षणाच्या इतर वाहिन्याच्या आढावा घेऊ जसे दूरदर्शन, रेडिओ, वार्ता या घटनेतील हे सर्व अनौपचारिक आणि न -औपचारिक वाहिन्याच्या अंतर्गत येतात.

**तुमची प्रगती तपासा**

१) न - औपचारिक शिक्षणाच्या उद्दिष्टेचे तीन संच लिहा.

२) न - औपचारिक शिक्षणाचे पाच फायदे सांगा.

## ३ क.३ प्रेस मुद्रणालय छापील साहित्य

या मुद्रणालयाच्या अंतर्गत सर्व प्रकारची प्रसार माध्यमे येतात जसे वर्तमानपत्र, साप्ताहिके, पुस्तके, लहानपुस्तिका, प्रबंध इ.

**वर्तमानपत्रे:**

जगातील सर्वच भाषेत वर्तमानपत्रे छापले जातात आणि वाटले जातात. नागरिकांशी संप्रेरणा करण्याचा हा एक आधुनिक मार्ग आहे. जगातील महत्त्वाच्या घडामोडी काही तासातच

लोकांपुढे वर्तमानपत्राच्या साहाय्याने सादर करता येतात. रोजच्या घटनांचे संकलन याद्वारे होते.

रविवारी यात भविष्यात्मक बाबींवरील लेख, मुलांचे पान किंवा रकाना असतो. ज्याद्वारे त्यांना माहिती देता येते आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारची माहितीचे कात्रणे जमा करण्याचे, वाचन कौशल्याचे विकसन करता येते.

**नियतकालिके**:

विविध प्रकारची नियतकालिके जसे साप्ताहिक, मासिके विविध भाषेत प्रकाशित केली जातात. लोक ग्रंथालये, शालेय ग्रंथालय आणि गृह ग्रंथालयाद्वारे हे नियतकालिके युवापीढीच्या हातात देतात. सद्य परिस्थीती वर्णन सामाजिक आणि सांस्कृतिक संक्रमणास ही नियतकालिके मदत करतात.

सगळ्या नियतकालिकामध्ये मुलांसाठी रकाना/पुरवणी अनेक उमलत्या वयातील, विशेष मुलांसाठीदेखील यात माहिती असते.

**मुद्रणालयाचे संघटन:**

आधुनिक संप्रेषण तंत्रज्ञानाची वाढ ही छपाई तंत्रातील क्रांतीचे द्योतक आहे. अधिक विशेष छपाई साहित्य -धार्मिक आणि राजकीय पुस्तके त्याचे कार्य म्हणजे मानवी जीवनाचे संक्रमण होय.

आजच्या संगणकच्या युगात आणि सॅटेलाईट संप्रेषणाच्या युगांतदेखील सर्वात अधिक महत्त्वपूर्ण शैक्षणिक तंत्रज्ञान म्हणजे छापील साहित्य (अल्टढॉच १९८७) शिक्षणाचे साधन म्हणून आजही प्रगत देशात छापील साहित्य मानले जाते. सर्व जगात शिक्षणाचे मूलभूत साधन म्हणून छापील साहित्याचा आधार घेतला जातो. प्रशिक्षक देखील अध्यापन आणि अध्यनासाठी छापील पुस्तकांवरच अवलंबून असतो.

विविध हेतूसाठी जगातील विविध भाषांमध्ये दररोज हजारो पुस्तके छापली जातात. ज्ञान घेण्याचे आणि वाढविण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणजे छापील पुस्तक होय. छापील माध्यमांचे विविध प्रकार आहेत जसे वर्तमानपत्र, मासिके, साप्ताहिके, हस्तपुस्तिका, दैनंदिनी, ॲटलस (नकाशे), विश्वकोश, कार्यपुस्तिका इ.

**लोकांवरील प्रभाव:**

सर्व दूरस्थ शिक्षण संस्थांसाठी दूरस्थ शिक्षणाचे प्रणालीचे सर्वात महत्त्वपूर्ण अनुदेशन आदान माध्यम म्हणजे छापील साहित्य होय. आधुनिक मूल्या/किंमतीच्या संदर्भात छापील साहित्य उपयुक्त आहे. पूर्वी छापील साहित्य टंकलिखीत स्वरूपवान होते. आता ते आधुनिक स्वरूपात म्हणजेच तंत्रज्ञानाचा वापर करून छापले जाते.

**तुमची प्रगती तपासा**

१) छापील साहित्याचे विविध प्रकार कोणते.

## ३ क.४ रेडिओ

२० व्या शतकातील घटना म्हणजे रेडिओ होय. रेडिओची वाढ ही १९२०-१९४० या दरम्यान झाली. रेडिओचा शोध लागल्यादिवसपासून ते आजपर्यंत आपण प्रसारण सुविधेतील अद्यावतपणा पाहत आहोत.

सुरवातीच्या काळात रेडिओ तंत्रज्ञानाची प्रगती हळूहळू होती परंतु दुसऱ्या महायुद्धापासून त्यामध्ये वाढ होत गेली. दुसऱ्या महायुद्धानंतर निवडणूक प्रक्रियेसाठी जगभर रेडिओचा वापर झाला आणि त्यास राजकिय आश्रय मिळाला आणि त्यानंतर आजतागायत तंत्रज्ञानात वाढच होत गेली.

व्यावसायिक माहिती आणि मनोरंजनासाठी याचा उपयोग होऊ लागला. त्यामुळे त्याच्या आकारात आणि मुल्यातही फरक पडला. सर्व जगातील देशामध्ये प्रसार माध्यमासाठी रेडिओसोबत ट्रान्झिस्टर सुविधा उपलब्ध झाली. ज्या लोकांचे आर्थिक उत्पन्न कमी आहे असे देखील ट्रान्झिस्टर (छोटा रेडिओ) आपल्या खिशात घेऊन फिरू लागले.

१९९० च्या काळात रेडिओवरील नविन तंत्रज्ञान चा उगम झाला आणि त्याच्या आवाजाच्या स्पष्टतेमुळे ते सर्वात लोकप्रिय ठरले.

**लोकांवरील प्रभाव:**

रेडिओ अद्यावत माहितीचे प्रसारण करतो. कुठेही घडलेल्या घटनांचे काही सेकंदातच आपल्याला माहिती मिळते. कदाचीत भारतात रेडिओ त्वरित संदेश उपलब्धीचा मार्ग आहे. या माध्यमाद्वारे शिक्षक, विद्यार्थी आणि इतर सामान्य लोक शिक्षण घेऊ शकतात.

रेडिओवरील कार्यक्रमांना मोठे क्षेत्र आहे. दैनंदिन कार्यक्रमात संगीत, नाटक, वार्ता, चर्चा, पाठ्यतज्ज्ञ, बातम्या, आढावा इ. चा समावेश होतो. त्यामुळे ज्ञानात भर पडते. प्रौढशिक्षक आणि न-औपचारिक शिक्षणाचे प्रभावी साधन म्हणून रेडिओचा उपयोग होतो.

रेडिओवरील कार्यक्रमाचे आखणी आणि सादरीकरण विशेषतज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली होते. अध्ययन कर्त्याचा हा सर्वात मोठा फायदा आहे. बहुतांशी कार्यक्रमाचे संचलन तज्ज्ञाच्या आवाजात होत असल्यामुळे अध्ययनकर्त्यास प्रेरणा मिळते.

**शिक्षणावरील प्रभाव:**

शिक्षणाच्या विस्तारासाठी सर्वात प्रभावी माध्यम म्हणून रेडिओवरील कार्यक्रमाचा समावेश होतो. लोकशाही पद्धतीने शिक्षण ज्या देशात हवे आहे त्या देशातील प्रत्येक नागरिकाच्या दारात जाऊन रेडिओ शिक्षण देऊ शकतो. लोकशाही शिक्षणाचे ध्येय फक्त यामुळे साध्य होऊ शकते.

पूर्व आणि उत्तर कृतीचे प्रसारण रेडिओद्वारे होते. ऑल इंडिया रेडिओने ९० टक्के लोकसंख्येवर प्रसारण केले आहे. १९२९ मुंबई येथे ऑल इंडिया रेडिओने मुलांसाठी त्या कार्यक्रमाची सुरूवात केली. नंतर १९३० मध्ये मद्रास येथे सुरूवात झाली. प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे १४ रेडिओ वाहिन्यावरून प्रसारण करण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वरूप सामान्यपणे प्रेरणात्मक आणि कार्यात्मक असते. भारतीय भाषेचे केंद्रिय संस्था, मैसूर यांनी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी कार्यक्रम तयार केला. यांनी मुंबई आणि हैद्राबाद येथे कार्यक्रम नेटवर्कच्या माध्यमातून तयार केला. न-औपचारिक शिक्षणासाठी सर्वच रेडिओ केद्रांनी कार्यक्रमाचे प्रसारण केले. शेतकऱ्यांसाठी ऑल इंडिया रेडिओने न-औपचारिक शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रसारण केले.

**तुमची प्रगती तपासा**

१) रेडिओची प्रचंड प्रमाणात वाढ ----- ते ------ या दरम्यान झाली.

२) ऑल इंडिया रेडिओने जवळजवळ ----- टक्के लोकसंख्येत रेडिओचा प्रसार केला.

३) मुलांसाठी ऑल इंडिया रेडिओने कार्यक्रमाची सुरूवात मुंबई मध्ये ------- यासाली आणि चेन्नई येथे ------ यासाली केली.

## ३ क.५ दूरदर्शन

रेडिओनंतर दूरदर्शन आले. दूरदर्शनचा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात लागला. दूरदर्शन हे प्रतिमाची हालचाल आणि आवाज संक्रमण करण्याचे इलेक्ट्रॉनीक माध्यम आहे. यांत चुंबकीय लहरी द्वारे साधनांमध्ये प्रकाश आणि आवाजाची निर्मिती करता येते. संप्रेषणाचे उत्तम माध्यम म्हणजे दूरदर्शनवरील कार्यक्रम होय. बहुतेक विकसनशील आणि विकसित राष्ट्रे, दूरदर्शनचा वापर शिक्षणाच्या विकासासाठी करतात. या दृक-श्राव्य साधनांद्वारे सतत कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाते. सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे दूर करण्यासाठी याचा उपयोग अध्ययनकर्त्यास होतो. जीवनातील ध्येयाच्या प्रसारणासाठी, मुल्यांना आकार देण्यासाठी लोकांमध्ये दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी दूरदर्शन हे एक प्रभावी माध्यम आहे.

**लोकांवरील प्रभाव:**

विविध कार्यक्रमांद्वारे दूरदर्शन लोकांना अनुभव पुरविण्याचे कार्य करते. शिक्षण, माहिती आणि मनोरंजन या विविध हेतूसाध्यतेसाठी दूरदर्शनचा उपयोग होतो. विद्यार्थ्यांचा भावात्मक विकास आणि अध्ययनाचा शोध घेण्यासाठी त्याच्या मध्ये प्रेरणा निर्माण करण्यासाठी दूरदर्शन सुविधा पुरविते. याचे मुख्य उद्दिष्ट देशातील बहुवंशीय, बहुभाषीक लोकांसाठी माहिती, शिक्षण आणि मनोरंजन च्या सुविधा पुरविणे हा आहे. इंग्रजीशिवाय १७ भारतीय भाषेत दूरदर्शनवर कार्यक्रम सादर केले जातात. प्रादेशिक भाषेत संध्याकाळी कार्यक्रमाचे प्रासरण केले जाते. यात मुले, युवक, स्त्रीया, शेतकरी, कामगार, इ. साठी माहितीयुक्त व शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रसारण केले जाते.

देशाच्या विविध भागात दिल्लीकडून राष्ट्रीय कार्यक्रमाचे दररोज प्रसारण केले जाते. याशिवाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटना, बातम्या, उच्च शिक्षणावर आधारित कार्यक्रम ही सादर केले जातात. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या मालिकांचेही सादरीकरण केले जाते. (जसे रामायण, महाभारत).

**शिक्षणावरील प्रभाव:**

आधुनिक युगात सर्वात लोकप्रिय आणि सत्ताधारी संप्रेषण माध्यम म्हणजे दूरदर्शन होय. शिक्षणशास्त्राच्या क्षेत्रात मात्र शैक्षणिक किंवा अनुदेशन दूरदर्शन असे म्हणतात. याचा वापर -

१) मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक अनुभव देण्यासाठी.

२) विषयांत अभिरूची निर्माण करण्यासाठी.

३) अध्ययनात गुणवत्ता आणण्यासाठी.

४) संपूर्ण अध्यापनात क्रियात्मक आणि चिकित्सात्मक उपागमाचा वापरासाठी.

५) उपाययोजनात्मक शिक्षण पुरविण्यासाठी.

६) संपूर्ण अध्यापन देण्यासाठी

दूरदर्शनवर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चशिक्षणावर आधारित कार्यक्रमाचे विद्यार्ध्यांसाठी प्रसारण केले जावे. राज्यस्तरावर तसेच राष्ट्रीय स्तरावर यांचे प्रसारण केले जाते. १) थेट प्रक्षेपण २) ध्वनित केलेले आणि ३) बंदिस्त कार्यक्रम

शैक्षणिक क्षेत्रात दूरदर्शनचा वापर शिक्षणाच्या विविध मार्गाद्वारे होतो. - न-औपचारिक, दूरस्थ, नियोजित आणि पत्राद्वारे हे शिक्षक, प्रशिक्षक आणि जे पत्राद्वारे शिक्षण घेतात अशा सर्वांसाठी प्रभावी माध्यम आहे.  ९० टक्के लोकसंख्येस दूरदर्शनचा फायदा होतो. राष्ट्रीय कार्यक्रमातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे संदेश याद्वारे दिला जातो. विद्यार्थ्याच्या कामाच्या ठिकाणी तसेच वर्गात देखील दूरदर्शन कार्यक्रम उपलब्ध होतात.

दूरदर्शनचा उपयोग विज्ञानाच्या अध्यापनासाठी जास्त होतो. विशेषतः प्रयोगशाळेतील अभ्यासासाठी. कारण प्रयोगाचे साहित्य खूप खर्चिक बनले असते तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मार्गदर्शन प्रयोग करताना मिळते.

## तुमची प्रगती तपासा

१) शैक्षणिक क्षेत्रातील दूरदर्शनचे उपयोग लिहा.

## ३ क.६ चित्रपट

सामान्य आणि विशेष विद्यार्थ्यासाठीच्या शिक्षणात आणि मनोरंजनात चित्रपटाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. भारत सरकारचा चित्रपट विभाग विशेषतः दस्तऐवजावर आधारित चित्रपट निर्माण करते. जगातील आणि भारतातील अध्ययनकार्यासाठी हे सर्वात मोठे आणि उपयुक्त असे केंद्र आहे.

लघुचित्रपट आणि डॉक्युमेन्टरीवर आधारित चित्रपट हे भारत सरकारच्या चित्रपट विभगाद्वारे प्रक्षेपित केले जातात.

**लोकांवरील प्रभाव:**

समूह लोकरंजनाचे आणि पुनर्निर्मिती चे सामाजिक स्त्रोत म्हणजे चित्रपट होय. अंधश्रद्धा, निरक्षरता आणि अज्ञान दूर करण्याचे सक्षम शस्त्र म्हणजे दूरदर्शन. आंतरराष्ट्रीय सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिकतेसाठी चित्रपटाचा जास्त उपयोग केला जातो. चित्रपटाद्वारे प्रत्येक शालेय विषयाचे चित्रण करता येते.

देशाला ज्या हरितक्रांतीची आणि उद्योगक्रांतीची गरज आहे अशा चित्रपटाच्या निर्मितीसाठी म्हणून भारत सरकार प्रोत्साहन आणि अनुदान देते. देशातील महिला आणि युवक वर्गावर चित्रपटांचा प्रभाव अधिक पडतो. ह्याद्वारे ते स्वतःचे व्यक्तिमत्व, उद्योगाविषयीची माहिती, शेतीविषयीचे तंत्रज्ञान इ. ची माहिती घेऊ शकतात. आधुनिक समाजाच्या सांस्कृतिक जीवनासाठी चित्रपटांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

**शिक्षणावरील प्रभाव:**

प्रक्रियेतील घटनांचे, वस्तुंचे, वास्तवाचे प्रदर्शन शिक्षणाद्वारे सादर केले जावे. चित्रपटाद्वारे प्रत्यक्ष अनुभव पाहावयास मिळतो. इतकेच विषय विज्ञान, इतिहास, भुगोल यावर आधारित चित्रपट निर्मितीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. आणि त्यांची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. विशेषतः शैक्षणिक चित्रपट आणि डाक्युमेंटरी चित्रपट हे माहितीचे प्रमाणभूत किंवा विश्वसनीय स्त्रोत आहेत.

चित्रपट भरभर जसा पुढे जाऊ शकतो तसा तो रिमोट द्वारे नियंत्रितही करता येतो. घटनेतील एखादा मुद्दा समजला नसेल तर त्यावर रिमोट ठेऊन ते परत पाहता येते समजून घेता येऊ शकते.

पर्यावरण शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता, प्रौढ शिक्षण यांसारख्या विषयावर चित्रपट निर्मिती करून लोकांना शिक्षण देता येते.

चौराहा, खिलती कवियॉ,स्वातसिद्धी, ढाई अक्षर, एक थी गुंजा, सतरंग, यासारखे अनुदेशन चित्रपट शिक्षणाबद्दल जाणीव जागृतीचा विकास करण्यासाठी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरतात. समाजीक रूढी, परंपरा, अंधविश्वास यासर्वांचे उच्चाटन करण्यासाठी चित्रपटांचा उपयोग होतो.

**तुमची प्रगती तपासा**

रिकाम्या जागा भरा

१) ---- आणि ----- चित्रपट हे माहितीचे विश्वसनीय स्त्रोत आहे.

२) ---- आणि ----- हे समुपदेशन चित्रपटाचे दोन उदा. आहेत.

## ३ क.७ थिअेटर, तमाशा, किर्तन

समाजातील दुर्बल घटकांसाठीच्या शिक्षणासाठी लोककला हे पारंपारिक माध्यम आहे. देशातील विविध भागात विविध लोककला आहेत. स्थानिक लोकांशी संप्रेरण करण्यासाठी आणि साक्षरतेच्या प्रसारासाठी लोककला प्रभावीपणे कार्य करतात. विविध प्रकारच्या लोककलेद्वारे प्रौढ आणि साक्षरतेचा संदेश देता येतो.

लोकांना शिक्षित करण्यासाठी लोककला हे पारंपारिक आणि प्रभावी असे माध्यम आहे. लोकांना संदेश पोहोचविण्यासाठी शैक्षणिक संस्था यांचा वापर करतात. विविध माध्यमा द्वारे जसे कठपुतली, नाटक, थिअेटर, तमाशा, किर्तन, भजन इ. समुदायास शैक्षणिक संदेशाचे संप्रेषण करता येते.

विशेष उत्सवांमध्ये लोककला महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आणि या लोककला विशेषतः खेड्यातील आणि मागासलेले लोक सादर करतात. लोककलेची परंपरा वडिलोपार्जित असते. काही कलांचे पुस्तकाद्वारे प्रकाशनही केलेले आढळते. प्रत्येक लोककलेची भाषा, नृत्य, संगित पोशाख वेगवेगळे असतात. ते सर्वजण या कला एखाद्या मैदानावर किंवा मोकळ्या जागेवर सादर करतात काही कला या रात्रभर सादर केल्या जातात. उदा. जागरण, भारूड. मैदानाच्या मध्यभागी लोककला सादर केल्या जाते आणि त्याच्या सभोवताली लोक जमलेले असतात. या लोककलेद्वारे त्या विशिष्ट समाजाची परंपरा, रूढी याचे संक्रमण कले जाते.

**तमाशा :**

सैन्य किंवा सैन्याची तुकडी, घोडेस्वाराची तुकडी याचे मनोरंजन तमाशाद्वारे केल जाते. तमाशाद्वारे अध्यात्म, संगित आणि नृत्य सादर केले जाते.

तमाशामध्ये स्त्रीयांची भूमिका असते जी रात्रीच्या वेळी चांगले गाऊ आणि नाचू शकते. तसेच गवळण ही सादर केली जाते.

तमाशातील गाणे शास्त्रीय संगीतावर आधारीत असतात. तमाशातील महत्त्वपूर्ण घटक म्हणजे ढोलकीवादक. तो ढोलकी वाजवतो तसेच महत्त्वपूर्ण संवाद फेकतो आणि गाणेही गातो. तमाशाचे मुख्य आकर्षण त्याचे संगीत आणि शास्त्रीय संगीत आहे.

**थिअेटर :**

जे लोक निरक्षर आणि गरिब आहेत त्यांना शिक्षित आणि साक्षर करण्यासाठी थिअेटर हे सर्वात प्रभावी असे माध्यम आहे. देशातील विविध समूहामध्ये हे सर्वात लोकप्रिय असे माध्यम आहे विशेषतः ग्रामीण समूहामध्ये.

देशातील विविध भागातील मागासलेले, अज्ञानी, रस्त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांना साक्षरतेचा आणि प्रौढ प्रकारची नाटके सादर केली जातात. ज्यामुळे साक्षरतेचे मूल्य आणि शिक्षणाचे महत्त्व दैनंदिन आयुष्य किती आहे हे लोकांना समजते. थिअेटरद्वारे लोकांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनात वाढ होते. आणि ते कोणत्याही अंधश्रद्धेला बळी पडत नाहीत. सामाजिकतेचे शत्रु कोण आहेत याची जाणीव जागृती थिअेटरद्वारे करता येते. त्यासाठी स्त्री-

पुरूष समानता, लहान कुटुंबाचे महत्त्व पर्यावरणाचे संवर्धन, राष्ट्रीय एकात्मता इ. साठी अनुकुल असे वातावरण थिएटरद्वारे निर्माण करता येते.

**किर्तन :**

किर्तनाचा उगम चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. किर्तनाचे दोन प्रकार आहेत. किर्तन -१ आणि किर्तन-२. किर्तन -१ यात देवाची प्रार्थना, म्हणजेच भक्ती रसांची वाढ याचे काव्य आणि उच्चार अतिशय साधे असतात. त्यात राग कशाप्रकारे गावेत हे सांगितले जावे. रागाचे प्रकार उदा. अबाली, मल्हार, कोंडा इ.

**किर्तनाचे प्रकार :**

१) दिव्यनामकिर्तन

२) उत्सव संप्रदाय किर्तन

३) मानसपुजा किर्तन

४) रामायण किर्तन

किर्तनप्रकार संस्कृत पेक्षा तेलगू आधिक आहेत. काही महत्त्वपूर्ण किर्तनकार-

१) अन्नामाचार्य

२) पेड तिखमूल्यांगार

३) नारायण तीर्थ

४) पुरंदर दास

५) गीरीराज कवी

६) विजय गोपाल स्वामी

किर्तन-२ यांत नवविविधभक्ती याचा समावेश होते. यातील विषय म्हणजे देवाचे गुणगान आणि कार्य. किर्तनाद्वारे धर्माचा विकास म्हणजेच किर्तन ही एक सामाजिक संस्था. जो किर्तन करतो त्यास हरिदास किंवा किर्तनकार बुवा असे मराठीत म्हणतात. त्यांच्यात सभाधीटपणा आणि भाषणातील स्पष्टपणा असतो. किर्तनातील आवश्यक आणि महत्त्वपूर्ण घटक खालीलप्रमाणे

१) नीटनेटकेपणा

२) उत्तम पोशाख

३) उत्तम कल्पना

४) भाषण स्पष्टता

५) गायिकता

६) नृत्य

७) विनोद

हे घटक लोकांना आकर्षित करतात. देवाच्या उत्सवामध्ये विशेष करून किर्तनाचे

आयोजन केले जाते. याचे आयोजन टेकडीवर, डोंगरावर जिथे देवाचे स्थान आहे अशा ठिकाणी केले जाते. किर्तन एकएकटे किंवा समुहामध्येदेखील सादर करता येते. किर्तनाचे दोन भाग आहेत १) पूर्वार्ध २) उत्तरार्ध

पूर्वार्धामध्ये अभंग आणि स्पष्टीकरण तर उत्तरार्धात गोष्टी असतात. किर्तनाच्या शेवटी तुकारामाचा अभंग असतो - हेची दान देगा देवा

किर्तन संस्थेचे जनक नारदमुनी आहेत. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत रामदासांनी किर्तनाचा प्रसार केला. महाराष्ट्रातील पहिले किर्तनकार संत नामदेव आहेत. तसेच किर्तनाचा प्रसार ओरिसा द्वारे चैत्यन्य पर्यंत झाला.

स्वातंत्र्यापूर्वी किर्तन आणि किर्तनसंस्था आधुनिक होत्या आणि त्याद्वारे लोकांच्या भावनांचा प्रसार केला गेला. किर्तन हे लोकांना धार्मिक आणि नैतिक शिक्षण देण्याचे माध्यम आहे. याचा वापर ग्रामीण भागात शिक्षणाबद्दल लोकांमध्ये जाणीव जागृतीसाठी केला जातो प्रत्यक्ष जीवनातही किर्तनाचे महत्त्व आहे.

**तुमची प्रगती तपासा**

१) लोककलेचे वैशिष्ट्य लिहा.

२) तमाशाचे मुख्य आकर्षण कोणते?

३) लोकांमध्ये थिअेटर कशा प्रकारे जाणीव जागृती निर्माण करते?

४) किर्तनातील महत्त्वपूर्ण घटक लिहा.

## ३ क.८ समवयस्क गट

समवयस्क समूह हा अशा व्यक्तींचा समूह आहे कि जे शिकण्यासाठी एकत्र येतात तसेच एकमेकींच्या अभ्याससवयीचा अभ्यास करतात.

सामाजिक शास्त्रात, जे लोक काही सामाजिक वैशिष्ट्यांनुसार सोबत असतात जसे सामाजिक दर्जा, अभिरूची व वय इ. चे सामाजिक वर्तन, सामाजिकीकरणातील शालेय मित्र, सह-कामगार यांचा अभ्यास यात अपेक्षित आहे.

अशा लोकांचा समूह कि जे काही सामाजिक वैशिष्ट्यांची देवाण घेवाण करतात उदा. वय, वर्ग, व्यवसाय, शिक्षण आणि समानतेच्या पातळीवर आंतरक्रिया करतात. प्रत्येक व्यक्ती ही अनेक समवयस्क गटाची सदस्य असते यांत मित्र, वर्गमित्र आणि सह-कामगार यांचा समावेश होतो. समवयस्कांचा समूह हा सामाजिकीकरणात महत्त्वपूर्ण आहे.

समुहगटास कोणत्याही विषयाच्या अनुषंगाने खालील गोष्टींची आवश्यकता भासते ती खालीलप्रमाणे

- सर्व स्तरावरील सुरूवातीच्या अभ्यासक्रमाची तयारीची आवश्यकता
- विविध अध्ययनकर्त्याच्या वेगळेपणाचे प्रवाह
- सल्लामसलत, संपर्क आणि पाठिंबा

एकत्र अध्ययनासाठी समवयस्क समुह मदत करतात. समूहातील प्रत्येक जण एकमेकांच्या संपर्कात असेल तर ते त्याच विचारांची देवाणघेवाण, मते, अभ्यास सवयी इ. ची अदलाबदल करू शकतात. त्याचा फायदा त्यांना अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्याशी होतो.

## ३ क.९ सारांश

या घटकातील अध्यनाचे मुद्दे पुढीलप्रमाणे

- शिक्षणाच्या वाहिन्या - औपचारिक, अनौपचारिक आणि न-औपचारिक. औपचारिक शिक्षण शैक्षणिक संस्थांद्वारे एका विशिष्ट रचनेत पुरविले जाते. अनौपचारिक शिक्षणास कोणत्याही विशिष्ट वेळेचे आणि जागेची गरज नसते. तर न-औपचारिक शिक्षण शैक्षणिक प्रक्रियेत लवचिकता आणि मुक्तपणा आणते.
- लोकांना शिक्षित करण्यासाठी आपण विविध न-औपचारिक वाहिन्या आणि त्याचा लोकांवरील प्रभाव याची चर्चा केली आहे.
- लोकांची मते स्पष्ट करण्याासाठी प्रेस (मुद्रणालय) हे सर्वात अधिकारपूर्ण समूह संप्रेषणाचे माध्यम आहे.
- छापील साहित्य उपयोग हा विविध दूरस्थ शिक्षण प्रणालीच्या प्राथमिक संस्थात्मक आदाम माध्यम म्हणजे छापील साहित्य.
- सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाच्या शिक्षकासाठी सर्वात उपयुक्त माध्यम म्हणजे रेडिओ कार्यक्रम विकसनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे लोकांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रेरणा देणे.

- दूरदर्शन हा महत्त्वपूर्ण उपयुक्त माध्यम आहे. याची परिणामकारकता परिस्थितीवर अवलंबून आहे.
- माहितीचे अधिकारपूर्ण स्त्रोत म्हणजे शैक्षणिक चित्रपट आणि डॉक्युमेन्टरी चित्रपट होय.
- विविध लोककला माध्यम जसे तमाशा, थिअेटर, किर्तन हे समाजातील दुर्बल लोकांच्या शिक्षणासाठीचे उत्तम माध्यम आहे.

## स्वाध्याय

१) न-औपचारिक शिक्षण म्हणजे काय? त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) न-औपचारिक शिक्षण कार्यक्रमाचे विविध प्रकार सांगा आणि कोणास उपयुक्त आहे त्याची नावे लिहा.

३) शिक्षण देण्यासाठीची रेडिओची भूमिका स्पष्ट करा.

४) शास्त्र अध्यापनासाठी दूरदर्शन अधिक उपयुक्त आहे याचे सोदाहरण स्पष्टीकरण करा.

५) शिक्षणाचे परिणामकारक समूह माध्यम म्हणून प्रेस (मुद्रणालय) ची भूमिका लिहा.

♦ ♦ ♦

# घटक -४
# शिक्षणाच्या राष्ट्रीय, राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिका

**घटक सरंचना**

४.१ उद्देश

४.२ शिक्षणाच्या संस्थाचा अर्थ

४.३ शिक्षण विभाग,भारत सरकार

४.३.१ शालेय शिक्षण व साक्षरता खाते

४.३.१(अ) प्राथमिक शिक्षण - सर्व शिक्षा अभियान

४.३.१(अ) सारांश

४.३.२ (ब) माध्यमिक शिक्षण

४.३.१ (ब).१ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी)

४.३.१(ब).२केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.)

४.३.१(ब).३ केंद्रीय विद्यालय संघटन (के.व्ही.एस.)

४.३.१(ब).४ नवोद्य विद्यालय समिती (एन.व्ही.एस.)

४.३.१(ब).५ केंद्रीय तिबेटी शालेय प्रशासन (सी.टी.एस.ए.)

४.३.१(ब).६ राष्ट्रीय मुक्त शाळा संस्था (एन.आय.ओ.एस.)

४.३.१(ब).७ राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठान (एन.एफ.टी.डब्ल्यू.)

४.४ विद्यापीठ अनुदान मंडळ (यु.जी.सी.)

४.५ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी.)

४.६ राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई.)

४.७ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एस.सी.ई.आर.टी.)

४.८ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण परिषद (डी.आय.इ.टी.)

४.९ संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (युनेस्को)

## ४.१ उद्देश

हा घटक वाचल्यानंतर तुम्हाला खालील गोष्टी शक्य होतील.

- ‘ शिक्षणाच्या संस्थांची ’ व्याख्या करणे.
- शिक्षणाच्या प्रत्येक संस्थांच्या व्याप्तींचे पृथक्करण करणे.
- शिक्षणाच्या प्रत्येक संस्थांच्या भूमिकांचे वर्णन करणे.
- शिक्षणाच्या विविध संस्थांच्या प्रकाराची तुलना करणे.

## ४.२ शिक्षणाच्या संस्थांचा अर्थ

शिक्षणाच्या प्रतिनिधी संस्था म्हणजे सरकारी किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेचा प्रशासकीय विभाग ज्याला समाजाच्या भल्यासाठी शैक्षणिक कृती टिकावू पद्धतीने राबविण्यासाठी व उन्नती करण्यासाठी अधिकार प्रदान केलेले आहेत.

## ४.३ शिक्षण विभाग, भारत सरकार

भारत सरकारने सर्व संबंधित उपकरणे व प्रतिनिधि कार्यालये जी नागरिकांच्या बालपणापासून त्याच्या जिवनभरच्या एकत्रित विकासात योगदान देतात व जबाबदार असतात त्यांना एकच सर्वोच्च मंडळाखाली आणण्यासाठी २६ सप्टेंबर, १९८५रोजी मानव संसाधन विकास मंत्रिमंडळाची निर्मिती केली.

या मंडळाचे दोन विभाग आहेत. -

१) शालेय शिक्षण व साक्षरता विभाग जो प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण व साक्षरता यावर देखरेख ठेवतो. आणि

२) उच्च शिक्षण विभाग जो विद्यापीठ व उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, पुस्तक संवर्धन व प्रकाशन, शिष्यवृत्ती, भाषा आणि अल्पसंख्यांक शिक्षण यावर देखरेख ठेवतो.

### ४.३.१ शालेय शिक्षण व साक्षरता विभाग :

हा विभाग प्रथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण व साक्षरता यावर देखरेख ठेवतो.

### ४.३.१ (अ)प्राथमिक शिक्षण :

सर्व देशभरातील मूलभूत शिक्षणाच्या मागणीच्या प्रतिसादार्थ शालेय पद्धतींच्या समाज मालकियतद्वारे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या प्रयत्नार्थ भारत सरकारने सर्व शिक्षा अभियान सुरु केले आहे.

**अशा प्रकारे सर्व शिक्षा अभियान म्हणजे:**

(अ) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासाठी एक स्पष्ट काल (वेळ) चौकट असलेला कार्यक्रम.

(ब) देशभरातील गुणात्मक मूलभूत शिक्षणाच्या मागणीचा प्रतिसाद.

(क) मूलभूत शिक्षणाद्वारे सामाजिक न्याय उन्नत करण्याची संधी.

(ड) पंचायत राज संघटना,शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामीण व शहरी गलिच्छ वस्तीस्तरीय शिक्षण समिती, पालक- शिक्षक संघटना, माता शिक्षक संघटना, जमात स्वायत्त परिषद आणि प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनातील इतर मूळ स्तरीय रचना यांच्या परिणामकारक सहभागाचा एक प्रयत्न.

(इ) देशभरातील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासाठी राजकीय इच्छाशक्तीची एक अभिव्यक्ती.

(फ) केंद्र, राज्य आणि स्थानिक सरकारमधील एक भागीदारी

(ग) राज्यांनी प्राथमिक शिक्षणाचा त्यांचा स्वतःचा दृष्टीकोन विकसित करण्याकरिता त्यांना लाभलेली एक संधी.

**म्हणून सर्व शिक्षा अभियानाचा उद्देश म्हणजे-**

(१) २०१० सालापर्यंत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना उपयोगी व संबधित प्राथमिक शिक्षण पुरविणे.

(२) शालेय व्यवस्थापनात समाजाच्या सक्रीय सहभागाने सामाजिक, धार्मिक आणि लैंगिक दरी साधणे.

(३) मुलांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणाविषयी अध्ययन करण्यास व प्रभुत्व मिळविण्यास अशा रितीने परवानगी देऊन की ज्यामुळे त्यांच्या अध्यात्मिक व भौतिक मानवी क्षमतांचा पुरेपूर वापर होईल.

(४) मूल्य आधारीत प्रक्रिया म्हणून जी मुलांना केवळ त्यांच्या स्वार्थी हेतूव्यतिरिक्त परस्परांच्या भल्यासाठी कार्य करण्याची संधी प्रदान करते.

तसेच सर्व शिक्षा अभियान बालपणातील काळजी व शिक्षण यांचे महत्व जाणते आणि ० ते १४ वयोगटाला अंखड म्हणून बघते. स्त्री व बालक विकास मंत्रालयाच्या प्रयत्नांना पूरक म्हणून एकात्मिक बालविकास सेवा (आय. सी.डी.एस.) केंद्रातील किंवा आय.सी.डी.एस. इतर क्षेत्रातील खास शालेय पूर्व केंद्रातील शालेय पूर्व अध्ययनाच्या पाठिंब्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

**सर्व शिक्षा अभियान चळवळीने खालील उद्दीष्ट गाठण्याचे ध्येय ठेवले आहे.**

(अ) २००५ पर्यंत सर्व मुलांची नाव नोंदणी, शिक्षण हमी केंद्र, पर्यायी शाळा, 'परत शाळेत' छावणी.

(ब) २०१० पर्यंत उच्च प्राथमिक पातळीपर्यंत सर्व मुलांचा शाळेत टिकाव.

(क) नाव नोंदणी, टिकाव आणि अध्ययनातील लैगिंक व सामाजिक वर्ग दरी सांधणे

(ड) प्राथमिक व उच्च प्राथमिक टप्प्यापर्यतची मुलाची अध्ययन संपादन पातळीतील पुरेश्या वाढीची खात्री करणे.

**त्यांचे उद्देश संपादन करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान चळवळ खालील बाबींना प्रोत्साहन देते.**

(अ) ज्ञानी समाजात मुलांना सक्रीय सहभागीदार होण्यासाठी अधिकार बहाल करणे.

(ब) सर्व पातळीवरील कामगिरी व निष्पत्ती प्रति उत्तद्वायित्वासह परिणामभिमुख दृष्टिकोन.

(क) शिक्षक, पालक, समाज, पंचायत राजसंस्था व स्वंयसेवी संघटना यासारख्या सर्व आधारस्तंभाच्या सहभागाने शैक्षणिक मध्यस्थीच्या अंमलबजावणीचा लोककेंद्रीत प्रकार.

(ड) एक समानता आधारीत दृष्टिकोन जो खास गरज असलेल्या मुलांसह शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले व फायदे न मिळालेल्या सामाजिक गंटाच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करतो.

(इ) प्राथमिक शिक्षण पध्दतीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अधिकार आणि पुढाकाराच्या केंद्रीकरणाच्या हमीचा एक पवित्र प्रयत्न.

(फ) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या करिता एक सततच्या प्रयत्नाच्या खात्री करीता संस्थांविषयक सुधारणा व क्षमता बांधणी.

**४.३.१(अ) १ सारांश :**

मुख्य जोर हा शाळा बाह्य मुलांना विविध डावपेचाद्वारे मुख्य प्रवाहात सामील करणे व ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना शालेय शिक्षणाची आठ वर्षे पुरविणे यावर आहे. लैगिंक व सामाजिक दरी साधणे व शाळेतील सर्व मुले टिकूण राहणे यावर सुद्धा जोर आहे. या चौकटीत असे गृहीत धरण्यात येते की शिक्षण पद्धती प्रसंगोचित बनेल जेणेकरून मुले व पालकांना शालेय पद्धती त्यांच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणानुसार उपयोगी व आकर्षक वाटेल.

मुलींचे शिक्षण आणि विशेषतः भटक्या जाती, भटक्या जमाती व अल्पसंख्याक मुलींचे ही सर्व शिक्षा अभियानाच्या प्रमुख कार्यापैकी एक आहे.

भटक्या जाती - जमातीतील (SC/ST) मुले, अल्पसंख्याक गट,शहरी वंचित मुले, इतर अलाभार्थी गटातील मुले यांचा समावेश व सहभागावर सुद्धा जोर आहे.

**४.३.१(अ) २ तुमची प्रगती तपासा - १**

१) सर्व शिक्षा अभियान म्हणजे काय?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२) सर्व शिक्षा अभियानाची (SSA) ध्येय धोरणे स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**४.३.१(ब) माध्यमिक शिक्षण:**

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग माध्यमिक शिक्षणाशी संबंधित खालील प्रतिनिधि

कार्यालयाचा कारभार पाहतो.

**४.३.१(ब).१राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी.)(NCERT) :**

NCERT ही सर्वोच्च संसाधन संघटना आहे जी शालेय शिक्षणाशी संबधित अभ्यासविषयक बाबींवर केंद्र व राज्य सरकारला मदत करते व सल्ला देते. ही त्यांच्या विविध घटक भागाद्वारे शालेय शिक्षणाच्या दर्जात्मक सुधारणेसाठी अभ्यासविषयक व तांत्रिक पाठिंबा पुरविते. याचे विभाग म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक संस्था ,नवी दिल्ली,केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, नवी दिल्ली, पंडीत सुंदरलाल शर्मा केंद्रीय व्यावसायिक शिक्षण संस्था, भोपाळ आणि अजमेर, भोपाळ, भुवनेश्वर, म्हैसूर आणि शिलाँग स्थित स्थानिक शैक्षणिक संस्था.

**४.३.१(ब).२ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.)(CBSE):**

CBSE ही स्वायत्त संस्था असून ती MHRD च्या कृपाक्षत्राखाली कार्य करते. हे देशातील सर्वात जुने दुसऱ्या क्रंमाकाचे मंडळ असून याची स्थापना १९२९ साली झाली.

**CBSE चे मुख्य उद्देश पुढील प्रमाणे आहेत:**

१) देशातील व देशाबाहेरील संस्थांची जोडणी करणे.

२) १९ व१२वी अखेरीस वार्षिक परिक्षा राबविणे.

३) वैद्यकीस व इंजिनिअरींग महाविद्यालयातील प्रवेशाकरीता व्यावसायिक अभ्यासक्रमांकाच्या प्रवेश परिक्षा राबविणे.

४) अभ्यासक्रम अद्ययावत करणे व त्याची रचना करणे.

**४.३.१(ब)३ केंद्रीय विद्यालय संघटन(के.व्ही.एस.)(KVS) :**

स्थानांतरीय (बदली होणारे)केंद्र सरकारी नोकद्वारांच्या पाल्यांना अखंडीत शिक्षण पुरविण्यासाठी भारत सरकारने १९६२ साली केंद्रीय विद्यालयाच्या योजनेला मान्यता दिली.

**४.३.१(ब)४ नवोदय विद्यालय समिती (एन.व्ही.एस.) (NVS) :**

नवोदय विद्यालय समिती या स्वायत्त संघटनेकडून चालविली जातात.नवोदय विद्यालये ही पूर्णपणे निवासी सहशैक्षणिक संस्था असून ती उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण पुरवितात. नवोदय विदयालयातील शिक्षणामध्ये भोजन व निवास,पाठ्यपुस्तके,गणवेष, इ.सर्व गोष्टी विद्यार्थ्यांला मोफत दिल्या जातात. ही योजना १९८५ – ८६ मध्ये दोन प्रायोगिक शाळांसह सुरू झाली आणि तिचा विस्तार आता ५४० शाळापर्यंत झाला असून त्यात ३४ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश असून त्यांच्या पटावर १.७६ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी आहेत. दरवर्षी ३०,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. कनिष्ठ नवोदय विद्यालयात इयत्ता ६वीच्या वर्गात प्रवेश दिला जातो. यासाठी संबंधित जिल्ह्यात राबविलेल्या चाचण्यांचा आधार घेतला जातो. यासाठी जिल्ह्यातील कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून ५वी पास असलेली सर्व मुले परिक्षा देण्यास पात्र असतात. ही चाचणी CBSE द्वारे

रचलेली असते व राबवली जाते.

### ४.३.१(ब)५ (CTSA) केंद्रीय तिबेटी शालेय प्रशासन (सी.टी.एस.ए.) :

केंद्रीय तिबेटी शालेय प्रशासनाची स्थापना भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली १९६१ साली एक स्वायत्त संघटना म्हणून झाली आणि तिची नोंदणी भारतातील तिबेटी मुलांच्या शिक्षणासाठी स्थापलेल्या संस्था चालविणे, त्यांचे व्यवस्थापन पाहणे व त्यांना मदत करण्याच्या हेतूने सामाजिक नोंदणी कायदा XXI, १८६०च्या अन्वये झाली. तिबेटीय संस्कृती आणि वारसा जतन करून व उन्नत करून त्यासह आधुनिक शिक्षण पुरविण्याच्या हेतूने भारतातील तिबेटीय लोकसंख्येचे अधिक्य असलेल्या ठिकाणी शाळा उभारल्या गेल्या.

### ४.३.१(ब)६ राष्ट्रीय मुक्त शाळा संस्था(एन.आय.ओ.एस.) (NIOS) :

भारत सरकारद्वारा १९८९साली राष्ट्रीय मुक्त शाळा स्थापित केल्या गेल्या.याचा उद्देश जे नियमितपणे शाळेत हजर राहू शकत नाही त्यांना मुक्त व दूर अध्ययनाद्वारे ODL पुरविणे हा आहे. याच्या आरंभापासून एन.आय.ओ.एस.ने देशभरात मुक्त अध्ययन पद्धतीद्वारे शालेय शिक्षणाच्या संपूर्ण कक्षा उन्नत करण्याची जबाबदारी पार पाडत आहे.मुक्त शाळेतील दर्जा निश्चित करणे, नविन उपक्रमावर प्रयोग करणे,व्यावसायिक संसाधन पाठबळ व कौशल्याशी संबधित राज्यस्तरीय संघटनांना मदत करणे आणि परिक्षण केलेले नविल उपक्रम ,अभ्यासक्रम व साहित्यांचा प्रसार करणे यासाठी (NIOS) ने वैशिष्ट्यपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

### ४.३.१(ब) ७राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठान :

राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठानाची स्थापना १९६२ साली चॅरिटेबल एन्डोवमेंट ॲक्ट १८९० च्या खाली झाली. या प्रतिष्ठांचा मुख्य हेतू म्हणजे जे शिक्षक गरिब परिस्थितीत असू शकतात त्यांना आर्थिक मदत पुरविणे. या प्रतिष्ठानद्वारे सर्व भारतभर शिक्षकांच्या कल्याणासाठी खालील योजना कार्यान्वित आहेत.

१) शिक्षण सदन निर्मितीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

२) शालेय शिक्षकांच्या मुलांच्या व्यासवसायिक शिक्षणासाठी पाठिंबा दिला जातो.

३) गंभीर स्वरूपाचा आजार असलेल्या शिक्षकांना आर्थिक मदत (वैद्यकीय)दिली जाते.

४) अभ्यासकृतीसाठी शिक्षकांना आर्थिक पाठिंबा उपलब्ध केला जातो.

या प्रतिष्ठानाच्या निधीत सदस्य राज्ये व केंद्रशासित प्रदेशाद्वारे प्राप्त झालेले योगदान व तसेच केंद्रसरकारकडून मिळालेले प्रारंभिक योगदान यांचा समावेश होतो.

### ४.३.१(ब).८ तुमची प्रगती तपासा.२

१) CBSE मंडळाच्या मुख्य हेतूंची यादी करा.

____________________

____________________

____________________

____________________

**२)टिपा लिहा.**

अ) NCERT

ब) KVS

क) NVS

ड) CTSA

इ) NIOS

फ) NFTW

## ४.४ विद्यापीठ अनुदान मंडळ (UGS)

### ४.४.१विद्यापीठ अनुदान मंडळाची उत्पत्ती (UGS) :

भारतीय इतिहासात उच्चशिक्षणाने नेहमीच प्रमुख स्थान व्यापले आहे. प्राचीन भारतातील उच्चशिक्षणाची केंद्रे जसे नालंदा, तक्षशीला आणि विक्रमशीला विद्यापीठे यापासून ते आधुनिक युगातील विद्यापीठापर्यंत, भारत जगातील एक सर्वात मोठी उच्च शिक्षण पद्धती जोपासतो .

उच्च शिक्षणाच्या आधुनिक पध्दतीचे मुळ माऊंट स्टुअर्स एल्फिन्स्टोन च्या १८२३

चे मिनिट मध्ये आहे जो इंग्रजी व युरोपियन विज्ञान शिकवण्यासाठी शाळा स्थापन करण्याच्या गरजेवर जोर देतो. तथापी १८३५ मध्ये लॉर्ड मॅकौलरी ने सल्ला दिला ''देशाच्या मूळ नागरिकांना पूर्णपणे चांगले इंग्रजी विद्वान बनवण्यासाठीचे प्रयत्न ''. त्यानंतर सर चार्लस वूड चा अहवाल, ज्याला '' भारतातील इंग्रजी शिक्षणाचा मॅग्ना कार्टा ''सुद्धा म्हणतात,याने प्राथमिक शाळेपासून विद्यापीठापर्यंत स्पष्टरचित शिक्षणाची मुलभूत योजना सुचविली .परिणामतः कलकत्ता (कोलकत्ता), बॉम्बे (मुबंई) आणि मद्रास (चेन्नई) या ठिकाणी १८५७मध्ये विद्यापीठे स्थापन झाली व पाठोपाठ १८८७ मध्ये अलाहाबाद विद्यापीठाची स्थापना झाली.

आंतरविद्यापीठ मंडळाची (यालाच नंतर भारतीय विद्यापीठ संघटना संबोधले गेले) स्थापना १९२५ साली झाली. जेणेकरून विद्यापीठ कृतींची,माहितीची देवाणघेवाण करून आणि शिक्षण,संस्कृती,खेळ व संबंधित क्षेत्रे या क्षेत्रात सहकार्य करून उन्नती होईल.

सन १९४४ मध्ये भारतातील राष्ट्रीय शिक्षण पध्दती सुत्रबद्ध करण्याचा पहिला प्रयत्न भारतातील युद्धोत्तर शैक्षणिक विकासावर (यालाच सार्जंट रिपोर्ट सुद्धा म्हणतात)केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या अहवालावर आधारित झाला. या अहवालाने अलिगढ,बनारस व दिल्ली च्या तीन केंद्रीय विद्यापीठाच्या कार्यावर देखरेखीसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाची निर्मिती सुचविली. अशा प्रकारे विद्यापीठ अनुदान मंडळ १९४५ मध्ये उदयास आले. १९४७ साली या समितीला तेव्हा अस्तित्वात असलेल्या सर्व विदयापीठांवर देखरेख करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

स्वातंत्र्यानंतर १९४८ साली ,डॉ. एस राधकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण समितीची खास करून '' भारतीय विद्यापीठातील शिक्षणावर अहवाल देणे आणि देशाच्या सद्य व भावी गरजा व आकांक्षांना योग्य असलेल्या इष्ट सुधारणा व विस्तार सुचविणे'' यासाठी स्थापना झाली. या समितीने शिफारस केली की युनायटेड किंगडमच्या विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सामान्य स्वरूपावर आधारित विद्यापीठ अनुदान मंडळात एक पूर्ण वेळ अध्यक्ष आणि विख्यात शिक्षण तंज्ञांमधून इतर सदस्यांची नेमणूक करणे याचा समावेश असावा.

१९५२ मध्ये,एकीकृत भारत सरकारने ठरविले की अनुदान देण्याशी संबंधित व केंद्रीय विद्यापीठे,इतर विद्यापीठे व उच्च अध्ययनाच्या संस्था यांना मिळणाऱ्या लोक निधी ची मदत यांच्याशी संबंधित सर्व घटना विद्यापीठ अनुदान मंडळाकडे वर्ग केल्या जाऊ शकतात.याचाच परिणाम म्हणून विद्यापीठ अनुदान मंडळाचे औपचारिक उद्घाटन २८डिसेंबर, १९५३ रोजी तेव्हाचे शिक्षण, नैसर्गिक संसाधन व वैज्ञानिक संशोधन मंत्री कै.श्री.मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या हस्ते झाले.

नोव्हेंबर १९५६ मध्ये UGC ची भारत सरकारचे कायदेशीर मंडळ म्हणून संसद कायद्यान्वये भारतातील विद्यापीठ शिक्षणाच्या दर्जाचा समन्वय निर्धार व टिकाव यासाठी औपचारिक स्थापना करण्यात आली. UGC ची सहा प्रादेशिक केंद्रे पुणे, हैद्राबाद, कोलकता, भोपाळ, गुवाहटी आणि बंगळूर येथे आहेत. मुख्य कार्यालय नवी दिल्ली स्थित आहे.

**४.४.२ UGC चे उद्देश :**

UGC चे ध्येय म्हणजे 'सर्वांसाठी गुणात्मक उच्च शिक्षणाची हमी"

**४.४.३ UGC ची कार्ये :**

**१) गुणात्मक अध्यापन :**

UGC चे मुख्य जोर देण्याचे क्षेत्र म्हणजे पदवी व पदव्युत्तर अशा दोन्ही पातळीवरील गुणात्मक अध्यापन हे अभ्यास विषयक तसेच महाविद्यालय व विद्यापीठातील उपलब्ध पायाभूत मांडणी यामध्ये अस्तित्वात असलेली विषमता दूर करण्याचा प्रयत्न करते म्हणून हे माहितीचे जाळे स्थापन करण्यावर जोर देत आहे. जेणेकरून बहु माध्यम साहित्य ,कम्पुटर ग्राफीक्स, मदत साहित्य संदर्भ साहित्य या द्वारे अध्यापन व अध्ययन प्रक्रियेला पाठबळ मिळेल. अशाप्रकारे वर्गातील अभ्यासविषयक पायाभूत मांडणी वाढेल.

UGC विद्यापीठे / विभाग यांना आधुनिक पद्धती, सामुग्री व ज्ञान यांचा मिलाफ असलेले विकसीत केंद्र स्थापन करण्यास निधी पुरविते. हे शिक्षकांनी त्यांचे ज्ञान अद्ययावत करण्याची नव्हे तर निरोगी कार्यसंस्कृती, सवयी विकसित करण्याची सुध्दा हमी देते. शिक्षण महाविद्यालय (ॲकॅडमीक स्टॉफ कॉलेजेस) जी UGC च्या छत्रछायेखाली कार्य करतात. ती अशाप्रकारे शिक्षकाच्या प्रशिक्षणाचे व कलआधारीत कृतीचे कार्य सतत व्यावसायिक रितीने हाती घेतात.

UGC एकत्रित कृती सुरू करण्यासाठी /भागीदारीसाठी विद्यापीठे / संस्था यांच्याशी आंतरराष्ट्रीय सहकार्य सुध्दा प्रस्थापित करते. शिक्षकांना शैक्षणिक दृष्ट्या चांगले व समृद्ध साहित्य निर्माण करण्यासाठी उत्तेजन व बक्षिसे दिली जातात.

**२) अभ्यासक्रम विकास :**

UGC प्रत्येक विषयातील अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमाचे त्याच्या अभ्यासक्रम विकसन केंद्रे व प्रत्येक विषयातील तज्ञ यांच्याद्वारे पुनरावलोकन करते व मजबूत करते.तसेच ते विषय कार्यशाळा व चर्चासत्रांना प्रखर पाठिंबा पुरविते ज्यामुळे शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या विषयातील अध्यापन अध्ययनातील नवीन दृष्टिकोन शोधून काढणे शक्य होते.

UGC कौशल्याभिमुख आणि मुल्यवर्धित उपयोगिता भिमुख प्रमाणपत्र /पदविका कार्यक्रम जे विद्यार्थी त्यांच्या इच्छेनूसार घेऊ शकतात. त्यांच्या सुधारणेसाठी उत्तेजन देते.

UGC हे शिक्षणाच्या पारंपारिक, मुक्त आणि खाजगी क्षेत्राच्या एकत्रिकरणाकरिता दुवा निर्मितीसाठी योजना आखते. भारतामध्ये बरीच अनियंत्रित खाजगी शिक्षण क्षेत्र हे आहेत ज्यांना त्यांच्या दर्जासाठी नियमित करणे व अधिकृत करणे सुध्दा जरूरी आहे अशाप्रकारे मागणी व समर्पकता चा प्रश्न उद्देशीला जातो.

UGC समाजातील वंचित वर्गासाठी (वेगवेगळे असमर्थ,अनुसुचित जाती/जमाती / वर्ग, धार्मिक अल्पसंख्यांक आणि स्त्रिया ) प्रशिक्षण व कौशल्य वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी उत्तेजनार्थ गोष्टी आणि ळउण कॅंम्पस मधील

निवास पुरविते.

वाङःमय व इतिहास, सामाजिक शास्त्रे आणि शुध्द शास्त्रे या क्षेत्रातील अध्यापन व संशोधनाला उन्नत करते हे आरोग्य, वार्धक्यशास्त्र, पर्यावरण, जैवतंत्रज्ञान,आपत्ती व्यवस्थापन, सरक्षण डावपेच, उपयोजीत समाजशास्त्र , तणाव व्यवस्थापन, जागतिक व्यापार संघटना आणि त्याचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम, विज्ञानाचा इतिहास, आशियन तत्वज्ञान आणि विषय तंज्ञानी सांगितलेली इतर क्षेत्रे यासारख्या शाखांवर जोर देते.

**३) श्रेष्ठतेची बढती :**

UGC हे विद्यापीठे /संस्थांना अध्यापन व संशोधनात उंची प्राप्त करण्यासाठी निवडकपणे पाठिंबा देते जेणेकरून पदव्युत्तर अध्यापन व संशोधनात गुणात्मक दर्जा प्राप्त करण्याकरिता वापरलेले तंत्र पदवी महाविद्यालयापर्यंत जाऊ शकेल. अशा प्रकारे निवडलेल्या विद्यापीठे संस्थांना ते कार्य दिलेल्या कालखंडात पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी दिला जातो.अशी विद्यापीठे / संस्था त्यांनतर त्या भागातील अग्रणी विद्यापीठे/संस्था म्हणून कार्य करतात.

तसेच UGC ज्या विद्यापीठे / संस्थोजवळ उत्कृष्टतेची क्षमता आहे त्यांना ओळखते व निधी बहाल करते.खास करून पदव्युत्तर शिक्षणाला पाठिंबा दिला जातो आणि पायाभूत मांडणीच्या सुधारणेसाठी आणि मजबूतीसाठी निधी बहाल केला जातो.

**४)शिफारसीतील वाढ / दर्जा वृद्धी :**

UGC एका उच्च शिक्षण पध्दतीला तोंड देते जेथे एक मुक्त व पारदर्शक इच्छा स्वामित्वाची व जबाबदारीची जाण जतन करते. अशा प्रकारे पध्दतीला विश्वसनीय व परिणामाभिमुख बनवते. म्हणून UGC स्वायत्ततेच्या संकल्पनेचा जोरदारपणे पाठपुरावा करते. फक्त शैक्षणिक स्वातंत्र्याचेच संवर्धन केले जात नाही तर प्रत्येक विद्यापीठ /संस्थेला त्यांच्या शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रात गुणांची कास धरण्याकरीता प्रवृत्त केले जाते. आणखी UGC सुचविते की संस्था / विद्यापीठांनी राष्ट्रीय मुल्यांकन व शिफारस परिषदेने (NAAC) राबविलेल्या मूल्यांकन व शिफारस प्रक्रियेचा अवलंब करावा. मुख्य जोर हा त्यांनी त्यांची ताकद व क्षमता तसेच कमकुवतपणा व रितेपणा ओळखण्यावर आहे. सर्व आर्थिक उत्तेजन हे शिफारस प्रक्रियेशी संबंधित आहे.

**५) सामाजिक बदलाची वाढ / वृध्दी :**

UGC संस्था / विद्यापीठांनी चालविलेल्या बाह्य कार्यक्रमाद्वारे सामाजिक बदलाचे सवर्धन करते. परिणामतः जीवनभराचे अध्ययन प्रौढ व निरंतर शिक्षण, स्त्रियांचे अध्ययन, पर्यावरण विषयक शिक्षण आणि मानवी अधिकार,खास करून सहज परिणाम होणाऱ्या गटांचे (मुले, वृध्द, स्त्रिया, सामाजिक दृष्ट्या अलाभार्थी) या स्वरूपात टिकवले जाते.

**६) संशोधनातील वाढ / वृध्दी :**

उच्च शिक्षण ही गतीशील प्रक्रिया असल्याने, संशोधनाला सक्रीय उत्तेजन दिले जाते. UGC ने सध्या अस्तित्वात असलेल्या अध्यापन व संशोधन कार्यक्रमाच्या आरंभासाठी व मजबूतीसाठी विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, संरक्षण संशोधन व विकास संघटना, जैवतंत्रज्ञान

विभाग,माहिती प्रसारण व तंत्रज्ञान मंत्रालय, वैज्ञानिक औद्योगिक संशोधन परिषद , अणु - उर्जा विभाग भारतीय अवकाश संशोधन संघटना अशा सरकारी कार्यालयाशी संधान स्थापलेले आहे. तसेच UGC विद्यापीठातील शिक्षकांना विज्ञान व तंत्रज्ञान व्यतिरिक्त उदारमतवादी कला (लिबरल आर्ट) , वाङःमय व इतिहास, सामाजिक शास्त्रे, साहित्य, अर्थशास्त्र, कायदा इ. या उगम पावणाऱ्या क्षेत्रात संशोधन प्रकल्प घेण्यास समर्थ करते. सर्व क्षेत्रातील आंतरीक शिक्षण संशोधनाला प्राधान्य दिले जाते. अधिक उपयोजिताभिमुख कार्य करण्याच्या व संशोधन निष्पत्तीच्या संरक्षणाच्या संस्कृतीचे संवर्धन केले जाते.

आंतर विद्यापीठ केंद्राची उदाहरणे - राष्ट्रीय विज्ञान केंद्र , नवी दिल्ली, खंगोलशास्त्र व खगोलभौतिकशास्त्राचे आंतरविद्यापीठ केंद्र , पुणे,UGC - DAE, इंदूर.

भारतातील प्रगत शिक्षण संस्था, शिमला, शैक्षणिक दळणवळण व्यापारी संघ, नवी दिल्ली, राष्ट्रीय मूल्यांकन व शिफारस संघटना, बंगळूर आणि माहिती व वाचनालय जाळे, अहमदाबाद.

**७) सर्वकष शिक्षणातील वाढ / वृद्धी :**

उच्च शिक्षणाच्या जागतिकीकरणाने, UGC ने असे धोरण विकसित केले आहे की ज्याद्वारे बाहेरील देशातील विद्यार्थ्यांचा भारतात मुक्त प्रवाह संवर्धित होईल. अशा प्रकारे परदेशी UGC विद्यार्थ्यांना भारतातील महाविद्यालये व विद्यापीठात 'परदेश शिक्षण' कार्यक्रमाद्वारे आणि प्रत्येक पदवी कार्यक्रमात काही विशिष्ट टक्के जागा राखीव ठेवून संधी उपलब्ध करतो.त्याच वेळेस भारतीय विद्यापीठांना 'वेब' आधारित शिक्षण व इतर देशात 'जूळे कार्यक्रम' सुरू करण्यास उत्तेजन दिले जाते.

**८) संसाधन पाया टिकविणे :**

UGC ने भारतीय विज्ञान संस्था, बंगळूर,स्त्रियांचे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई आणि महाराजा सयाजीराव विद्यापीठ, वडोदरा यांना वैज्ञानिक वाङःमय व सामग्री इलेक्ट्रॉनिक सामग्रीच्या स्वरूपात ठेवण्याचे भांडार सेवा करण्यासाठी राष्ट्रीय माहिती केंद्र म्हणून मान्यता दिली आहे. म्हणून भारतभरातील संशोधकांना विस्तृत प्रमाणावर माहिती उपलब्ध होते ज्यामुळे भारतातील संस्था / विद्यापीठे यामध्ये चालणाऱ्या संशोधनाचा दर्जा वाढतो.

**४.४.४ सारांश**

भारत सरकारचे एक सर्वोच्च मंडळ असलेले UGC हे खालील मुख्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करते.

१) शिक्षणाच्या दर्जात व पायाभूत मांडणीच्या विकासात सुधारणा

२) अभ्यासक्रमाची पुनर्रचना

३) शिक्षक महाविद्यालयीन शैक्षणिक स्टाफ चे प्रशिक्षण

४) NET (नेट) राबविणे.

५) NAAC द्वारे विद्यापीठे / संस्थांना मान्यता

६) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील संशोधनाला चालना देणे.

७) संशोधन प्रकल्प / शिष्यवृत्ती अंमलात आणणे.

८) निधी वाटप व संसाधनाचा सक्रीय उपयोग

९) बाह्य कार्यक्रम राबविणे

१०) विद्यापीठाचे नेटवर्कींग (एकत्रित कार्य व जुळणी)

**तुमची प्रगती तपासा - ३**

१) UGC ची कार्ये वर्णन करा.

---

---

---

---

## ४.५ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी)

### ४.५.१ परिचय :

NCERT ची स्थापना भारत सरकारद्वारा एक स्वायत्त संघटना म्हणून ६ जून, १९६१ रोजी नवी दिल्ली येथे झाली. याचा उद्देश म्हणजे शिक्षण व समाज कल्याण मंत्रालयाला केंद्रास व राज्यात अशा दोन्ही ठिकाणी, शिक्षणातील त्याच्या धोरणाची आणि विशेषत: शालेय शिक्षण व शिक्षकांच्या तयारीतील गुणात्मक बदलांच्या अंमलबजावणीसाठी मदत करणे व सल्ला देणे.

### ४.५.२संघटना घटनात्मक :

या परिषदेचा कारभार पाच कायदेशीर समीत्यांद्वारे चालतो त्या म्हणजे कार्यकारी समिती कारभारी परिषद (केंद्रशिक्षण मंत्री अध्यक्ष असतात), वित्तीय समिती,स्थापना समिती आणि कार्यक्रम सल्लागार समिती.

दुसऱ्या समिती जसे शैक्षणिक समिती , शैक्षणिक संशोधन व नाविन्य उपक्रम समिती आणि पाठ्यपुस्तकाच्या विकासासाठी राष्ट्रीय देखरेख समिती या परिषदेला विशिष्ट कृतींसाठी सल्ला देतात.

या परिषदेचे मुख्य कारभारी केंद्र, राष्ट्रीय शिक्षण संस्था दिल्ली स्थित आहे.हे महत्वाचे मंडळ आहे जे शैक्षणिक कार्यक्रमांचा पाठपुरावा करते ज्यात शैक्षणिक संशोधन, पाठ्यपुस्तकांचा विकास, नोकरीदरम्यान शिक्षकाचे प्रशिक्षण व विस्तार आणि माहितीचा प्रसार यांचा समावेश आहे.

ही परिषद अजमेर,भोपाळ, भुवनेश्वर, म्हैसूर आणि शिलाँग स्थित पाच प्रादेशिक शिक्षण संस्थांचा (RIES) सुद्धा कारभार पाहते.या संस्था प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी विविध कार्यक्रम प्रदान करतात.

दिल्लीतील NIE आवारात असलेली केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (CIET) शैक्षणिक तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रीत करते.मुलांसाठी श्राव्य,दृश्य व बहुविध माध्यम कार्यक्रम हे CIET येथे विकसित केले जातात व त्यांनतर त्यांचा मुलांसाठीचे दूरदर्शन व रेडिओ कार्यक्रम जसे ज्ञानदर्शन व ज्ञानवाणी या स्वरूपात प्रसार केला जातो. CIET ने भारतीय अंतराळ संशोधन संघटना (ISRO) सोबत १९७० मध्ये शाळांसाठी SITE कार्यक्रम सुरू केला.अलिकडील काळात भारताच्या शैक्षणिक उपग्रह तंत्रज्ञानाने (EDUSAT) संपूर्ण देशभरातील असंख्य शिक्षकांना टेलिकॉन्फरन्सिंग (टेलिफोन, टिव्ही, नेट द्वारे मदत केली आहे)

त्याचप्रमाणे भोपाळ स्थित पंडित सुंदरलाल शर्मा केंद्रीय व्यवसायिक शिक्षण संस्था (PSSCIVE) शिक्षण व व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील संशोधन विकास, प्रशिक्षण व विस्तार कार्यक्रमांच्या योंजना आखते.

### ४.५.३ NCERT ची कार्ये:

या परिषदेची स्थापना शैक्षणिक संशोधनाला चालना देणे,आदर्श पाठ्यपुस्तक निर्मिती करणे, शिक्षकांचे नोकरीपूर्व व नोकरी दरम्यान प्रशिक्षण राबविणे, राज्य शिक्षण खाते, विद्यापीठे आणि NGOS सोबत जुळणी करून कार्य करणे या हेतूने झाली.

यामुळे याने नवीन उपक्रमांचे सवर्धन केले आणि शालेय शिक्षणात गुणात्मक बदल घडवून आणले. बाल्यावस्थेतील शिक्षण, संशोधन आधारित मध्यस्ती, संस्थाविषयक योजना सर्व शिक्षा अभियान, पाठ्यपुस्तकांचा विकास आणि बुद्धिमान विद्यार्थ्यांची ओळख, पाठिंबा आणि संगोपनासाठी राष्ट्रीय प्रज्ञा शोध योजना यावर विस्तृत प्रमाणावर कार्य झाले आहे.

विद्यालयाचे सर्वसमावेशक सर्वेक्षण, व्यवसायाची सुरूवात, सेवापूर्व कर्मचाऱ्यांची राष्ट्रव्यापी भूमिका, विज्ञान शिक्षण, पर्यावरण शिक्षण आणि पोषण शिक्षण प्रकल्प तसेच आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी कार्यालयासोबत सहकार्याने प्राथमिक शिक्षण प्रकल्प तसेच आंतरराष्ट्रीय प्रतिनिधि कार्यालयासोबत सहकार्यांने प्राथमिक शिक्षण याने शालेय शिक्षणाच्या विविध अंगावर अर्थपूर्ण ठसा उमटवलेला आहे.

आणखी म्हणजे परिषदेद्वारे संपादित होणारी शैक्षणिक नियतकालिके, उदाहरणार्थ भारतीय शैक्षणिक परिक्षण, भारतीय शैक्षणिक नियतकालिक, प्राथमिक शिक्षक इ. ही भारतातील शालेय शिक्षणाचे दृष्टिकोन, मते आणि प्रघात सादर करतात.

शिक्षण सुधारणा व शालेय अभ्यासक्रमाच्या आधुनिकी करणासाठी वाहिलेली एक संशोधन संघटना म्हणून विविध शालेय  विषयाकरिता अभ्यासक्रमाचे अद्ययावतकरण व उजळणी हा या परिषदेच्या नित्य कार्य व जबाबदारीचा एक महत्वाचा भाग आहे.

या परिषदेने अध्यापन शास्त्र विषयक आणि एपिस्टेमॉलॉजिकल मुददयांवर खास करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (१९८६) बनविलेल्या शिफारशींच्या आधारावर १९८८,२००० व २००५ मधील ज्ञानाचे स्वरूप व त्याचा शाळेतील व्यवहाराच्या संबंधाने, अभ्यासक्रम चौकट विकसित केली आहे. मुख्य जोर हा अभ्यासक्रम विषयक ओझे ,मुलगा केंद्रीत शिक्षण, अनोन्य व आनंदी अध्यापन आणि शाळाबाह्य जीवनाशी शिक्षणाची जुळवणूक

यावर दिलेला आहे.

### ४.५.४ सारांश

अशा प्रकारे NCERT खालील कृती अवलंबित, जसे :

अ) NCERT शिक्षणाच्या सर्व शाखांमधील संशोधनाला मदत करते, चालना देते व समन्वय राखते.

ब) NCERT शिक्षकांसाठी प्रगत स्तरावर सेवा पूर्व व सेवा दरम्यान प्रशिक्षण आयोजिते.

क) NCERT शैक्षणिक संशोधन व शिक्षक प्रशिक्षणात गुंतलेल्या संस्थासाठी विस्तार सेवा आयोजिते.

ड) NCERT शाळेतील सुधारित तंत्रे व सराव विकसित करते व त्यांचा प्रसार करते.

इ) NCERT राज्य शिक्षण विभाग विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्थांना शिक्षणाच्या पुढील विकासासाठी सहकार्य करते व मदत करते.

फ) NCERT ही शैक्षणिक संशोधनाला व शिक्षणातील कर्मचाऱ्यांच्या प्रगत व्यावसायिक प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी पुस्तके, साहित्य,नियतकालिके आणि इतर साहित्य तयार करते व प्रकाशित करते.

**तुमची प्रगती तपासा.**

१) NCERT ची भूमिका वर्णन करा.

---

---

---

---

## ४.६ राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई.) NCTE

### ४.६.१ परिचय :

NCTE ची प्रथम स्थापना १९७३ साली केंद्र व राज्य सरकारसाठी शिक्षक शिक्षणाशी सर्व संबंधित बाबींवर सल्लागार मंडळ म्हणून सेवा देण्यासाठी झाली.तथापि, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ आणि त्या खालील कृती कार्यक्रमाने शिक्षक शिक्षणाच्या पद्धतीची मुळापासून दुरूस्ती करण्यासाठी आवश्यक संसाधनासह एक वैधानिक मंडळ विचारात घेतले. अशा प्रकारे शिक्षक शिक्षण कायद्याच्या राष्ट्रीय परिषदेच्या (१९९३) पाठपुराव्यासाठी १७ ऑगस्ट,१९९५ रोजी NCTE एक वैधानिक मंडळ म्हणून उदयास आले.

### ४.६.२ NCTE चे उद्देश :

१) सर्व देशभर शिक्षक शिक्षण पद्धती सुनियोजित व समन्वयीत विकास गाठणे.

२) शिक्षक शिक्षण पद्धती व त्याच्याशी संबंधित बाबीचे प्रमाण व दर्जा नियंत्रित करणे व टिकविणे.

### ४.६.३ संघटनात्मक रचना:

NCTE चे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे व चार प्रादेशिक समिती बंगळूर,भोपाळ,भुवनेश्वर आणि जयपूर येथे आहे. तसेच यांच्या कारभारविषयक व शैक्षणिक शाखासुध्दा आहे. कारभारविषयक शाखा ही वित्त, संस्था स्थापन व कायदेशीर बाबींशी निगडित आहे तर शैक्षणिक शाखा संशोधन, धोरण योजना, देखरेख, अभ्यासक्रम, नविन उपक्रम, समन्वय, वाचनालय व दस्तऐवजीकरण आणि सेवा दरम्यानचे कार्यक्रम यांच्याशी निगडीत आहे. NCTE च्या मुख्यालयाचे कार्यकारी प्रमुख अध्यक्ष असतात तर प्रत्येक प्रादेशिक समितीचे प्रमुख प्रादेशिक संचालक असतात.

### ४.६.४ NCTE ची कार्ये:

NCTE शिक्षक शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांवर देखरेख करते ज्यामध्ये शाळेतील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक टप्पे आणि अनौपचारिक शिक्षण, अंशकालीन शिक्षण, प्रौढ शिक्षण व दूर-शिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश होतो.

### ४.६.५ सारांश:

अशा प्रकारे NCTE शिक्षक शिक्षणातील विकासाच्या योजना आखते व समन्वय ठेवते आणि नवीन उपक्रम सुरू करते. तसेच ते शिक्षक शिक्षणातील दर्जा टिकविण्यासाठी नियंत्रण कार्य पार पाडते.

**तुमची प्रगती तपासा.**

१) NCTE वर टीप लिहा.

---

## ४.७ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद एस.सी.ई.आर.टी.)SCERT

### ४.७.१ परिचय :

SCERT शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळेद्वारे नाविन्य पूर्ण उपक्रमाशी शिक्षकांना अवगत करून शालेय शिक्षण क्षेत्रात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

### ४.७.२ कार्ये :

SCERT शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात महत्वाची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करते. म्हणून SCERT खालील कार्ये पार पाडते.

१) शिक्षक, कारभारी (प्रशासक) व शिक्षक अध्यापकांसाठी सेवा कार्यकाळात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिते.

२) नवीन शैक्षणिक तंत्रे व पद्धत शास्त्रे अंमलात आणते.

३) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण परिषदेशी (DIET) समन्वय राखते व मार्गदर्शन करते.

४) राज्य शिक्षण परिषद, स्थानिक शिक्षण संस्था, NCERT, शैक्षणिक योजना व प्रशासन संस्था (NIEPA) आणि शैक्षणिक सल्लागार भारत लिमिटेड (EDCIT) यांच्याशी समन्वय राखते.

५) राज्यातील उद्योजकता विकास संस्थाद्वारे (IED) शाळेतील व शाळाबाह्य दुर्बल मुलांना ओळखणे.

६) मार्गदर्शन व सल्ला केंद्राद्वारे शिक्षक व विद्यार्थ्यामध्ये मार्गदर्शन व सल्ल्याच्या गरजेविषयी जाण निर्माण करणे.

७) शैक्षणिक समस्याचे निदान करते व उपचार शोधते.

८) अध्यापन अध्ययन साहित्य विकसित करते.

९) शैक्षणिक मूल्यमापनात शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा चे आयोजन करते.

१०) राज्यस्तरीय विद्यान प्रदर्शन आयोजिते व वैज्ञानिक वृत्तीला उत्तेजन देण्याचा प्रयत्न करते.

११) विविध पातळीसाठी कार्यानुभव अभ्यासक्रम विकसित करते.

१२) शाळेत संगणक साक्षरता लोकप्रिय करते.

१३) अलिकडील प्रगतीच्यानुसार पाठ्यपुस्तकांचे परिक्षण करते.

१४) पर्यावरण जाण निर्मितीसाठी शिक्षकांसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम आयोजिते.

१५) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सॉफ्टवेअर विकसित करते.

१६) रेडिओ व टीव्ही वरून प्रसारित करण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम तयार करते.

१७) वर्गातील ICT व दृकश्राव्य साधनांच्या वापराचे शिक्षकांना प्रशिक्षण देते.

१८) शिक्षणासोबत कला व संस्कृतीच्या एकीकरणासाठी प्रकल्प राबविते.

१९) शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय एकीकरण कॅम्पस आयोजिते.

२०) राज्यस्तरीय परिक्षा पार पाडते.

२१) लैंगिक सचेतनातील प्रशिक्षणासाठी साहित्य विकसित करते.

२२) प्राथमिक वर्गांसाठी मुल केंद्रीत, स्वस्त आणि परिणामकारक अध्यापन अध्ययन साहित्य विकसित करण्यासाठी कार्यशाळा राबवते.

### ४.७.३ सारांश :

अशा प्रकारे SCERT ही शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळेद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रमांशी शिक्षकांना अवगत करून शालेय शिक्षण क्षेत्रात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

**तुमची प्रगती तपासा - ६**

१) SCERT ची भूमिका विषद करा.

## ४.८ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण परिषद (डी.आय.ई.टी.) DIET

### ४.८.१ परिचय :

शिक्षक शिक्षणाची केंद्र पुरस्कृत योजना १९८७-८८ मध्ये सुरू झाली.या योजनेने सध्या अस्तीत्वात असलेल्या प्राथमिक शिक्षक शिक्षण संस्थाचा दर्जा वाढवून DIETS च्या स्थापनेवर किंवा जेथे शक्य असेल तेथे ETEIS आणि आवश्यकतेनुसार नवीन DIETS च्या स्थापनेवर लक्ष केंद्रीत केले.

असे ठरविण्यात आले की एका जिल्ह्यात २५०० शिक्षक असलेली एक DIET स्थापित केली जावी जेणेकरून प्राथमिक शालेय शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल व प्राथमिक शिक्षण उन्नत होईल. सध्या अस्तित्वात असलेली ETIES चा दर्जा वाढवून त्यांचे रूपांतर DIETS मध्ये करावे.

DIET पद्धती व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरण योजनेसह सर्व भारतभर पसरण्यासाठी रचिली गेली ज्यामुळे खरीखरी वर्ग परिस्थिती प्रतित होईल आणि स्थानिक जमातींच्या जीवनाशी अर्थपूर्ण असेल.

### ४.८.२ कार्ये :

DIET  ची कार्ये चार गटात वर्गीकृत केली जाऊ शकतात.

**१) प्रशिक्षणाचे विकसन, संघटन, व्यवस्थापन व पर्यवेक्षण :**

शिक्षक शिक्षण ही एक सततची प्रक्रिया असल्याने तिचे सेवापूर्व व सेवा दरम्यान असे वर्गीकरण केले जाऊ शकत नाही. DIETS ला मानवी व साहित्य संसाधनाद्वारे सुसज्ज केल्याने शिक्षणाचा जिल्हास्तरीय दर्जा उंचावतो. प्रौढ शिक्षण कर्मचारी व प्राथमिक शालेय शिक्षकाच्या प्रशिक्षणाने सर्वकक्ष प्राथमिक शिक्षण संपादणे सुलभ होते. DIET प्राथमिक शिक्षणाची औपचारिक व अनौपचारीक अशी दोन्ही प्रतिनिधी कार्यालये एकत्रित करते जेणेकरून समान दर्जा निश्चित होतो व त्याची खात्री होते. इतर जिल्हास्तरीय विभाग जे सुद्धा प्राथमिक शिक्षणावर देखरेख ठेवतात त्यांच्यासोबत DIET त्यांच्या कार्याचा समन्वय साधते. DIET मूल्यमापन व उच्चअधिकारी मंडळाशी ऐक्य साधण्यासाठी सहकार्य सुद्धा करते आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाशी संबंधित योजना तयार करते.

DIET ला शिक्षक व प्रशिक्षकाशी संबंधित गरजांचे सर्वेक्षण करण्याची आणि गरजेनुसार प्रशिक्षण नमुना गढीत करण्याची स्वायत्तता आहे. अशा प्रकारे DIET जिल्ह्याच्या खालील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण पुरविते.

- प्राथमिक शालेय शिक्षक (सेवा पूर्व व दरम्यान).
- शाळा व शाळा समूहांचे मुख्य (केंद्र) आणि समूह (क्लस्टर) व विभागीय स्वरावरील शिक्षणाधिकारी
- प्रौढ शिक्षणाचे निर्देशक व पर्यवेक्षक.
- जिल्हा शिक्षण परिषदेचे सदस्य, सामाजिक पुढारी, स्वयं सहायता गटाच्या स्त्रिया, शैक्षणिक कार्यक्रमात गुंतलेले तरूण व स्वंयसेवक.
- संबंधित संसाधन व्यक्ती ज्यांचा वापर DIETS द्वारे त्यांच्या कार्यक्रमासाठी केला जाऊ शकतो.

**२) शैक्षणिक संसाधन पाठबळ :**

DIET जिल्हा स्तरिय प्राथमिक शाळा व प्रौढ शिक्षण केंद्राना शैक्षणिक सेवा, संसाधन व सल्ला खालील स्वरूपात पुरविते.

- विस्तार सेवा.
- निर्देशक व शिक्षकांसाठी संसाधन केंद्र.
- अध्यापन अध्ययन साहित्य व मूल्यमापन साधने.
- औपचारीक व अनौपचारीक शैक्षणिक संस्थासाठी मूल्यमापन केंद्रे.
- राज्यस्तरीय प्रतिनिधी कार्यालयांना सामग्री, सॉफ्टवेअर इ.स्वरूपात संसाधन पाठबळ.
- प्रगत तंत्रज्ञान संसाधन पाठबळ.

**३) DIETS एक संशोधन केंद्र म्हणून:**

भविष्यात निर्माण होणाऱ्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी DIETS ने नेहमी तयारीत असणे गृहीत धरले असल्याने, DIETS ला बदलत्या परिस्थितीची एक सखोल जाण स्वतः विकसित करावयास हवी. ही जाण तेव्हाच विकसित होऊ शकते. जेव्हा त्या संस्था प्राथमिक शिक्षणात संशोधन कार्य हाती घेतात आणि कृतीशील संशोधनासाठी शिक्षकांना उत्तेजन देतात जेणेकरून शालेय कृतीदरम्यान घडणाऱ्या समस्या सोडविल्या जातील. अशा प्रकारे DIETS च्या दैनंदिन नियमित कार्यात संशोधन समाविष्ट आहे.

**४) संकीर्ण (विविध) :**

वरील कार्ये पार पाडत असतांना खालील कृती घडून येतात.

- शाळांतील दिल्या जाणाऱ्या अध्ययनाची नियमित देखरेख.
- विशिष्ट स्थानिक आवकच्या मदतीने परिणामकारक देखरेख यंत्रणा विकसित करणे.
- विभागाने सुरू केलेल्या / अंमलात आणलेल्या योजना व कार्यक्रमांचे मूल्यमापन करणे. [यामध्ये सामग्री (गुणात्मक व अंकात्मक दोन्ही ) गोळा करणे, सामग्रीची योग्य मांडणी, पृथकरण आणि निष्कर्ष, अहवाल देणे, शिफारशी व सूचनांचा समावेश होतो.]

- प्राथमिक शिक्षणाच्या उन्नतीमध्ये सामिल असलेल्या प्रतिनिधि कार्यालयांशी समन्वय साधणे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पावर परस्परक्रिया साधणे आणि जमातीच्या क्षमतेच्या बांधणीसाठी व विकासासाठी नवीन प्रकल्प राबवणे.
- सर्व राबविलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागाची भूमिका बजावणे.
- विविध विभागीय परिक्षा घेणे.
- B.ED व D.ED. च्या केंद्रीकृत प्रवेशासाठी एक मध्यवर्ती प्रतिनिधी कार्यालय म्हणून कार्य करणे.

**४.८.३ सारांश :**

अशा प्रकारे DIET ची सर्व प्राथमिक शिक्षण संपादण्यासाठी प्राथमिक प्रशिक्षण सुधारण्यासाठी कार्य करते .

**तुमची प्रगती तपासा -७**

१ DIET ची भूमिका विषद करा.

## ४.९ संयुक्त राष्ट्र शैक्षणिक वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (यु.एन.ई.एस.सी.ओ.)UNESCO (युनेस्को)

युनायटेड नेशन्सचे एक खास प्रतिनिधि कार्यालय म्हणून UNESCO ची स्थापना १६ नोव्हेंबर,१९४५ रोजी झाली. UNESCO ची घटना १६ नोव्हेंबर,१९४५ रोजी मंजूर झाली आणि ४ नोव्हेंबर, १९४६पासून अंमलात आली.

**४.९.१ उद्देश :**

शिक्षण विज्ञान आणि संस्कृतीद्वारे आंतरराष्ट्रीय सहकार्य वृद्धिंगत करून शांतता व सुरक्षितेत योगदान देणे जेणेकरून न्याय, कायद्याचे नियम, मानवीय अधिकार आणि मानवीय मूलभूत स्वातंत्र्याप्रती सर्वकष आदर वाढेल.

**४.९.२ संघटनात्मक रचना :**

UNESCO चे १९३ सदस्य राज्ये व ६ सहसदस्य आहेत. याचे मुख्यालय फ्रान्समधील पॅरीस येथे आहेत आणि जगभरात याचे ५० पेक्षा अधिक क्षेत्रीय कार्यालये,विशिष्ट संस्था आणि केंद्रे आहेत. क्षेत्रीय कार्यालये (‘क्लस्टर ऑफिसेस“ असेही म्हणतात,‘समूह कार्यालये“) तीन किंवा अधिक देश व्यापतात. तसेच त्याशिवाय राष्ट्रीय व प्रादेशिक कार्यालये सुदध आहेत

UNESCO पाच मुख्य कार्यक्रमाद्वारे त्यांच्या उद्देशांचा पाठपुरावा करते. शिक्षण, नैसर्गिक विज्ञान, सामाजिक व मानवी विज्ञान, संस्कृती, माहिती व दळणवळण.

धोरण ठरविणे, अंमल व UNESCO चे दैनंदिन कारभारासाठी तीन मंडळे जबाबदार आहेत.

**४.९.३. सर्वसाधारण परिषद:**

सर्वसाधारण परिषद ही संघटनेच्या सदस्य राज्ये व सहकारी सदस्यांचे एकत्रिकरण असते.ज्यात प्रत्येक सदस्य राज्याला एक मत असते.दर दोन वर्षांनी सभा घेऊन ही संघटनेसाठी सर्वसाधारण धोरणे ठरविते व कार्यक्रमाची रूपरेषा आखते.

**४.९.४ कार्यकारी मंडळ:**

सर्वसाधारण परिषद कार्यकारी मंडळाच्या ५८ सदस्यांची चार वर्षांच्या (सर्वांचा एकाच वेळेस नसलेला) कार्यकालासाठी निवड करते. कार्यकारी मंडळ सर्वसाधारण परिषदेची बैठक ठरविते आणि सर्वसाधारण परिषदेने नेमून दिलेले विशिष्ट कायदेशीर हुकुम सोडते.

**४.९.५ सचिव मंडळ:**

सचिव मंडळात डायरेक्टर- जनरल व त्यांचा स्टाफ असतो आणि ते संघटनेच्या दैनंदिन कामकाजासाठी जबाबदार असते. डायरेक्टर जनरल म्हणजे UNESCO चा सार्वजनिक चेहरामोहरा असतो आणि त्यांची निवड सर्वसाधारण परिषदेद्वारा चार वर्षांच्या कार्यकालासाठी केली जाते. सचिव मंडळाची विभागणी विविध प्रशासकीय कार्यालये आणि पाच कार्यक्रम विभागात केली जाते जे संघटनेची मुख्य जोर देण्याची क्षेत्रे प्रतीत करतात.

**४.९.६ कार्ये:**

UNESCO त्याच्या कृती पाच कार्यक्रम क्षेत्रांद्वारे अंमलात आणतात. शिक्षण, नैसर्गिक विज्ञान, सामाजिक व मानवी शास्त्र, संस्कृती, माहिती व दळणवळण.

**१) शिक्षण:**

सर्वांसाठी शैक्षणिक संधी उपलब्धतेसह UNESCO शिकणारा समाज निर्माण करायचा प्रयत्न करते. ते तुलनात्मक शिक्षणात संशोधनाला पाठिंबा देते आणि राष्ट्रीय शैक्षणिक नेतृत्व व सर्वांना गुणात्मक शिक्षण देण्यासाठी राष्ट्राची क्षमता मजबूत करण्यासाठी कौशल्य पुरविते व भागीदारी वाढविते. उदा. दर १२ वर्षानी प्रोढ शिक्षणावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन . UNESCO, ASPNet हे देशातील शाळांचे आंतरराष्ट्रीय जाळे आहे.

**२) लोक जागृती:**

UNESCO लोकांना शिक्षित करण्यासाठी सार्वजनिक 'विधाने' जारी करते .

उदा . मादागास्करमध्ये खेळाद्वारे एच आय व्ही / एड्स विषयी जनजागृती वाढविण्यासाठी चळवळ (मार्च - नोव्हेंबर २००९) , मंगोलियामध्ये स्त्रियांवरील हिंसाचार थांबविण्यासाठी जनजागृती वाढविण्यासाठी मंगोलियन आंतरराष्ट्रीय चळवळ (८ ऑगस्ट ,२००९)

आफ्रिकेच्या सागर किनाऱ्यावरील वाळवंटीकरणा विरूद्ध लढा (जून १९७७).

**३) UNESCO सांस्कृतिक व वैज्ञानिक वैशिष्ट्यांची ठिकाणे व प्रकल्प स्पष्ट दर्शविते.**

उदा. भौगोलिक बगीच्यांचे जाळे एडनबर्ग, स्कॉटलंडच्या पहिल्या फिरत्या वाचनालयाचे स्थान, साहित्य नगरी, २००७ आयोवा शहर, साहित्य नगरी, २००८ नामशेष होण्याच्या मार्गावरील भाषा व भाषिक विविधता प्रकल्प १९६५ पासूनच्या इंटरनॅशनल हायड्रॉलॉजिकल प्रोग्राम द्वारा जल संसाधन व्यवस्थापन.

जागतिक वारसा असलेली स्थाने.

**४) UNESCO प्रतिमा व शब्दांद्वारे कल्पनेच्या मुक्त प्रवाहाला प्रोत्साहन देते.**

उदा. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वृत्तपत्र स्वातंत्र्य, दळणवळणाच्या विकासाकरीता आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांद्वारे माहितीची उपलब्धता आणि दळणवळण व माहिती कार्यक्रम यांचे सवर्धन करते .

सर्व कार्यक्रमासाठीच्या माहितीद्वारा हे ICTS शी सर्वकष संधी प्रदान करते.

हे प्रसार माध्यमातील बहुविध अधिकारीत्व व सांस्कृतिक विविधतेला संवर्धित करते.

**५) UNESCO विशिष्ट घटनांचे महत्त्व वाढविते.**

उदा. जगभरातील मुलांसाठी शांतता व अहिंसेच्या संस्कृतीच्या वाढीसाठी आंतरराष्ट्रीय दशक :२००१-२०१० कोणत्यांही निरामय, लोकशाही व मुक्त समाजाच्या घटक भागाच्या स्वातंत्र्याच्या उन्नतीसाठी जागतिक वृत्तपत्र स्वातंत्र्य दिवस म्हणजे प्रत्येक वर्षी ३ मार्च. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस.

**६) UNESCO प्रकल्पांना चालना देते व निधी देते.**

उदा. स्थलांतरीत लोकांशी सांस्कृतिक चर्चेकरिता संग्रहालयाची स्थापना करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी स्थलांतर संग्रहालय पुढाकार.

UNESCO - CEPES, १९७२ साली स्थापना झालेल्या आणि युरोप, कॅनडा, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका आणि इस्त्राइलमधील उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीय सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी उच्च शिक्षणाचे युरोपिअन केंद्र

FRESH, परिणामकारक शालेय आरोग्यावर केंद्रीत संसाधन OANA, आशिया - पॅसॅफिक न्युज एजन्सीज ची संघटना. बॉटनी २०००, सजीव वर्गीकरण पद्धती, औषधी व शोभिवंत वनस्पती मधील जीवशास्त्रीय व सांस्कृतिक विविधता आणि पर्यावरण प्रदुषणापासून त्यांचे रक्षण यासाठी आधारभूत कार्यक्रम.

आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषद

UNESCO सदिच्छा राजदूत.

**४.९.७ सारांश :**

UNESCO पाच प्रमुख कार्यक्रमाद्वारे त्याच्या उद्दीष्टांचा पाठपुरावा करते. शिक्षण, नैसर्गिक विज्ञान, सामाजिक व मानवी शास्त्र, संस्कृती, माहिती व दळणवळण. ते अशा

प्रकारे औपचारिकपणे दहा NGOS शी संबधित आहे जे UNESCO ची कार्यालये व्यापतात व त्याला त्याची उद्दीष्ट्ये जाणयला समर्थ करतात.

१) विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय संघटना (IAU) इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटीज

२) इंटरनॅशनल कौन्सिल फॉर फिल्म टेलिव्हिजन अँड ऑडिओ व्हिज्युअल कम्युनिकेशन (IFTC)

३) इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ म्युझिअम्स (ICOM)

४) इंटरनॅशनल म्युझिक कौन्सिल (IMC)

५) इंटरनॅशनल कौन्सिल फॉर फिलॉसॉफी ॲण्ड ह्युमॅनिस्टीक स्टडीज (ICPHS)

६) इंटरनॅशनल सोशल सायन्स कौन्सिल (ISSC)

७) वर्ल्ड फेडरेशन ऑफ युनेस्को क्लबज्, सेन्टर्स ॲण्ड असोसिएशन (WFUCA)

८) इंटरनॅशनल थिएटर इस्टिट्यूट (ITI)

९) इंटरनॅशनल कौन्सिल फॉर इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी (ICET)

१०) कोऑर्डिनेटींग कमिटी फॅार इंटरनॅशनल व्हालंटरी सर्व्हिस (CCIVS)

**तुमची प्रगती तपासा -८**

१) (UNESCO) वर एक टीपा लिहा.

♦ ♦ ♦

# घटक -५
# शिक्षणाची व्याख्या, स्वरूप, व्याप्ती आणि अर्थ

**घटक रचना**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ शिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या

- उत्पत्ती
- आधुनिक संकल्पना

५.३ शिक्षणाचे स्वरूप

५.४ शिक्षणाची व्याप्ती

५.५ थोडक्यात

## ५.० उद्दिष्टे

हे प्रकरण अभ्यासल्यानंतर तुम्ही -

- शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करू शकाल.
- शिक्षणाच्या स्वरूपाबाबत चर्चा करू शकाल.
- शिक्षणाच्या व्याप्तीविषयी चर्चा करू शकाल.

## ५.१. प्रस्तावना

मानवी जीवनाची दोन अंगे आहेत - जीवशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय जीवशास्त्रीय अंग हे अन्न प्राप्तीशी निगडीत आहे, तर समाजशास्त्रीय अंग हे मानवाचे वैशिष्ट्य आहे. मानव हा एकमेव प्राणी असा आहे की ज्यात शिक्षण घेण्याची क्षमता आहे.

## ५.२ अर्थ आणि व्याख्या

'शिक्षण' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली याबाबत अनेक विचार प्रवाह प्रचलित आहेत.

१. `Educare' = to rear, to nourish, to bring up = जोपासना /संवर्धन करणे `Educare' या लॅटीन शब्दापासून व्युत्पत्ती झाली.

२. `Educere' = to lead out, to draw out = सुप्तगुणांना चालना देणे, त्यांचा अविष्कार करणे, या लॅटीन शब्दापासून व्युत्पत्ती झाली.

३. `Eductum' = the act of teaching or training = शिकविणे वा प्रशिक्षण देण्याची कृती.

पहिल्या व तिसऱ्या मताप्रमाणे शिक्षण ही व्यक्तीवर बाहेरून काहीतर लादण्याची कृती आहे; तर दुसऱ्या मताप्रमाणे व्यक्तींमधील बदल हे आंतरिक घटकामुळे होतात. हा दृष्टीकोन आधुनिक शिक्षणवेत्यांनी स्विकारले आहे.

गांधीजी ⟶ 'माणसाच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.'

टागोर ⟶ 'जे केवळ माहितीच देत नाही तर जे सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाच्या मेळ घालून देते ते उच्च प्रतीचे शिक्षण होय.'

प्लेटो ⟶ 'प्रत्येक माणसात काही विशिष्ट प्रमाणात जन्मजात, निसर्गदत्त शक्ती असतात. त्यांना जागृत करून पूर्णत्वास नेणे म्हणजे शिक्षण.'

जॉन ॲडॅम्स् ⟶ शिक्षण ही द्वीकेंद्रात्मक प्रक्रिया आहे. शिकणारा आणि शिकविणारा हे दोघेही या प्रक्रियेत प्रयत्न करीत असतात. एक परिपक्व व्यक्तिमत्व दुसऱ्या अपरिपक्व व्यक्तिमत्वावर काही ठसा उमटविण्याचा प्रयत्न करीत असते. हा ठसा म्हणजेच शिक्षण होय. शिकविणारे व्यक्तिमत्व जीतके परिपक्व तितका त्याने दिलेले उमटिवलेला ठसा अधिक प्रभावी म्हणजेच त्याने दिलेले शिक्षण अधिक परिणामकारक होते. '

वरिल सर्व व्याख्यांचा विचार करता शिक्षण म्हणजे ज्ञान आणि अनुभवाच्या मदतीने व्यक्तीचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. यावर सर्व शिक्षणवेत्त्यांचे एकमत झाले आहे.

आधुनिक काळात शिक्षण ही द्विकेंद्रित प्रक्रिया मानली आहे. ज्यात शिक्षण देणारा हा शिक्षण घेणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडून विकसनास हातभार लावतो. यात शिक्षण देणारा हा शिक्षण घेणाऱ्याच्या वर्तनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

शिक्षक

↕

विद्यार्थी

ड्युईच्या मते शिक्षण ही एक मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय प्रक्रिया आहे. मानसशास्त्रीय प्रक्रियेत बालकामधील इच्छा व शक्तीचा समावेश होतो. व्यक्तीच्या सामाजिक जाणीवांचा विकास याचा समाजशास्त्रीय घटकांत समावेश होतो. समाजिकरणाची प्रक्रिया ही व्यक्तीच्या जन्माबरोबर सुरू होते आणि व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडते.

शिक्षण ही आजन्म चालणारी प्रक्रिया आहे, म्हणूनच जीवन म्हणजे शिक्षण आणि शिक्षण म्हणजे जीवन. शिक्षणाने व्यक्ती स्वावलंबी बनली आहे.

**पडताळा:-**

खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. 'शिक्षण' ह्या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली ?

२. कोणत्याही तीन शिक्षणवेत्यांनी मांडलेल्या शिक्षणाच्या व्याख्या लिहा .

३.'शिक्षण ही द्वीकेंद्रित प्रक्रिया आहे ' स्पष्ट करा.

४.'शिक्षण ही मानसशास्त्रीय आणि सामाजिक प्रक्रिया आहे ' असे का म्हटले जाते ?

**५. गाळलेल्या जागा भरा.**

अ) शिक्षण ही ——- आणि —-मधील द्विकेंद्रि प्रक्रिया आहे.

ब) —– हे महत्वाचे शैक्षणिक आधार आहे.

## ५.३ शिक्षणाचे स्वरूप

जॉन ड्युई यांच्या मते ``education is the process of living through continuous reconstruction of experiences. "

शिक्षणाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१) केवळ शैक्षणिक संस्थातून दिले जाणारे शिक्षण म्हणजे शिक्षण नव्हे.

२) शिक्षण ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे.

३) शिक्षण व्यक्तीचा सर्वांगिण विकास साधते.

४) हि त्रिकेंद्रित प्रक्रिया आहे.

५) शिक्षण हे गरजाधिष्ठित आहे - देशाच्या विकासाकरिता मनुष्यबळ पुरविणे.




६) शिक्षण हे संस्कृतीचे जतन आणि संक्रमण करते.

७) शिक्षण जीवनाधिष्ठित असावे.

८) मनुष्य बळाचा विकास करण्यात शिक्षण हे महत्वाची भूमिका बजावते.

## ५.४ शिक्षणाची व्याप्ती

शिक्षण ही संकल्पना अत्यंत व्यापक आणि विविधांगी आहे. वैयक्तिक आणि देशाचा विकास साधण्यास शिक्षण संकल्पनेची व्याप्ती ही विविधांगी आणि विविध विद्याशाखांशी मेळ साधणारी आहे. शिक्षणाच्या व्याप्तीमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

१) इतर विद्याशाखांशी संबंध

२) उपाययोजनात्मक विषय

३) शिक्षणाचे प्रकार

**१) इतर विद्याशाखांशी संबंध:**

शिक्षण हे शास्त्र आणि कला दोन्ही आहे. शिक्षण आणि इतर विद्याशाखांची सरमिसळ झाली आहे, त्यापैकी काही विद्याशाखा पुढील प्रमाणे आहेत.

अ) तत्त्वज्ञान - तत्त्वज्ञान हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. तत्त्वज्ञान मुलभूत तत्त्वे देते ज्यांचे उपयोजन शिक्षणात केले जाते.

ब) मानसशास्त्र - मानसशास्त्र म्हणजे मानवी वर्तनाचा त्याच्या वातावरणासंदर्भात केलेला अभ्यास होय. शिक्षण हे मानसशास्त्राने मांडलेली तत्त्वे आणि उपपत्ती वापरून शैक्षणिक प्रक्रिया बालकेंद्रित बनविते.

क) समाजशास्त्र - शाळा ही समाजाची लहान प्रतिकृती आहे. शिक्षक हा विद्यार्थी आणि पालक यांच्यातील सहसंबंधातून समाजात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

ड) जीवशास्त्र - चांगल्या शैक्षणिक कार्यक्रमाचे नियोजन करताना जीवशास्त्रातील मूलभूत सिद्धांत जसे - थकवा आणि विश्रांती वापरले जातात. बालकामधील जीवशास्त्रीय अडचणी समजून घेण्यास आणि योग्य उपचारात्मक वातावरण निर्मिती करण्यास जीवशास्त्रीय सिद्धांताचा आधार घेतला जातो.

इ) अर्थशास्त्र - व्यक्तीची आणि पर्यायाने समाजाची आर्थिक उन्नती करणे हे शिक्षणाचे एक महत्वाचे कार्य आहे.

फ)राज्यशास्त्र - भारतातील राजकिय घडामोडिंचा नेहमीच्या शिक्षण पद्धतीवर प्रभाव पडलेला जाणवतो. व्यक्तीला अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्यास आणि मानवी हक्कांचे संरक्षण करण्यास राज्यशास्त्र मदत करते.

## २) उपाययोजनात्मक क्षेत्रे:

आतापर्यंत आपण विविध विद्याशाखांनी शिक्षण ही संकल्पना प्रभावी करण्यात कसा हातभार लावला ते अभ्यासले. खालील नमूद केलेली उपाययोजनात्मक क्षेत्रे आपण यापूर्वी अभ्यासली आहेत.

अ) शैक्षणिक तत्त्वज्ञान

ब) शैक्षणिक मानसशास्त्र

क) शैक्षणिक समाजशास्त्र

ड) शिक्षणाचे अर्थशास्त्र

इ) शिक्षणाचे राज्यशास्त्र

इतर काही उपयोजित शास्त्रे पुढीलप्रमाणे आहेत.

फ) शिक्षणाचा इतिहास -हे शिक्षणाच्या बदलांच्या विविध टप्प्यांचा अभ्यास करते.

ग) तुलनात्मक शिक्षण - विविध राष्ट्रांतील शिक्षण पद्धतींचा अभ्यास करते. विविध राष्ट्रांतील शिक्षणाचे स्वरूप, उद्दिष्ट्ये, पद्धती इ. चा अभ्यास करते.

घ) शैक्षणिक व्यवस्थापन - शिक्षण पद्धतीला प्रभावी करणारा हा महत्वाचा घटक आहे. व्यवस्थापनातील मूलभूत तत्त्वे, मनुष्य बळविकास त्यातील वातावरणाचे मूल्यमापन त्यावर शिक्षणाची गुणवत्ता अवलंबून असते.

न) शैक्षणिक तंत्रज्ञान - विविध शैक्षणिक अनुभव पुरविणे, योग्य दृक-श्राव्य माध्यमाचा वापर योग्य त्या तसेच नाविन्यपूर्ण तंत्राचा शिक्षणातील वापर करणे याचा शैक्षणिक तंत्रज्ञानात समावेश होतो.

## ३) शिक्षणाचा प्रकार:

शिक्षणाला विविध प्रकारची कार्ये पार पाडायला लागतात. ही कार्ये कोणत्याही एका प्रकारच्या दृष्टीकोनाने पूर्ण होऊ शकत नाही. शिक्षण प्रक्रियेत शिक्षणाच्या विविध प्रकारांचा उदय झाला.

अ) औपचारिक शिक्षण

ब) अनौपचारिक शिक्षण

क) सहज शिक्षण

वरिल शिक्षणाचे प्रकार प्रकरण क्रमांक दोन 'समांतर शिक्षण पद्धती' यामध्ये सविस्तर चर्चिले आहेत.

**तुमची प्रगती तपासा.**

१) शिक्षणाच्या व्याप्तीची चर्चा करा.

---

२) शिक्षणाच्या स्वरूपाची चर्चा करा.

---

३) शिक्षणाचे प्रकार स्पष्ट करा.

---

## ५.५ थोडक्यात

**१. मनुष्य हा एकमेव शिक्षण घेऊ शकणारा प्राणी आहे.**

**२. शिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या**

Educare ⟶ to nourish ⟶ जोपासना करणे ⟶

शिक्षण म्हणजे ⟶ Educere = to draw out = सुप्त गुणांना वाव देणे.

- ज्ञान आणि अनुभवांचे एकत्रीकरण
- कौशल्ये, सवयी आणि दृष्टीकोनाचा विकास
- अनुभवांच्या आधारे व्यक्तीमधील सर्वोत्कृष्टतेचा विकास साधणे.

**३. शिक्षणाचे स्वरूप:-**

शिक्षण ही आजीवन चालणारी प्रक्रीया आहे.

- सर्वांगिण विकास साधते.
- त्रिकेंद्रित प्रक्रिया आहे.
- गरजाधिष्ठित
- संस्कृतीचे जतन आणि संक्रमण करते.
- जीवनाधिष्ठित प्रक्रिया
- मनुष्यबळ विकासास हातभार लावते.

**४. शिक्षणाची व्याप्ती:**

**१) इतर विद्याशाखांशी संबंध:**

तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि जीवशास्त्र.

**२) उपयोजित शाखा:**

शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र, शिक्षणाचे अर्थशास्त्र, शिक्षणाचे राज्यशास्त्र, शिक्षणाचा इतिहास, तुलनात्मक शिक्षण, शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक तंत्रज्ञान, आणि शिक्षणातील संशोधन.

**३) शिक्षणाचे प्रकार:**

औपचारिक, अनौपचारिक आणि सहज शिक्षण.

♦ ♦ ♦

# घटक - ६
# शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता

**घटक रचना**

६.० प्रस्तावना

६.१ उद्दीष्ट्ये

६.२ राष्ट्रीय एकात्मता - अर्थ आणि गरज

६.३ राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे घटक - जात, धर्म, भाषा

६.४ राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करण्यात शिक्षणाची भूमिका

६.५ सारांश

६.६ स्वाध्याय

## ६.० प्रस्तावना

मागील प्रकरणात आपण शिक्षणाचा अर्थ आणि व्याप्ती, चालू शैक्षणिक पद्धती आणि शिक्षण देणाऱ्या संस्थांची भूमिका अभ्यासली. शिक्षण हे व्यक्तीच्या सवयी आणि दृष्टिकोन विकसित करून संपूर्ण व्यक्तीमत्वावर परिणाम घडवून आणते. शिक्षण हे युवकांमध्ये प्रादेशिकता, प्रातीयता, जातीयता अशा घटकाबद्दल जागरूकता निर्माण करून एका भक्कम राष्ट्राची उभारणी करते.

## ६.१ उद्दीष्ट्ये

हे प्रकरण अभ्यासल्यावर तुम्ही

- राष्ट्रीय एकात्मता या संकल्पनेचे स्पष्टीकरण करू शकाल.
- भारतात राष्ट्रीय एकात्मता आवश्यक असल्याच्या कारणांची मिंमासा करू शकाल.
- राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणाऱ्या घटकांचे वर्णन करू शकाल.
- राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करण्यात शिक्षणाची भूमिका स्पष्ट करू शकाल.

## ६.२ राष्ट्रीय एकात्मता : अर्थ आणि गरज

भिन्न भिन्न प्रकारच्या भाषिक व प्रादेशिक वैशिष्ट्यामूळे भारतीय संस्कृती संपन्न व समृद्ध बनली आहे. भाषा वेगळ्या, प्रांत वेगळे, प्रदेश वेगळे, जाती वेगळ्या, उपासना, पंथ वेगळे तरी संस्कृती एक, तत्त्वज्ञान एक अशी भारतीय संस्कृतीची महानता आहे. पण

आज साम्यवाद, प्रांतियता, भाषिकता यासारखे भुंगे भारतातील शांतता भंग पावत आहेत.

राजकीय पक्ष मते मिळविण्यासाठी जातीयता धार्मिकता, विषमता यांचे पोषण करीत आहेत आणि विकृत व अनैतिक राजकारण खेळत आहेत. संकुचित प्रादेशिक आणि प्रांतिय हित हा प्रतिष्ठेचा विषय बनून तेलंगाणा, झारखंड, बोडो प्रदेश यासारख्या चळवळींचा जन्म झाला.

भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले राष्ट्र आहे. भारताच्या सभोवती असलेली एकपक्षीय राज्यकारभार असणारी युध्दपिपासू राष्ट्रे भारताची सुरक्षितता आणि एकात्मतेस धोका पोहचवत आहेत. या सर्व आव्हानांना तोंड देण्यास आणि राष्ट्र विकास साधण्यास राष्ट्रीय एकात्मतेची गरज आहे. 'समन्वय हीच आपली परंपरा आहे'' ह्या पंडित नेहरूंनी सांगितलेल्या सूत्राच्या आधारे राष्ट्रीय एकात्मतेची आणि राष्ट्रीयत्वाची जाणीव जोपासता येईल. प्रत्येकाच्या मनात देशभक्ती राष्ट्रप्रेम आणि देशाचे भवितव्य आपल्या हातात असल्याची भावना निर्माण करणे अत्यावश्यक आहे.स्वतःच्या घराइतकेच स्वतःच्या देशावर प्रेम करावयाला शिकवणे आवश्यक आहे  आणि शिक्षणाने ते करावयाला हवे.

आपले पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू म्हणाले की, “Let us, the citizens of India, stand up with straight back and look up at the skins, Keeping our feet firmly planted or the ground  and bring about integration of the Indian people.”

नागरिकत्व म्हणजे एका विशिष्ट अशा एकीच्या भावनेने नागरिकांचा समूह हा इतर नागरिकांपेक्षा वेगळा ठरतो. नागरिकत्व या संकल्पनेत राष्ट्राभिमान, हक्क, कर्तव्याबद्दलची जाणीव हे तीन महत्वाचे पैलू आहेत. तसेच देशनिष्ठा, प्रामाणिकपणा, देशाच्या संरक्षणासाठी आत्मबलिदान करण्याची तयारी, कर्तव्य तत्परता  या मूल्यांचाही नागरिकत्व संकल्पनेत समावेश होतो.

एकात्मता म्हणजे सर्व आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक फरकांना विसरून एकमेकांबद्लचे प्रेम आणि आदर भावनेने जनता एकरूप होणे.

राष्ट्रीय एकात्मता संकुचित प्रादेशिक, वर्गीय वा पक्षीय हिताचा त्याग करून राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याच्या वृत्तीला प्रेरणा देणारी मनोभूमिका तयार करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता ही अशी भक्कम शक्ती आहे जी देशाच्या नागरिकांना एकत्र ठेऊ शकते.

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे आपण सर्वप्रथम भारतीय आहोत ही धारणा - सगळे भारतीय मग ते कोणत्याही जातीचे अगर धर्माचे असोत वा कोणत्याही प्रातांतील असोत वा कोणतीही भाषा बोलणारे असोत, आपले बंधू आहेत ही भावना, आपल्या जीवननिष्ठामध्ये राष्ट्रनिष्ठेला अग्रक्रम व सर्वोच्च स्थान देण्याची वृत्ती,व्यापक देशहितासाठी संकुचित, वैयक्तिक, जातीय, भाषिक, धार्मिक व प्रांतीय स्वार्थाचा, हितसंबंधांचा त्याग करण्याची तयारी, सर्वाबद्दल जिव्हाळ्याची व आत्मीयतेची भावना ही राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेत अपेक्षित आहे.

### ६.२.१ तुमची प्रगती तपासा

अ) राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय?

आ) आज राष्ट्रीय एकात्मतेची काय गरज आहे?

इ) भारतीय एकमकांपासून कसे वेगळे आहेत ते स्पष्ट करा.

## ६.३ राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे घटक - जात, धर्म, भाषा

आपल्या देशात अनेक विघातक शक्ती कार्यरत आहेत. आज देशात फुटीर प्रवृत्ती बळावत असल्यामुळे राष्ट्रात ऐक्य भावनेला तडा गेला आहे.

**अ) जात :**

जातीची निर्मिती ही स्वाभाविक असली तरी त्यामधून जातीयतेची वा जातीद्वेषाची जी भावना निर्माण झाली आहे, ही खरी चिंतेची बाब होय. जातीजातीमधील श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना ही जाताद्वेषाला कारणीभूत ठरली आहे. जात ही माणसाच्या अपात्रतेची कसोटी ठरत आहे. परिणामतः लायकी, बुध्दिमता, कार्यक्षमता नसलेली माणसे आज निरनिराळ्या उच्च पदांवर जाऊन बसली आहेत.समाजात जातीपरत्वे गटांची निर्मिती झाल्यामुळे गैरसमज, विद्वेष, शत्रुत्व, ताण, कटूभावना पसरते आहे.

**ब) धर्म :**

कोणत्याही धर्म विद्वेष शिकवित नसला तरीही भारतात धर्माच्या नावाखाली होणारे दंगे, रक्तपात हा प्रकर्षाने जाणवतो. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. ब्रिटीशांच्या 'फोडा आणि राज्य करा'. या भूमिकेमुळे धर्माच्या आधारावर लोकांच्या मनात तेढ आणि तिरस्काराच्या भावनेची बीजे रोवली. लोकांमध्ये धर्मांधता वाढीस लागल्याने प्रेम, स्नेह, ऐक्य वाढीस लागण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो.

**क) भाषा :**

भारत हे बहुभाषिक राष्ट्र आहे. अनेक शतकांपासून भाषांचा विकास होत असल्यामुळे त्यांच्याभोवती विशिष्ट प्रकारची संस्कृती निर्माण झाली आहे. हा माणसामाणसांना सांधणारा

दुवा, आज माणसामाणसातील भांडणाचे मूळ ठरते आहे.

याशिवाय इतरही काही घटक राष्ट्रीय एकात्मतेस धोका पोहोचवतात.त्यांच्याबद्दल थोडक्यात जाणून घेऊ या.

**ड) निरक्षरता :**

भारतातील निरक्षरतेचे प्रमाण १९५१च्या (१८.३३%) तुलनेत २००१मध्ये ६४.८४%) झाले असले तरीही समाजात निरक्षरता, अज्ञान,आणि अंधश्रद्धेचा पगडा दिसून येतो. आपल्या व्यैयक्तीक फायद्यासाठी तत्त्वहिन लोक निरक्षरांना वेठीस धरतात. शिक्षण ही अजूनही उच्च वर्गियांची मक्तेदारी समजली जाते त्यामुळे साक्षर आणि निरक्षरामधील दरी एकीस अडथळा ठरतो आहे.

**इ) प्रांतियता आणि प्रादेशिकता :**

'बिहाऱ्यांचा बिहार' 'मातीचे सुपूत्र' यासारखी घोषवाक्ये आज सर्वत्र ऐकू येत आहेत. आम्ही उत्तर भारतीय, दक्षिण भारतीय, गुजराती, पंजाबी अशी भावना आणि यापुढे जाऊन गोरखाप्रदेश, बोडोप्रदेश अशा चळवळी भारतात दुफळी पाडण्याचे काम करतात.

**फ) राजकीय पक्ष :**

भारतात बहुपक्षीय लोकशाही कार्यरत आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी व उद्दीष्ट गाठण्यासाठी जनतेच्या फायद्याचा बळी देत आहेत. राजकीय पक्षाकडून खेळले जाणारे विकृत, अनैतिक राजकारण ही लोकशाहीकरिता सर्वात हानिकारक बाब आहे. आज निवडणूका धार्मिकतेच्या बळावर लढविल्या जात आहेत.लोकांच्या धार्मिक भावना भडकावून आपला व्यक्तिगत पक्षीय स्वार्थ साधला जात आहे. यामुळे समाजात तणाव निर्माण होऊन एकतेस बाधा पाहोचते आहे.

**ग) आर्थिक विषमता :**

समाजात आर्थिक विषमतेमुळे अनेक भेद पडले आहेत. एकीकडे दारिद्र्यात खितपत पडलेली, झोपडपट्टीतून अत्यंत हलाखीचे जीवन जगणारी कष्टकरी जनता तर दुसरीकडे प्रासादतुल्य हवेल्यामंधून राहणारा, ज्यांच्या घरी 'दौलताची नित चालते दिवाळी ' असा विलासी व ऐषरामी धनिक वर्ग ! श्रीमंत अधिकच श्रीमंत होतो तर गरीब अधिकच गरीब होतोय. हे अर्थातच राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

**ह) लाचखोरी आणि वशिलेबाजी :**

आपला देश लाचखोरी व वशिलेबाजीच्या किडीने पोखरला गेला आहे. गुणवत्ता ही नोकरी शिष्यवृत्ती यासाठी एकमेव कसोटी राहिली नाही. मूल्याहिन समाज हा व्यक्तिगत फायद्याकरिता देशाचा विचार करताना दिसून येत नाही.

**ळ) बेकारी आणि निराशा :**

आजच्या तरूणांचा समाजव्यवस्था आणि मूलव्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे. बेकारीच्या संकटाला तोंड देताना निराशेच्या गर्तेत सापडलेल्या दिशाहीन तरूणांना समाजविरोधी कारवाया करण्यास हाताशी धरले जाते. मूल्य आणि आदर्शाचा अभाव हा

देशहिताकरिता अत्यंत घातक ठरतो आहे.

**६.३.१ पडताळा.**

अ) धर्म हा राष्ट्रीय एकात्मतेस धोका कसा निर्माण करत आहे?

आ) जात हा राष्ट्रीय एकात्मतेस अडथळा आहे, स्पष्ट करा.

इ) भाषा ही राष्ट्रीय एकात्मतेस अडथळा म्हणून वर्णन करा.

ई) राष्ट्रीय एकात्मतेस अडथळा म्हणजे काय? कोणतेही दोन अडथळे स्पष्ट करा.

## ६.४ राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करण्यात शिक्षणाची भूमिका

'राष्ट्रीय एकात्मता ही काही इमारतीप्रमाणे चुनाविटांनी वा छिन्नीने बांधण्याची बाब नव्हे. हे संस्कार लोकांच्या अंतःकरणात हळूहळू व सुक्ष्म स्वरूपात रूजविले गेले पाहिजेत. शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून हे कार्य होऊ शकेल.'

देशाला एकात्म व समर्थ बनविण्याचे कार्य शिक्षण कसे पार पाडते ते थोडक्यात जाणून घेऊ या.

**१) राष्ट्रीय शिक्षण पद्धती आणि अभ्यासक्रम पुनर्रचना :**

सामाईक राष्ट्रीय शिक्षण पध्दती शिक्षणात संधीची समानता निर्माण करेल. अभ्यासक्रमात काही मूलभूत बदल करणे गरजेचे आहे. लोकसाहित्य, राष्ट्रीय नेत्यांची चरित्रे, प्रत्येक देशातील कलेचा वारसा, प्रादेशिक भूगोल इ. चा समावेश अभ्यासक्रमात असावा. भारताचा इतिहास कोणत्याही पूर्वग्रहदूषित हेतूने अभ्यासला जाऊ नये. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.

**२) अभ्यासेतर उपक्रम आणि भावनिक एकात्मता :**

विद्यार्थ्यात भावनिक एकात्मतेची निर्मिती करण्यास एन सी सी, छात्रसेना, रेड क्रॉस

इ. सक्तीचे करावे.विद्यार्थ्यांना राष्ट्रगीत म्हणण्यास व राष्ट्रध्वजाचा मान राखण्यास शिकवावे. राष्ट्रीय उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करावे. विद्यार्थ्यांना इतर संस्कृतीचा आदर राखण्यास शिकवावे. खेळाच्या स्पर्धांचे आयोजन केल्याने विविध तालुके आणि राज्यामधील मुले एकत्र येऊन एकमेकांना समजून घेतात.युवा महोत्सव, NSS कॅम्प आयोजित करावेत. सांस्कृतिक कार्यक्रम, लोकनृत्य व संगीत, ऐतिहासिक स्वाभिमानाची स्मारके यांना भेटी देण्याकरिता विद्यार्थ्यांच्या सहलींचे आयोजन करावे. विद्यार्थी व शिक्षक आदानप्रदान योजना प्रांतियता व प्रादेशिकतेच्या संकटांना तोंड देण्यास उपयोगी पडते.

**३) भाषाभ्यास:**

भाषिकदृष्ट्या अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण केले गेले पाहिजे. तीन भाषिक पध्दती शिक्षणात योग्य प्रकारे समाविष्ट केली गेली पाहिजे.

**४) धार्मिक आणि नैतिक शिक्षण:**

भारत हे धर्मनिरपेक्षता राष्ट्र आहे. येथे अनेक देश गुण्यागोविंदाने नांदतात. कोणत्याही प्रकारचे धार्मिक शिक्षण शाळेतून दिले जात नसले तरी समाजापुढील आव्हानांना सामोरी जाण्यास आवश्यक त्या मूल्यांची जोपासना नैतिक शिक्षणातून केली जाते. विद्यार्थ्यांना आदरभाव, शांती, सहकार्य, आणि ऐक्य धार्मिक सहिष्णुतेची शिकवण देणे गरजेचे आहे. अपप्रवृत्ती, दुराग्रह,अज्ञान दूर करण्यास योग्य त्या उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

**५) पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन:**

इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्राच्या पुस्तकांचे राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेवर भर देऊन पुनर्लेखन करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यप्राप्ती ही एकत्रित प्रयत्नांनी झाली हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यास राष्ट्रीय उठाव व स्वातंत्र्याच्या लढ्याचा अंतर्भाव इतिहास पाठ्यपुस्तकात असावा. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचे महत्व व त्याचे जतन करण्याची गरजेची जाणीव करून द्यावी. बुद्ध, सम्राट अशोक, कबीर, स्वामी विवेकानंद इ. थोर भारतीयांबद्दल विद्यार्थ्यांना शिकवावे. भूगोल पाठ्यपुस्तकातून देशातील लोकांचे एकमेकांवर असलेले अवलंबित्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. चांगल्या नागरिकत्वाचे गुण नागरिकशास्त्राच्या अभ्यासातून जोपासावेत.

**६) शिक्षकाची भूमिका:**

शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावतो. शिक्षकाने प्रत्येक घटक शिकविता राष्ट्रीय मूल्यांची जोपासना करावी. तो पूर्वग्रहदुषित नसावा.

**६.४.१ तुमची प्रगती तपासा**

अ) धार्मिक आणि नैतिक शिक्षणाची राष्ट्रीय एकात्मतेची रूजवणूक करण्यातील भूमिका स्पष्ट करा.

आ) राष्ट्रीय एकात्मतेची भावना रूजविण्यास अभ्यासेतर उपक्रम कशी मदत करतात.

इ) पाठ्यपुस्तकांची राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यातील भूमिका स्पष्ट करा.

ई) राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यात राष्ट्रीय शैक्षणिक पद्धतींची काय गरज आहे ?

## ६.५ थोडक्यात

भारताने राष्ट्रीय एकात्मतेस घातक असलेल्या सर्व घटकांशी सामना करण्यास आपले सर्व सामर्थ्य एकवटून एक भक्कम राष्ट्रीय कार्यक्रम तयार केला पाहिजे. अन्याय, असामानता, भेदाभेद याविरूध्द लढण्यास समाजाची मने तयार केली पाहिजेत. 'भारत माझा देश आहे' अशी भावना प्रत्येकाच्या मनात जागृती केली पाहिजे तरच देशभावनेने प्रेरित युवक पुढे येतील.

## ६.६ मूल्यमापन

- राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व वर्णन करा. राष्ट्रीय एकात्मतेतील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.
- राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय ? एकविसाव्या शतकातील त्याची गरज व महत्व स्पष्ट करा.
- भारतासाठी राष्ट्रीय एकात्मता का महत्वाची आहे ? शिक्षक याची जोपासना कशी करतो ?
- राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे घटक कोणते ? शिक्षणाने यावर मात कशी करता येईल ?
- राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करण्यात धार्मिक आणि नैतिक शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

## घटक ७
# शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य

**घटक रचना**

७.० प्रस्तावना

७.१ उद्दीष्ट्ये

७.२ आंतरराष्ट्रीय सामंजस्याची गरज आणि महत्व

७.३ आंतरराष्ट्रीय सामंजस्यापुढील अडथळे

७.४ आंतरराष्ट्रीय सामंजस्याची जोपासना करण्यात शिक्षणाची भूमिका

७.५ थोडक्यात

७.६ मूल्यमापन

## ७.० प्रस्तावना

दोन जागतिक महायुध्दात मानवाची जी अमानुष हत्या झाली त्यांनतर युध्दोन्मादाला आवर घालण्याची आणि जगात शांतता प्रस्थापित करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. प्रत्येक राष्ट्राने केवळ आपल्या राष्ट्राच्या हितापुरताच मर्यादित विचार न करता आंतरराष्ट्रीय पातळीवरून विचार करण्याची आवश्यकता कशी आहे याची जाणीव विचारवंतांच्या मनात निर्माण झाली.

## ७.१ उद्दीष्ट्ये

हे प्रकरण अभ्यासल्यावर तुम्ही

- आंतरराष्ट्रीय सामंजस्य या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करू शकाल.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्य ाची गरज मांडू शकाल.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्य ास असलेल्या अडथळ्याचे वर्णन करू शकाल.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्य  जोपासण्यात शिक्षणाची भूमिका स्पष्ट करू शकाल.

## ७.२ आंतरराष्ट्रीय सामंजस्याची गरज आणि महत्व

आंतरराष्ट्रीयता ही संकल्पना विसाव्या शतकात पुढे आली. मानवाचे कल्याण संघर्षात नसून शांततामय सहजीवनात आहे. याची जाणीव सर्व राष्ट्रांना झाली. आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणजे राष्ट्रीयता आणि संस्कृतीच्या पलिकडे जाऊन इतर लोकांच्या वर्तनाचे चिकित्सकपणे

व तटस्थपणे निरिक्षण करण्याचे व त्यांचे गुणग्रहण करण्याचे सामर्थ्य म्हणजे सामंजस्य होय. एकमेकांचे रितीरिवाज, विचारसरणी, गरजा आणि कृती यांच्यासंबधी जे गैर समज असतात वा प्रचाराने मुद्दाम करून दिले जातात त्यांना बळी न पडता यथायोग्यपणे समजून घेणे व त्यांच्याविषयी स्नेहभाव व सहानुभूती बाळगणे म्हणजे आतंरराष्ट्रीय सामंजस्य बाळगणे होय.

या सामंजस्यवृत्तीचा पाया काही बौध्दिक ज्ञानावर आणि बराचसा भावनात्मक वृत्तीवर अवलंबून आहे. सर्व राष्ट्रे समान आहेत. या पायाभूत तत्वज्ञानावर आंतरराष्ट्रीय सामंजस्य ही संकल्पना आधारित आहे. राष्ट्रवादी कुंपनाची बंधने तोडून विश्वबंधुत्वाची भावना लोकांमध्ये जागृत करण्याचे प्रतिपादन यातून केले आहे.

आपणास आंतरराष्ट्रीय सामंजस्याची गरज का आहे, ते आता पाहू या.

१) राष्ट्रीयत्वाचा भावनेला आध्यात्मिक कड आहे. स्वतःच्या राष्ट्राबद्दल अभिमान असावा पण उणिवा आणि दोषही मोकळ्या मनाने मान्य करावे. स्वतःच्या हितापुरताच विचार करू नये कारण विकृत राष्ट्राभिमानाचे (नाझीवाद, फॅसिझम) अत्यंत वाईट परिणाम जगाने भोगले आहेत. राष्ट्राराष्ट्रातील परस्परावलंबनामुळे विश्वबंधुत्वासाठी प्रयत्न करणे गरजेचे ठरते.

२) वैज्ञानिक प्रगतीमुळे जग जवळ आले आहे. विविध तांत्रिक सांधनांच्या आधारे घरबसल्या जगाच्या पाठिवरील कोणत्याही भागातील माहिती चक्षर्वे सत्यं प्राप्त होऊ शकते. देशांना एकमेकांपासून विलग करणाऱ्या भौगोलिक आणि सांस्कृतिक तटबंदी धडाधड कोसळून पडत आहेत. देशाच्या आर्थिक आणि राजकिय धोरणांचा विचार हा आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात केल्याशिवाय गत्यंतर नाही. जगाच्या एका कोपऱ्यात घडलेली घटना वा बदल हा संपूर्ण जगावर परिणाम करत आहे. आजची वैज्ञानिक संस्कृती वाचवायची असेल आणि जगाचा विनाश टाळायचा असेल तर आंतरराष्ट्रीय भावबंध दृढ केले पाहिजेत.

३) अणुबॉम्बच्या विध्वंसक परिणामांची मानवाला भीषणता समजली आहे. आणखी एक महायुध्द संपूर्ण पृथ्वीचा विनाश करेल याची सर्वांना जाणीव आहे. त्यामुळे सर्व देश एकीकडे शांततेचा पुरस्कार करीत आहेत तर दुसरीकडे सुरक्षेच्या कारणास्तव अणुबॉम्ब सारखी संहारक अस्त्रेही बाळगत आहेत. अशा तणावपूर्वक शांततेच्या काळात आंतरराष्ट्रीय सामंजस्याची खऱ्या अर्थाने गरज भासते. मानवाची प्रगती ही परस्परसंबध आणि परस्पर सहकार्यात आहे , हे सर्वांनी जाणले पाहिजे.

४) जागतिकिकरणाच्या युगात कोणताही देश एकाकी वास्तव्य करू शकत नाही. एका देशातील घडामोडीचा परिणाम दुसऱ्या देशात जाणवतो. आताची ‘आर्थिक मंदी ’ संपूर्ण जगाने अनुभवली आज राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या जगाचे स्वरूपच असे झाले आहे की, विविध मानवी समुदाय पूर्वीपेक्षा आता अधिक एकमेकांशी निगडित झाले आहेत आणि या समुदायांना यशस्वीपणे जगावयाचे असेल तर स्त्रीपुरूषांमध्ये जागतिक नागरिकत्वाची भावना वाढली पाहिजे.

### ७.२.१ तुमची प्रगती तपासा

१) आंतरराष्ट्रीयता म्हणजे काय?

२) आंतरराष्ट्रीयाचे महत्व स्पष्ट करा.

३)आंतरराष्ट्रीय सामंजस्यांची गरज का आहे?

## ७.३ आंतरराष्ट्रीय सामंजस्यापुढील अडथळे

जगातील सर्व देशांनी आंतरराष्ट्रीय सामंजस्याची गरज ओळखली असली, तरी जगात शांतता प्रस्तापित करण्याच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. त्यातील काही अडथळे आपण जाणून घेऊ या.

**अ) प्रगत देशाची अरेरावी:**

अनेक प्रगत देश लहान देशांना आपल्या मर्जीप्रमाणे वागायला भाग पाडतात. ते या देशांना अनेक कारणास्तव शस्त्रास्त्रे पुरवून जगासाठी धोका निर्माण करत आहेत काही प्रगत राष्ट्रे आंतरराष्ट्रीय समित्यांवरही मनमानी कारभार करू पाहात आहेत.

**ब) धार्मिक अडथळे:**

जगातील सर्व धर्म मानवाच्या अस्तित्वाची कारणे, आयुष्याचा अर्थ अशा मुलभूत बाबीचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात.परंतु काही धार्मिक मूलतत्ववादी लोक इतर धर्माबद्दल व्देषभावना भडकविण्याचा पयत्न करत आहेत. ज्यामुळे जागतिक शांतता भंग पावत आहे.

**क) दारिद्रय, निरक्षरता आणि अज्ञान:**

दारिद्र्यामुळे लोक चुकिच्या मार्गाकडे वळले जातात. निरक्षरता आणि अज्ञान हे आंतरराष्ट्रीय सामंजस्यापुढील अडथळे आहेत.

**ड) भौगोलिकता:**

काही वेळा देश भौगोलिकदृष्ट्या इतर भूमीपासून दूर असल्याने इतर देशांपासून सर्वच बाबतीत अलग राहतात.

**इ) राजकीय अडथळे :**

प्रत्येक देश स्वत:ची वेगळी विचारसरणी बाळगतो तसेच इतर देशांची मते स्विकारण्यास तयार नसतो. अशा असहिष्णुतापूर्वक वागण्याने आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्मितीत अडथळा निर्माण होतो.

**फ) इतर अडथळे :**

इतर देशाविषयी असलेल्या पूर्वग्रहदूषित (रूढी, प्रथा, भाषा, रंग, भूतकाळातील घटना इ.बद्दल) दृष्टिकोनामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्मिती होत नाही.

### ७.३.१ तुमची प्रगती तपासा

१) आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या मार्गातील कोणताही एक अडथळा स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ७.४ आंतरराष्ट्रीय सामंजस्याची जोपासना करण्यात शिक्षणाची भूमिका

विद्यार्थ्यांच्या मनात मानवी हिताची भावना शिक्षणाच्या सहाय्याने निर्माण केली पाहिजे. 'हे विश्वची माझे घर ' अशी विश्वव्यापक दृष्टी निर्माण करणे, विश्वनागरिकत्वाची भावना निर्माण करणे, विश्वमानव निर्माण करणे हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील शिक्षणाचे प्रमुख ध्येय आहे. अज्ञान, अपप्रवृत्ती आणि पूर्वग्रह दूर करून मानवी मूल्ये, आदरभाव सहिष्णूता, सहकार्य या भावनांची जोपासना केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे शिक्षण विविध मार्गाने शाळेतून देता येऊ शकेल.

**अ) अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके :**

शालेय अभ्यासक्रमातील इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य, गणित यासारखे विषय विश्वैक्याची भावना रूजविण्यास मदत करतात. सामाजिक शास्त्र मानवाचे मुलभूत ऐक्य मानवी संस्कृती यावर प्रकाश टाकते. इतिहासातून जगातील भिन्न भिन्न संस्कृती या एकाच मानवी संस्कृतीच्या शाखा व प्रवाह आहेत आणि त्यांच्यातही उदात्तता व सौंदर्य आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावयास हवी. भूगोलातून मानवाचे परस्परावलंबित्व जीवनपध्दती, वेशभूषा, अन्नधान्य, खानपान सवयी, उद्योगधंदे इ.तून करून द्यावा.

शास्त्रज्ञ आणि संशोधक हे विशिष्ट राष्ट्राचे नव्हे तर मानवजातीचे उपकारकर्ते आहेत. त्यांच्या शोधांनी मानवी संस्कृतीला नवी दिशा मिळाली आहे, हे विज्ञानातून मांडावे. शास्त्रीय ज्ञानाची विधायक, उपकारक बाजू विद्यार्थ्यासमोर मांडली जावी. गणितातील चिन्ह, संज्ञा तसेच गणितीय क्रिया जगात सर्वत्र सारख्याच वापरल्या जातात हे सांगावे. नागरिकशास्त्रातून विश्वनागरिकत्वाची भावना रूजवावी. साहित्य मानवी ह्रदयांना जोडणारी एक शक्ती आहे. संगिताची भाषा शिकल्याने इतर देशातील संस्कृतीचा अभ्यास करता येतो. पाठ्यपुस्तकात मानवाच्या परस्पर अवलंबित्वावर, सहकार्य भावनेवर भर दिला पाहिजे.

**ब) शाळेतील इतर उपक्रम :**

शाळेमध्ये महान लोकांच्या, जसे - गौतम बुद्ध, मदर तेरेसा, गुरू नानक, अब्राहम लिंकन, जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करून त्यांच्या मानवतेप्रतीच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून द्यावी. युनो दिवस, मानवी हक्क दिन, जागतिक आरोग्यदिन इ. वैशिष्ट्यपूर्ण रितीने साजरे करावेत. विविध क्षेत्रातील जीवनासंबंधीचे चित्रे फोटो काच फलकात लावता येतील. तसेच पुस्तके, चित्रपट, पोस्टर इ. चा वापर करता येईल.

**क) विद्यार्थी आणि शिक्षक आदान - प्रदान कार्यक्रम :**

असे उपक्रम विद्यार्थ्यांना दृष्टिकोन व्यापक बनवतील तसेच इतर देशातील जीवनपध्दती, खानपानाच्या सवयी, संस्कृती याबद्दल माहिती मिळते. अन्य देशातील विद्यार्थ्यांशी पत्र - मैत्री करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**ड) शिक्षक :**

आंतरराष्ट्रीय सांमजस्यासाठीच्या शिक्षणावर शिक्षकांची श्रध्दा असली पाहिजे.शिक्षक जागृत हवा, आपल्या विषयातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याची स्थळे कोणती आहेत, याची जाण त्याला हवी आणि प्रचलित घडामोडींबद्दल त्याला आस्था हवी, पूर्वग्रहविरहित दृष्टिकोन असावा.

## ७.५ थोडक्यात

‘ ज्या अर्थी माणसांच्या मनातच प्रथम युद्धे निर्माण होतात, त्या अर्थी शांततेसाठी तटबंदी मानवी मनातच उभारली पाहिजे ’. युनेस्को युद्धविरहित व रक्तपातविरहित नवीन जगनिर्मिती करण्याचा प्रयत्न करत आहे. इतरांबद्दल हेवा, मत्सर, अज्ञान, भय इ. नाहिसे व्हायचे असेल तर शिक्षण, विज्ञान, संस्कृती या क्षेत्रात भरपूर आदान - प्रदान झाले पाहिजे. याकरिता शिक्षणाने मानसिकतेत बदल केला पाहिजे.

## ७.६ मूल्यमापन

- आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणजे काय? आजच्या जगात त्याचे महत्व स्पष्ट करा.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी काम करणे का आवश्यक आहे?
- आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या मार्गातील अडथळे स्पष्ट करा.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्यप्रती शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.
- ‘आंतरराष्ट्रीयतेची भावना निर्माण करण्यात शिक्षकाची अतिशय भूमिका अत्यंत महत्वाची आहे’ स्पष्ट करा.

♦ ♦ ♦

# ८अ

## घटक -८
## शैक्षणिक विचारवंतांचे योगदान
## महर्षी कर्वे

**घटक रचना**

८ अ १ प्रस्तावना
८ अ २ जीवनचरित्र
८ अ ३ शैक्षणिक पार्श्वभूमी
८ अ ४ योगदान
८ अ ५ जीवनाचे तत्त्वज्ञान
८ अ ६ शैक्षणिक तत्त्वज्ञान
८ अ ७ थोडक्यात

### ८अ १ प्रस्तावना

शिक्षणाची संकल्पना आणि शिक्षणाची क्षेत्रे यावर अनेक घटकांचा परिणाम झालेला दिसून येतो. अनेक शैक्षणिक विचारवंतांनी शिक्षणाची तत्त्वे मांडली आहेत. त्यामुळेच या विचारवंतांच्या मतांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

### ८अ २ जीवनचरित्र

धोंडो केशव कर्वे स्त्री शिक्षणातील सर्वोसर्वा यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ साली झाला. त्यांचे वडील केशवपंत कर्वे हे मुरूड येथील उच्चभ्रु, अमीर - उमराव कुटुंबातील सदस्य होते. कुटुंबाच्या आधिकारी, अमीर उमरावांच्या सवयीमुळे त्यांचे कुटुंब आर्थिक संकटात सापडले. परंतु कर्वे यांच्यामध्ये स्व-आदर, शिस्त, कठोर कष्टाळूपणा हे गुण जोपासले गेले.

### ८अ ३ शैक्षणिक पार्श्वभूमी

विद्यार्थी दशेत असताना श्लोक पाठांतरात हातखंडा होता. तसेच इंग्रजी व गणित विषयांची त्यांना विशेष गोडी होती. शालेय जीवनात त्यांना सामुदायिक कार्यात सहभागी करून घेतले होते.

गोपाळ कृष्ण गोखले, चिमणभाई पटेल यांसमवेत त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी काही वर्षे मुंबईत माध्यमिक शिक्षकाचे काम केले. बी. ए. झाल्यानंतर पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात ते प्राध्यापक पदावर रूजू झाले. आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीवन सदस्य बनले.

## ८अ ४ योगदान

- शैक्षणिक कार्याकरिता स्वतःच्या पगारातील काही भाग बाजूला ठेवून 'मुरूड फंड' सुरू केला.
- विधवांच्या शिक्षणाकरिता हिंगणे येथे 'अनाथबालिकाश्रम' ची स्थापना केली .
- आपल्या मित्राची विधवा बहिण गोदूबाई यांच्याशी पुनर्विवाह केला. या त्यांच्या कृतीनंतर गावकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार घातला.
- इ. स. १८९३ विधवा विवाहोत्तेजक मंडळी तर इ.स. १८९६ रोजी अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली.
- इ. स. १९१६ रोजी महिला विद्यापीठाची स्थापना केली.
- सामाजिक समता स्थापन करण्याच्या उद्देश्याने १९४४ साली समता संघाची स्थापना केली.
- कर्वे यांचा पुणे, बनारस हिंदू विद्यापीठ व एस्. एन. डी. टी. विद्यापीठाने DLH देऊन गौरव केला.
- इ.स. १९५८ रोजी भारतरत्न या पुरस्काराने गौरविण्यात आले.

**तुमची प्रगती तपासा.**

**जोड्या जुळवा**

| अ | ब |
|---|---|
| १) एस एन डी टी विद्यापीठ | अ) १९५७ |
| २) महिला विद्यालय | ब) विधवा शिक्षण |
| ३) भारतरत्न | क) १९०७ |
| ४) अनाथबालिकाश्रम | ड) १९१६ |

**जीवनाचे तत्त्वज्ञान:**

बालपणामधील कटू आठवणी तसेच समाजविरोध यावर कर्वे यांचे जीवनाचे तत्त्वज्ञान आधारित आहे. समाजविरोध पत्करून त्यांनी समाजातील कमनशीबवान घटकांकरिता

कार्य केले. कर्वे यांच्या तत्त्वज्ञानातील काही महत्वाचे मुद्दे

१) ज्ञान आणि सत्याचा अविरत शोध घेतला पाहिजे. कोणत्याही कठीण प्रसंगाचा सामना एकाग्र चित्ताने आणि चिकीत्सात्मक विचाराने केला पाहिजे.

२) शिक्षितांनी समाजात शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे.

३) सहिष्णुतेची भावना असणे गरजेचे आहे.

४) ईश्वर हा सर्वोच्च आहे. तो संपूर्ण जगताचा कारभार चालवतो. मनुष्यातील धार्मिक भावना ही व्यक्तिला पवित्र बनविते आणि आयुष्यातील सर्वोच्च ध्येय्य प्राप्त करण्यास मदत करते.

५) धार्मिक प्रवृत्ती ही मनुष्याचे शुद्धिकरण करून अंतिम ध्येय्यप्राप्ती सुकर बनविते. जर माणसाचा पुनर्जन्म होतो हे सत्य असेल आणि पुनर्जन्म हा इच्छेनुसार होत असेल तर मी त्या सर्वोच्च परमात्म्याकडे अशी प्रार्थना करतो की मला हाच जन्म वारंवार मिळावा आणि माझी कार्याप्रतीची निष्ठा प्रत्येक जन्मात निरंतर वाढत राहो.

**तुमची प्रगती तपासा - २**

**जोड्या जुळवा**

| **अ** | **ब** |
|---|---|
| १) कठीण प्रसंगाचा सामना | अ) त्याग व सहकार्य भावनेने कार्य करणे |
| २) समाजकार्य | ब) अंतिम ध्येय्यप्राप्तीस मदत |
| ३) धार्मिक वृत्ती | क) अंतिम प्राप्तीपेक्षा महत्त्वाचे |
| ४) तार्किक विचारप्रक्रिया | ड) एकाग्रता व तार्किक विचारप्रक्रिया |

## ८ अ ६ शैक्षणिक तत्त्वज्ञान

**'शिक्षण ' संकल्पना:**

कर्वेच्या शिक्षणक्षेत्रातील अनुभवावर त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान आधारित आहे.

कर्वेच्या मते शिक्षणाने व्यक्ती स्वावलंबी झाली पाहिजे.त्याकरिता ज्ञान व कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. विधवांचे शिक्षण आणि विधवांचे लग्न या दोन स्वतंत्र बाजू आहेत.

**तुमची प्रगती तपासा - ३**

१) शिक्षणाने ............ शिकविले पाहिजे.

२) शिक्षणाने स्त्रियांना समाजात ............मिळाले पाहिजे.

३) कडक शिस्तिचे .......... व........ हे दोन दुष्परिणाम आहेत.

४) शिक्षक हा ..............व............. असावा.

**शिक्षणाची ध्येय्ये:**

- शिक्षणाने व्यक्ती स्वावलंबी बनला पाहिजे.
- शिक्षण स्त्रियांना समाजात योग्य तो दर्जा मिळवून देतो. शिक्षणाने स्त्रियांची भूमिका स्पष्ट करून
- त्यांचा विकास केला पाहिजे.
- शिक्षण स्त्रियांना हुशार गृहिणी बनवितात.

**आशय / पाठ्यक्रम** :-

मातृभाषेतून शिक्षण सुकर आहे. शालेय अभ्यासक्रमातून भारतीय जीवनपद्धती व समाजाच्या गरजा प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत. मूल्य शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे.

**शिस्त:**

काही तत्त्वज्ञानी लोकांनी मुक्त शिस्तीचा पुरस्कार केला. परंतु कर्वे हे कडक शिस्तीचे भोक्ते होते.

**शिक्षकाची भूमिका:**

शिक्षक हा शिस्तप्रियता आणि आपुलकी ह्या दोन्ही गुणांचे योग्य मिश्रण असावे. आपल्या कृतीमधून त्याने विद्यार्थ्यांमध्ये विचारक्षमता, धैर्य, एकनिष्ठा असे गुण जोपासावेत. शिक्षक हा फुलाप्रमाणे नाजूक आणि विजेहून कडक असावा.

**स्त्रियांचे शिक्षण:**

स्त्री कल्याणासाठी कर्वेचे योगदान फार मोठे आहे. शिकलेल्या कुटुंबाचे केंद्र स्त्रीच असते. स्त्रीयांना सक्षम बनविण्यासाठी शिक्षण हे मोठे शस्त्र आहे. शिकलेल्या स्त्रिया कुटुंबात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांना एस्. एन. डी टी महिला विद्यापीठाची स्थापना केली.

कर्वे यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातील तत्त्वे आजही शिक्षण पद्धतीत लागू पडतात.

- विद्यार्थी संख्या वाढल्याने वर्गनियंत्रण अवघड होते. त्यामुळे शिक्षकाने विद्यार्थ्यांवर कडक लक्ष ठेवायला हवे.
- सर्व स्तरावरील शिक्षणाचे माध्यम विद्यार्थ्यांची मातृभाषा असावी.
- शिक्षणाने मूल्ये, आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे. आज व्यावसायिक शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला पाहिजे.
- आज शिक्षकाच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनाबरोबरच हृदयाचा विकास केला पाहिजे

**तुमची प्रगती तपासा - ४**

१) कर्वे यांच्या तत्त्वज्ञानाचे आजच्या परिस्थितीसंदर्भात चर्चा करा.

---

## ८ अ ७ थोडक्यात

- धोंडो केशव कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी झाला.
- एलफिस्टन महाविद्यालयाचे पदवीधर.
- फर्ग्युसन महाविद्यालयात नोकरी.
- विधवेशी विवाह करून उदाहरण ठेवले.

**कर्वे यांच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानावरील काही महत्त्वाचे मुद्दे**

- ज्ञान व सत्याचा अविरत शोध
- काम आणि अभ्यासाप्रती एकनिष्ठा
- सहिष्णुता
- आपुलकी, त्याग, मदत
- ईश्वरावर निष्ठा
- समानतेसाठी लढा.

**शैक्षणिक तत्त्वज्ञान**

- ध्येय- स्वावलंबनाची जोपासना
- पाठ्यक्रम - भारतीय जीवनपद्धतीचे प्रतिबिंब
- शिस्त - कडक शिस्त
- शिक्षकाची भूमिका - शिस्त व आपुलकीचे मिश्रण
- स्त्री शिक्षण - शिक्षणातून स्वावलंबन

♦ ♦ ♦

# ८ब

## डॉ. बी. आर. आंबेडकर
## (१४ एप्रिल १८९१ ते ६ डिसें. १९५६)

**घटक रचना**


८ ब १ प्रस्तावना

८ ब २ जीवनचरित्र

८ ब ३ कौटुंबिक पार्श्वभूमी

८ ब ४ जातीयता

८ ब ५ बुद्धिवान विद्यार्थी

८ ब ६ मॅट्रीक आणि उच्च शिक्षण

८ ब ७ भारतात परत

८ ब ८ मुंबई सामाजिक उपक्रमांचा श्रीगणेशा

८ ब ९ शिक्षण पूर्ती - भारतीय शुद्राचे नेते.

८ ब १० शांतीपूर्वक मार्गाचा स्विकार

८ ब ११ जीवनातील - महत्त्वपूर्ण घटना

८ ब १२ राज्यघटनेचे शिल्पकार

८ ब १३ बाबासाहेबांचे योगदान

८ ब ७ थोडक्यात


## ८ब १ प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आधुनिक भारतीय समाजाला आकार देण्याचे कार्य विसरता येणे शक्य नाही. भारतातील लाखो दबलेल्या समुहातील लोकांना स्वतःबद्दल आदर करण्यात जबाबदाऱ्यांची जाणीव निर्माण करून देण्यात आंबेडकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. समाजातील दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी चांगल्या शिक्षणपद्धतीची गरज आहे. भारतीय राज्यघटनेला आकार देण्याचे कार्य त्यांनी केले. बाबासाहेबांनी भारतात बौद्ध धर्माचा प्रसार केला.

## ८ब २ जीवनचरित्र

भीमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब, यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे भारतीय वकिल, राजकिय नेते, बौद्ध धर्माचे कार्यकर्ते, तत्त्वज्ञानी, विचारवंत, इतिहासकार, लेखक, वक्ते, अर्थतज्ज्ञ, संपादक असे अनेक पैलू होते. भारतीय घटनेचे ते शिल्पकार आहेत. एका महार, शुद्र कुटुंबात जन्मास आलेल्या आंबेडकरांनी आपले पूर्ण आयुष्य सामाजिक भेदभाव - चातुर्वर्ण पद्धती आणि जातीय पद्धती जन्मास आली, त्याविरूद्ध लढा दिला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करित उठाव घडवून आणला. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना भारतातील सर्वोत्कृष्ट अशा 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानिले गेले.

अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींवर मात करून ते उच्च शिक्षण घेणारे ते भारतातले पहिले दलित ठरले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून कायदा, आणि लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स मधून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राचे शिक्षण पूर्ण केले आणि भारतात वकिली केली.

भारतीय अस्पृश्यांकरिता राजकिय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य याविषयावरिल त्यांचे लेख प्रसिद्ध झाले. भारतीय बोद्ध भिक्कू आणि इतर बौद्ध धर्मिय त्यांना 'बोधिसत्व' मानतात.

## ८ब .३ कौटुंबिक पार्श्वभूमी

भीमाबाई आणि रामजी आंबावडेकर यांच्या पोटी १४ एप्रिल रोजी १८९१ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडिल, रामजी हे मध्यप्रदेशात सैन्यात अधिकारी होते. त्यांच्या आईने त्यांचे नांव 'भीम' ठेवले. बाबासाहेबांच्या जन्मापूर्वीच संन्यासी असलेल्या त्यांच्या चुलत्यांनी हे मूल जागतिक किर्ती प्राप्त करेल, असे भविष्य वर्तविले. त्यांच्या पालकांनीही त्यांना उत्तम शिक्षण पुरविण्याचा प्रयत्न केला.

## ८ब.४ जातीयता

आपण व आपल्या कुटुंबियांना वेगळी वागणूक दिली जाते हे भीमच्या लक्षात आले. पण त्यामागील कारण त्यास तेव्हा समजले नाही. पण अस्पृश्यास मूर्ख, पापी, बिनकामाचे समजले जाते, हे वाढत्या वयात त्यांनी जाणले.

## ८ब.५ बुद्धिवान विद्यार्थी

उच्च वर्णिय असूनही त्यांच्या शिक्षकांना भीमचा लळा होता. त्यांनी भीमला चांगले कार्य, अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. एवढेच नाही तर स्वतःच्या घरी भीमला जेवायला बोलविण्याची त्यांच्या कृतिने उच्चवर्णियांनी भुवया उंचावल्या. त्यांच्या शिक्षकाने भीमचे आडनाव बदलून 'आंबेडकर' हे स्वतःचे आडनाव त्याला लावले.

सर्वच शिक्षकांचा लाडका बनलेल्या भीमला उच्च प्रतीचे शिक्षण प्राप्त करून द्यावे

अशी विनंती शिक्षकांनी रामजीना केली. रामजीचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाल्याने भीम भारतातील सर्वोत्कृष्ट अशा एल्फिस्टन हायस्कूलमध्ये प्रवेशित झाले. जेव्हा त्यांनी हिंदू धर्मग्रंथांची संस्कृत भाषा शिकण्याची इच्छा प्रकट केली तेव्हा अस्पृश्यतेच्या नावाखाली त्यास विरोध करण्यात आला. त्यांना पर्शियन भाषेचा अभ्यास करावा लागला. परंतु त्यांनी नंतर संस्कृत भाषा स्वतःहून शिकली.

**तुमची प्रगती तपासा**

**जोड्या जुळवा**

| **अ** | **ब** |
|---|---|
| १) चातुर्वर्ण | अ) १४ एप्रिल १८९१ |
| २) बाबासाहेब | ब) हिंदू समाजाचे विभाजन |
| ३)संस्कृत | क) शिक्षकाचे नाव |
| ४)आंबेडकर | ड) हिंदू धार्मिक ग्रंथाची भाषा |

## ८ब ६ मॅट्रीक आणि उच्च शिक्षण

मॅट्रीक ची परीक्षा पास झाल्यानंतर मॅट्रीक होणारा पहिला अस्पृश्य म्हणून त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला गेला. अतिशय कष्टाने त्यांनी इंटरमिजीएट परिक्षा पास केल्यानंतर मात्र रामजीना शाळेची फी भरणे परवडेनासे झाले. एका हितचिंतकाने बडोद्याचे महाराज गायकवाड यांच्याकडे त्याचे नाव सुचविले. आणि महाराजांनी त्याला मासिक शिष्यवृत्ती देऊ केली. त्या जोरावर भीमरावांनी १९१२ मध्ये [illegible]. ची परीक्षा पास होऊन सिव्हील सर्व्हीसेस मध्ये नोकरी मिळवली.

## ८ब ६ अमेरिका आणि इंग्लंडमध्ये शिक्षण

काही हुशार परदेशात पुढील शिक्षणासाठी पाठविण्याच्या बडोद्याच्या महाराजांच्या योजनेत अर्थातच भीमची निवड झाली. पण शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दहा वर्षे बडोदा संस्थांत नोकरी करण्याच्या करारावर त्यांनी सही केली.

१९१३ मध्ये ते जागतिक किर्तीच्या कोलंबिया विद्यापीठात पुढील शिक्षणाकरिता प्रवेशित झाले. अमेरिकेतून अनुभवलेले स्वातंत्र्य आणि समता यांनी त्यांच्या मनावर ठसा उमटवला. ते दिवसातील १८ तास अभ्यास करित. पुस्तकांच्या दुकानांस भेटी देणे त्यांना फार आवडे. त्यांनी केवळ दोन वर्षात अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रात MA ची पदवी प्राप्त करून पुढील वर्षी Phd चे कामही पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश घेतला. परंतू बडोद्याच्या महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्तीचा कालावधी संपल्याने

त्यांना शिक्षण पूर्ण होण्याआधीच लंडन सोडावे लागले.

## ८ब ७ भारतात परत

त्यांना बडोदा संस्थानात नोकरी करण्यास बोलविण्यात आले. त्यांना सिव्हिल सर्व्हिसमध्ये नोकरी देण्यात आली. डॉक्टरेट पदवी प्राप्त आणि उच्च पदावरील नोकरीची योग्यता असूनही त्यांना हिंदू जातीव्यवस्थेचे चटके सोसावे लागले.

## ८ब ८ मुंबई - सामाजिक कार्याची सुरूवात

नोकरीच्या अवघ्या अकराव्या दिवशी त्यांनी मुंबईत परत येऊन लोकांना गुंतवणूकीबाबत सल्ला देण्याचा व्यवसाय सुरू केला. परंतू त्यांच्या जातीविषयी समजल्यावर ग्राहकांची संख्या कमी होत गेली. ते १९१८ मध्ये सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झाले आणि विद्यार्थ्यांमध्ये अतिशय हुशार शिक्षक म्हणून प्रसिद्धही झाले. त्यांनी अस्पृश्यतेविरूद्ध आवाज उठविण्यास 'मूक नायक' हे मराठी वर्तमानपत्र सुरू केले तसेच अनेक कॉन्फरन्समध्येही ते याविषयी मते प्रकट करू लागले.

## ८ब ९ भारतातील अस्पृश्यांचा नेता

अखेर १९२० मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये जाऊन त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि बॅरिस्टर बनले. १९२३ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळविली आणि जागतिक किर्तीच्या संस्थेतून डॉक्टरेट प्राप्त करणारे पहिले भारतीय ठरले.

परंतू भारतातील सामाजिक परिस्थितीत मुळीच बदल झाला नव्हता. अत्यंत हुशार, उच्चशिक्षित बाबासाहेब अस्पृश्यांचे नेते बनले. शिक्षण हे सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी १९२४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत हितकारणी सभेची' स्थापना केली.

अस्पृश्यांमध्ये खरी जागृती व प्रगती शिक्षणामुळेच होणार आहे, हे त्यांनी जाणले.

**तुमची प्रगती तपासा**

१. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे वर्णन करा.

---

---

---

---

## ८ब १० शांततापूर्ण मार्गाने लढा

१९२७ साली कुलाबा जिल्ह्यातील महाड येथील सभेत त्यांनी पुढिल विचार मांडले. समाजातील खालच्या स्तरावरील लोकांना आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीवच नाही. प्रत्येकाने स्वचा आदर करण्यास शिकले पाहिजे.

त्यांनी अनुभविलेल्या अन्यायामुळे इतर कोणीही न्याय मिळवून देऊ शकत नाही, हे

त्यांनी जाणले. सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले करण्यात यावेत अशा आशयाचे बिल मुंबई विधानसभेने पास केला. महाड नगरपालिकेनेही चार वर्षांपूर्वी अशा आशयाचे पत्रक काढून सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले केले. परंतु एकाही अस्पृश्याने ते पाणी वापरण्याची हिंमत केली नाही. सभेनंतर बाबासाहेबांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले आणि त्यांच्या हजारो समर्थकांना त्यांच्या कृतीचे पालन केले. परंतु इतर जातीतील लोकांनी तळ्याचे पाणी अस्पृश्यांनी दुषित केले असा समज पसरवून बाबासाहेबांच्या सभेवर हल्ला केला.

'बहिष्कृत भारत' ह्या मराठी मासिकात त्यांनी नाशिक येथील काळा राम मंदीरात प्रवेश करण्यासाठी अहिंसेच्या मार्गाचा स्विकार करण्याचे आव्हान केले. मंदिराच्या उत्सवात सहभागी करून देण्याचे आश्वासन देऊन नंतर दगडांचे प्रहार करण्यात आले. त्यांनी सत्याग्रह करून हे मंदिर एक वर्ष बंद ठेवले.

## ८ब १० गोलमेज परिषद

म. गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वतंत्र चळवळ घेण्यात आली. भारताचे भविष्य ठरविण्यासाठी १९३० साली ब्रिटीश सरकारने गोलमेज परिषद भरविली.यात बाबासाहेबांनी अस्पृश्यांचे प्रतिनिधीत्व केले. त्यांनी म्हंटले की भारतातील दबलेल्या वर्गानी एकत्र येऊन ब्रिटीश सरकारच्या जागी लोकांनी लोकांसाठी चालिवलेल्या राज्याची स्थापना करावी.

## ८ब ११जीवनातील काही महत्वाच्या घटना

- दादर येथील राजगृह या निवासस्थानी त्यांनी सुमारे ५०,००० पुस्तकांची लायब्ररी केली.
- १९३५ साली मुंबई येथील शासकीय कायदा महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.
- येवला येथील सभेमध्ये अस्पृश्यतेच्या शापातून मुक्त होण्यासाठी त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ते निवडणूक जिंकले आणि त्यांची मजूर मंत्री म्हणून नियुक्ती झाली. मंत्री झाल्यानंतर त्यांच्यात कोणताही बदल झाला नाही. गरीबांसाठीच ते शेवटपर्यंत लढले.
- १९४२ मध्ये त्यांनी ऑल इंडिया शेड्यूल कास्ट फेडरेशनची स्थापना केली.

## ८ब १२ घटनेचे शिल्पकार

दुसऱ्या महायुद्धानंतर बाबासाहेबांनी राज्यघटना तयार करण्यासाठी लोकसभेवर निवड करण्यात आली. त्यावेळी लोकसंख्या असलेल्या भारतात कोणत्या प्रकारचे राज्य हवे यांवर विचार केला. निवडणूक की घ्यावी? लोकांचे अधिकार काय आहेत? त्यासाठी कोणते कायदे करावे लागतील? यासारख्या महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेऊन कायदे करण्यात आले. या सर्व प्रश्नांची उत्तरे राज्यघटनेत आहेत आणि त्यानुसार राज्य चालविणे जाईल.

जेव्हा ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून बाबासाहेबांची निवड झाली. लेकसभेने त्यांच्या अध्यक्षतेखाली कमिटीची स्थापना केली आणि जगातील सर्वात मोठ्या लोकसभेची रचना बाबासाहेबांनी केली.

त्यांच्या कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्रच्या अभ्यासामुळे राज्यघटना लिहिण्यासाठी नियुक्ती झाली. कोणत्याही देशाची राज्यघटना लिहावयाची असल्यास त्यासाठी कायद्याचे, भारतीय इतिहासाचे आणि भारतीय समाजाविषयीचे खोलवर ज्ञान असणे गरजेचे आहे आणि बाबासाहेबांकडे हे सर्व होते.

राज्यघटनेचा मसुदा तयार झाल्यानंतर बाबासाहेब आजारी पडले. ४ नोव्हेंबर १९४८ साली त्यांनी राज्यघटनेचा मसुदा लोकसभेतील सदस्यांसमेर सादर केला आणि २६ नोव्हेंबर १९४९ साली स्विकारली गेली.

**तुमची प्रगती तपासा**

१) बाबासाहेबांच्या घटनेचा शिल्पकार म्हणून भूमिकचे वर्णन करा.

## ८ब १३ बाबासाहेबांचे योगदान

मानव प्रतिष्ठेची स्थापना, स्व-आदर आणि स्वतःचे प्रश्न स्वतः सोडविणे हे त्याच्या जीवन कार्याचे क्षेत्र होते.

१) अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करून त्यांना स्वतःचा आदर व स्वमुक्ती शिकवायची हे त्यांच्या कार्याचे ध्येय होते. त्यांचा पुढील गोष्टींवर विश्वास होता.

- स्वतःस मदत केली पाहिजे / चांगली मदत म्हणजे स्वमदत तंत्र.
- ज्ञानप्राप्ती इतके पवित्र कार्य कोणतेही नाही.
- शरीरास अन्न हे पुरेसे नाही. मानवी मनासही विचारांचे अन्न लागते व प्रत्येकास सांस्कृतिक जीवन जगण्याचा अधिकार आहे.

२) १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारणी सभेची' स्थापना केली तसेच 'बहिष्कृत' भारत हे दैनिक सुरू केले. यातून

- शिक्षणाचा प्रसार करणे
- संस्कृतीचे संक्रमण करणे
- आर्थिक स्थिती सुधारणे
- अस्पृश्यांच्या समस्यांचे प्रतिनिधीत्व केले.
- त्यांनी 'मूक नायक' हे मासिक सुरू केले.

३) 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' मार्फत अनेक शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना

केली. सिद्धार्थ महाविद्यालय, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, मिलिंद महाविद्यालय ही त्यापैकी काही महाविद्यालये. तसेच मतिमंदासाठी विशेष शाळा आणि व्यवस्थापन महाविद्यालय मुंबई येथे सुरू केले.

४) ते घटना लिहिणाऱ्या समितीचे अध्यक्ष होते. दोन वर्षे, अकरा महिने व सतरा दिवसात राज्यघटना लिहिण्याचे काम पूर्ण केले गेले. राज्यघटनेत अनुसुचित जाती, जमाती आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या समाजातील स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी विशेष कलमे समाविष्ट केली.

**तुमची प्रगती तपासा**

१) बाबासाहेबांच्या योगदानाचे वर्णन करा.

## ८ब १४ थोडक्यात

- महु या गावी जन्म १४ एप्रिल १८९१.
- कायद्यातील डॉक्टरेट (कोलंबीया विद्यापीठ) यांनी सन्मान केला.
- कायदेपंडित, तत्त्वज्ञानातील डॉक्टरेट (अमेरिका), शास्त्रातील डॉक्टरेट (लंडन) येथे प्राप्त केली.
- वृत्तपत्राचे संपादक व अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास आणि राज्यशास्त्र या विषयावरील अनेक पुस्तके लिहीली.
- राजकिय पक्ष, महाविद्यालयांची स्थापना
- अस्पृश्यांचे नेते.
- घटनेचे शिल्पकार

♦ ♦ ♦

# ८क

# पंडिता रमाबाई

**घटक रचना**

८ क १ प्रस्तावना

८ क २ जीवनचरित्र

८ क ३ कौटुंबिक पार्श्वभूमी

८ क ४ शिक्षण आणि योगदान

८ क ५ शिक्षणविषयक विचार

८ क ६ थोडक्यात

## ८ क१ प्रस्तावना

पंडिता रमाबाई ह्या विधवांचे शिक्षण व कल्याणाकरिता कार्य करणाऱ्या पहिल्या भारतीय समाजसुधारक होत्या. भारतीय समाजातील अंधश्रद्धा, जातीयता व विधवांना दिली जाणारी अमानवीय वागणूक याविरूद्ध त्यांनी लढा दिला.

## ८ क२ जीवनचरित्र

पंडिता रमाबाई ह्या भारतीय ख्रिश्चन समाजसुधारक होत्या. भारतातील बहुतेक सर्व ठिकाणे इंग्लंड (१८८३), अमेरिका (१८८६-८८) येथे त्यांनी भेटी दिल्या होत्या. त्यांच्या लिखाणापैकी बालवधू व सरकारकडून त्यांना मिळणारी वागणूक या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेणारे `The High caste Hindu Woman' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यांनी स्त्रियांचे प्रश्न विशेषतः विधवा व बालवधूंचे संरक्षण, सती प्रथा इ विषयी मते स्पष्टपणे मांडली.

## ८ क ३ कौटुंबिक पार्श्वभूमी

पंडिता रमाबाई ह्या अत्यंत बुद्धिमान ब्राम्हण कुटुंबात जन्माला आल्या. स्त्रिया शिकल्या पाहिजेत ह्या मताच्या त्यांच्या वडिलांनी पारंपारिक सामाजिक चौकट मोडत रमाबाई व आपल्या द्वितीय पत्नीस संस्कृत लिहिण्या वाचण्यास शिकविले.

१८७४ -७६ दरम्यानच्या दुष्काळात त्यांचे आई - वडिल व बहिण उपासमारीने मृत्युमुखी पावल्या नंतर आपल्या बंधुसोबत प्रवास करत त्या कलकत्त्यास येऊन स्थायिक झाल्या. आपल्या भावाच्या मृत्यूनंतर १८८० साली त्यांनी त्यांच्या पेक्षा खालच्या जातीतील बंगाली वकिल बाबू बिपीन मेधवी यांच्याशी विवाह केला. परंतु त्यांची कन्या केवळ सहा महिन्यांची असताना बाबू मरण पावले.

## ८क.४ शैक्षणिक पार्श्वभूमी आणि योगदान

पंडिता रमाबाईस इंग्लंडमध्ये अभ्यासासाठी शिष्यवृत्ती मिळाली. तिथे त्यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. त्यांनी पारंपारिक भारतीय विचार व ख्रिश्चन विचार यांचा मेळ घालून भारताच्या सुधारणेचा प्रयत्न केला.

अमेरिकेच्या प्रवासाचे वर्णन करणारा अमेरिकेतील लोक व संस्कृतीचे वर्णन करणार `Pandita Ramabai's American Encounter' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. यात भारत आणि अमेरिका येथील स्त्रीयांच्या दर्जाची तुलना केली गेली आहे.

१८८१ रोजी त्यांनी पहिली स्त्रीप्रधान संस्था 'आर्यविद्यामंदीर' ची स्थापना केली.

त्यांनी विशेषतः हिंदू परंपरेत समाविष्ट असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नावर अभ्यास केला आणि त्यांच्या विषयावर शिकविलेसुद्धा.

१८८९ रोजी ' मुक्ती मिशन ' ही संस्था स्थापन केली. आजही ही संस्था विधवा, अनाथ, अपंग, यांना निवास, व्यावसायिक प्रशिक्षण, आरोग्यविषयक शिक्षण ह्या सोयी पुरविते.

## ८क.५ शिक्षणविषयीचे विचार

स्त्री शिक्षण हे स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणेल अशी त्यांची ठाम भावना होती. भारतात त्यांनी सर्वप्रथम किंडरगार्डन पद्धतीचा वापर सुरु केला. आजही शारदा सदन, मनोरमा, मेमोरियल इंग्रजी माध्यम शाळा, अंधविद्यालय, विशेष शाळा या समाजात स्त्री-शिक्षण पुरविण्याचे कार्य करत आहेत. मुक्ती हे स्त्रीयांना व्यावसायिक शिक्षण पुरविते. लहान मुलांसाठी बालवाडी व मोठ्यांसाठी प्रौढ शिक्षण वर्ग समाजात सुधारणा घडविण्याचा प्रयत्न करत आहेत.

### तुमची प्रगती तपासा

१) पंडिता रमाबाईंचे शिक्षण विषयक विचार मांडा.

---

---

---

---

२) पंडिता रमाबाईंच्या शैक्षणिक योगदानाचे वर्णन करा.

---

---

---

---

## ८क ६ थोडक्यात

ज्यावेळी स्त्रियांना मूलभूत शिक्षण घेण्याचा आधिकार नव्हता अशावेळी अपवादात्मक परिस्थितीत पंडिता रमाबाईंनी संस्कृत विषयाचा अभ्यास केला म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव कलकत्ता विद्यापीठाने पंडिता ही पदवी बहाल करून केला.

- त्या समाजसुधारक होत्या
- स्त्री शिक्षणाकरिता १८८२ रोजी आर्य महिला समाजाची स्थापना केली.
- १८८९ रोजी शारदा सदन ची स्थपना केली.
- बायबलचे मराठीत रूपांतर केले.
- स्त्री शिक्षणविषय त्यांच्या कार्याचा गौरव भारत सरकारने पोस्टाचे तिकीट काढून केले.
- १९१९ मध्ये समाज कार्याकरिता केसर - ए - हिंद पदवीने गौरविण्यात आले.

♦ ♦ ♦

# ८ड

# जिद्दू कृष्णमुर्ती (१२ मे, १८९५-१७ फेब्रुवारी १९८६)

**घटक रचना**


८ ड.१ प्रस्तावना

८ ड.२ जीवनपट

८ ड.३ कौटुंबिक पार्श्वभूमी आणि बालपण

८ ड.४ शिक्षण

८ ड.५ शिक्षणविषयक विचार

८ ड.५.१ अध्यापन पद्धती

८ ड.५.१ शिक्षकाची भूमिका

८ ड.६ थोडक्यात


## ८ ड१ प्रस्तावना

जिद्दू कृष्णमुर्ती वा जे कृष्णमुर्ती हे एक सुप्रसिद्ध लेखक आणि तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक विषयाचे वक्ते होते. मनाचे स्वरूप, व्यक्तिव्यक्तिंमधील संबंध, मानसशास्त्रीय क्रांती, समाजात सकारात्मक बदल अशा विषयावर त्यांनी लिखाण केले. परलोक, परमेश्वर, पुनर्जन्म, प्रकृति पुरूष इ. तात्त्विक वादग्रस्त विषय कृष्णमुर्तींनी बाजुला सारून आपले इहलोकीचे जीवन समृद्ध कसे होईल हाच विषय कृष्णमुर्तींनी आपल्या आध्यात्मिक चिंतनाचा केंद्रबिंदू ठरविला.

## ८ ड२ जीवनपट

जे. कृष्णमुर्तींचा जन्म तामिळनाडू राज्यातील मदनपल्ली (जि. चितूर) इथे झाला. एका सामान्य कुटुंबात जन्म घेतलेले कृष्णमुर्ती बालपणापासूनच अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचे तेजस्वी म्हणून ओळखले जात. कृष्णमुर्ती तेरा वर्षाचे असताना त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. अध्यात्मशास्त्राचे जागतिक विद्वान सी. डब्ल्यू. लेडवीटर यांनी त्यांचे चांगले गुण हेरले व ॲनी बेझंट यांच्या मार्फत इंग्लंडला नेले. पुढे कृष्णमुर्तींच्या प्रगल्भ प्रज्ञेस उत्तेजन मिळावे, म्हणून ॲनी बेझंट यांनी 'पूर्वतारक संघ' 'द ऑडर ऑफ द स्टार इन द ईस्ट' ही संस्था १९११ मध्ये स्थापन केली आणि तिच्या प्रचारार्थ 'हेराल्ड ऑफ द स्टार' हे मुखपत्र सुरू केले. संघाच्या प्रमुखपदी त्यांनी कृष्णमुर्तींची नियुक्ती केली. संघाच्या वतीने जगभरात त्यांची प्रवचनं होत.

'पूर्वतारक संघा' चा व्याप वाढत असतानाच कृष्णमुर्तीनी व्यक्तीची उन्नती गुरूमार्फत वा संस्थेमार्फत होत नसते, तर ती व्यक्तीने स्वतःच करून घ्यावयाची असते, असे मत मांडून (१९२८) कोणतीही पुर्वसूचना न देता 'पूर्वतारक संघ' व 'हेरॉल्ड ऑफ द स्टार' वृत्तपत्र या संस्था विसर्जीत केल्या आणि स्वतःच्या मताचा प्रसार -प्रचार करण्यात त्यांनी उर्वरित जीवन व्यतित केले.

कृष्णमुर्तीमनी जे स्वतःला उमगले ते सर्वांना ज्ञात व्हावे म्हणून जगभर भ्रमंती करून असंख्य व्याख्याने दिली, तसेच आपण प्रसृत केलेल्या तत्त्वज्ञानावर आधारित अनेक ग्रंथ लिहीले. त्यांची ग्रंथसंपदा विपुल व मुख्यत्वे इंग्रजी भाषेत आहे. तथापि, 'फर्स्ट अँड लास्ट फ्रिडम' (१९५४) 'एज्युकेशन अँड सिग्निफिक्न्स ऑफ लाईफ' (१९५५), 'कॉमेंटरीज ऑन लिव्हिंग' (तीन मालांत १९५६,१९५९,१९६०) 'द ओनली रिव्होल्यूशन' (१९७०) हे ग्रंथ विशेष गाजले. यांशिवाय त्यांनी विविध ठिकाणी दिलेली व्याख्याने प्रवचने सुमारे पंच्याहत्तर खंडात संग्रहित केलेली असून त्यांतील 'पेंग्विन कृष्णमुर्ती रीडर' हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. तसेच ही भाषणे ध्वनिफिती, दृकश्राव्यफितींच्या सहाय्याने जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. त्यांचे विचार सांगणारी पुस्तके भारतीय व विदेशी भाषांतून अनुवादीत झाली आहेत. त्यांच्या विचारांनुसार व इच्छेनुसार त्यांच्या शैलीचा विचारांचा वारसा चालविण्यासाठी कुठलेही पीठ व शिष्यगण निर्माण झाले नाहीत.

## ८ ड३ कौटुंबिक पार्श्वभूमी आणि बालपण

जीद्द कृष्णमुर्ती हे तेलगु भाषिक ब्राम्हण कुटुंबात जन्मले. त्यांचे वडिल नारीयणिया हे ब्रिटिश सरकारी दफ्तरात कामास होते. जिद्दू हे कृष्णमुर्ती दांपत्याचे १० अपत्यांपैकी आठवे अपत्य होते. आई संजीवम्माचे ते लाडके पुत्र होते. त्यांचे कुटुंब कडक शाकाहरी होते. आपले आठवे अपत्य कृष्मासारखे कोणीतरी मोठे होणार असा दृष्टांत कृष्णमुर्तीच्या आईला होता व म्हणून तिने आपली प्रसुती देवघरात व्हावी असा हट्ट धरला होता असे म्हणतात. पुढे संजीवम्माची अपेक्षा सफल झाली असे म्हणता येईल. त्यांचा जन्म आंध्र प्रदेश जिल्ह्यातील चितुर शहरातील माधमपल्ले या गावी १२ मे १८९५ साली झाला.

१९०३ साली त्यांचे कुटुंब कुडप्पा मध्ये स्थायिक झाले. त्याला हिवतापाचा आजार जडला तो फार दीर्घकाळ टिकला. त्याला शाळेत शिकणे आवडत नसे. त्याला निसर्गसौंदर्याचे कमालीचे प्रेम व आकर्षण वाटत असे. निसर्गातील सुंदर देखावे तो तन्मयतेने पाहात असे व देहभानही विसरून जात असे.

वयाच्या अकराव्या वर्षी कृष्णाच्या आईचे निधन झाले. त्यानंतर वडिलांची नोकरी सुटली व कुटुंबाचे फार हाल होऊ लागले. नंतर त्यांच्या वडिलांनी १९०८ साली ॲनी बेझंट थिऑसॉफिकल सोसायटीत नोकरी दिली.

## ८ड.४ शिक्षण

कृष्णमुर्ती आपल्या अड्यार नदीच्या काठी असलेल्या घरापासून रोज ६ मैल चालत मयलापूर येथे शाळेत जात. त्यावेळी थीऑसॉफी चळवळीचे एक थोर अग्रणी लेडबीटर यांना कृष्णाला बघण्याची मानेन नावाच्या गृहस्थाने सूचना केली. कृष्णा अत्यंत कृश, निसःत्व, कुपोषणाने क्षीण बनलेला सामान्य रूपाचा मुलगा त्यांनी पाहिला, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर काहीतरी वेगळा भाव, मुख्यतः निःस्वार्थतेचा भाव व असामान्यत्व जाणवले व तो पुढे कोणीतरी मोठा पुरूष होईल असे त्यांनी मित्रांना सांगितले. लेडबीटर यांना अंतर्ज्ञानाने कृष्णाच्या ठिकाणाची सुप्त शक्ती कळली आणि थिऑसॉफिच्या उपपक्तीप्रमाणे 'भावी गुरू' होण्यासाठी त्यांनी कृष्णाची निवड केली. त्याच्या ठिकाणी आदिभौतिक शक्तींचाही विकास घडून येण्यास त्याला प्रेरणा दिली व शिकविले.

जानेवारी १९१० मध्ये कृष्णाला रीतसर दीक्षा देण्याचा विधी करण्यात आला. नंतर बेझंटबाईंनी कृष्णा व नित्य यांना त्यांच्या वडिलांच्या संमतीने आपल्या ताब्यात घेतले आणि त्यांना वाराणसी येथे नेले व पुढचे प्रशिक्षण देण्यास सुरवात केली. १९१२ साली बेझंटबाईंनी या विषयावर लंडन शहरात व्याख्याने देऊन नवा जगदगुरू लवकरच प्रकट होणार असल्याचे जाहिर केले.

बेझंटबाईचे कृष्णावर निरातिशय प्रेम होते. तोही त्यांच्यावर आईसारखे निस्सिम प्रेम करीत असे. १९११ साली कृष्णा व नित्या हे इंग्लंडला गेले व तेथे कृष्णाने प्रथमच जमावाला संबोधून भाषण केले. १९२२ साली कॅलिफोर्नियामध्ये ओजाई या निसर्गरम्य ठिकाणी रहायला गेले असता नित्याला क्षयाची बाधा होऊन त्यातच त्याचा अंत झाला. त्याच सुमारास कृष्णाची कुंडलिनी शक्ती जागृत झाली व त्याला समाधीचा परमानंदाचा प्रगाढ अनुभव आला आणि सर्व अस्तित्वाशी आपण एकरूप असल्याचा अनन्यसाधारण अनुभव आला.

### तुमची प्रगती तपासा

१) कृष्णमुर्तींच्या शैक्षणिक प्रगतीचे वर्णन करा.

## ८ड.४ शिक्षणविषयक विचार

जे कृष्णमुर्तींच्या मते शिक्षण ही हुशार, तंत्रकुशल व्यक्ती तयार करणारी प्रक्रिया नसून मानवाचा सर्वांगिण विकास शिक्षणातून झाला पाहिजे. सर्वांगिण विकासाची प्रमुक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

**i)** संकटाचा सामना करण्यासाठी ज्ञानाचा विकास करणे.

**ii)** स्वतः विषयी ज्ञानाचा विकास करणे.

**iii)** सर्वांगिण अनुभव पुरविणे.

**iv)** रूढ विचारकल्पनांपासून मुक्ती

**vi)** इतरांचा विचार करणे.

**vii)** ज्ञानप्राप्ती.

वरील बाबींच्या प्राप्तीकरीता त्यांनी काही अध्यापन पद्धती सुचविल्या

## ८ड ५.१ अध्यापन पद्धती

- बालकाचा विचार कसा करावा हे शिकवावे.
- बालकास विचार करण्याचे स्वातंत्र्य द्यावे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करून अध्यापनपद्धती ठरवाव्यात.
- विद्यार्थ्यांना बरोबरीने वागवावे.
- विद्यार्थ्यांसमोर समस्या/प्रश्न मांडून त्यांच्या बुद्धिस चालना द्यावी.
- शिक्षकाने विद्यार्थ्यांना समस्या सोडविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

## ८ड ५.२ शिक्षकाची भूमिका

शिक्षकाने विद्यार्थ्यांना मानसिक शक्ती, कमतरता ओळखण्यास मदत करून त्यांच्यातील शक्तींचा विकास करण्यास वाव द्यावा. याकरीता शिक्षकाने योग्य वातावरण निर्मिती करावी. शिक्षक हा प्रेमळ असावा. त्याने विद्यार्थ्यांमधील सृजनात्मक बुद्धिमत्ता, चिकित्सात्मक विचारक्षमता, इतरांचा विचार करणे, विचार करून निर्णय घेणे या क्षमतांना प्रोत्साहन द्यावे.

## ८ड ६ थोडक्यात

- कृष्णमुर्ती यांचे आयुष्य म्हणजे एक ज्ञानयात्राच होती.
- त्यांनी विचारांचा प्रसार करण्यास भारतात व परदेशात डझनभर शाळा सुरू केल्या.
- या शाळांमधील दहा टक्के जागा ह्या फि भरून शिकणाऱ्यांसाठी होत्या.
- त्यांनी मानवाच्या सर्वांगिण विकासावर भर दिला.

**आपली प्रगती तपासा**

१) जे कृष्णमुर्ती यांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

---

---

---

**संदर्भ**


- मराठी विश्वचरित्र कोश. खंड १ - संपादक -श्रीराम कामत, गोवा, विश्वचरित्र संशोधन केंद्र, २०००.
- यांनी घडवलं सहस्त्रक - संपादक- सुहास कुलकर्णी, पुणे, रोहन प्रकाशन, २००३.
- मराठी विश्वकोश. खंड ४ - संपादक -लक्ष्मणशास्त्री जोशी, पुणे, म.रा.सा.संघ मंडळ, १९७६.


♦ ♦ ♦

# घटक -९
# शिक्षणाची भूमिका
## अ) आर्थिक विकासात ब) राजकीय विकासात क) सामाजिक विकासात

**घटक रचना**

९.० प्रस्तावना

९.अ.१ प्रस्तावना - आर्थिक विकास

९.अ.२ आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्व

९.अ.३ शिक्षण आणि उत्पादनक्षमता

९.अ.४ शिक्षण आणि उत्पन्न

९.अ.५ मानवी भांडवल आणि कुटुंब : शिक्षण आणि कुटुंब

९.अ.६ शिक्षण आणि व्यापार

९.अ.७ आव्हाने

९.अ.८ समारोप

९.अ.९ राजकीय विकासात शिक्षणाची भूमिका

९.अ.१० सामाजिक विकासात शिक्षणाची भूमिका

९.११ सारांश

## ९.० प्रस्तावना

थिओडोर श्यूल्झ ह्यांच्या मतानुसार,‘‘ शिक्षण म्हणजे व्यक्ती मध्ये केलेली गुंतवणूक होय. शिक्षणाच्या माध्यमातून आपण छोट्या मुलात क्षमता विकसित करतो आणि त्या व्यक्तीमध्ये विस्तारित होतात. “ शिक्षण त्याच्या गुणधर्मानुसार, भविष्यातील गरजांकडे लक्ष ठेवते व त्यानुसार व्यक्तीला घडवते, शिक्षणाची भूमिका ही व्यक्तीच्या व समाजाच्या भविष्यातील वाटचालीला मदत करणे, ही असते. म्हणूनच शिक्षणाचे मुख्य कार्य हे त्याच्या १) आर्थिक २) राजकीय आणि सामाजिक विकासातील भूमिकवरून ठरते.

## ९.अ.१ प्रस्तावना - आर्थिक विकास

शिक्षण हे सर्वार्थाने विकासातील एक मूलभूत घटक आहे. मानवी संसाधनात पुरेशी गुंतवणूक केल्याशिवाय कोणतेही राष्ट्र पुरेसा आर्थिक विकास साध्य करू शकत नाही. शिक्षणामुळे माणसांना स्वतःबद्दलचे, तसेच जगाचे आकलन होते. त्यांचे जीवनमान सुधारते

आणि त्याचा व्यक्तीला आणि समाजाला स्पष्ट फायदा होतो. शिक्षणामूळे व्यक्तींची उत्पादनक्षमता आणि सृजनशीलता वाढून, त्यांच्या उद्योजकतेस आणि तांत्रिक प्रगतीस वाव मिळतो. ह्या खेरीज, शिक्षण आर्थिक व सामाजिक प्रगतीत आणि प्रगतीत आणि उत्पन्न - वितरणात महत्वाची भूमिका बजावते.

शिक्षण विकासाचा आधार आहे - त्यावर आपले आर्थिक व सामाजिक स्वास्थ अवलंबून असते. आर्थिक कार्यक्षमता व सामाजिक सातत्याची, शिक्षण ही गुरूकिल्ली आहे. शिक्षण हे कष्टकरी वर्गाची कार्यक्षमता व मूल्ये वाढविण्यास व त्यांना गरिबीरेषेच्या वर उचलण्यास मदत करते. सर्वसाधारणपणे ते कष्टकरी वर्गाची उत्पादनक्षमता व बौद्धिक परिवर्तनशीलता वाढवते. जेथे बदलते तंत्रज्ञान व उत्पादनांच्या पध्दती, ह्या गुणविशेष मानल्या जातात, अशा जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मक सद्य परिस्थितीला तोंड देण्यास, शिक्षण देशाला योग्य बनवते.

## १.अ.२ शिक्षणाचे आर्थिक विकासातील महत्त्व

एकोणीसाव्या शतकापूर्वी, कोणत्याही देशात मानवी संसाधनात पध्दतशीपणे / योजनाबद्ध गुंतवणूक करणे फारसे महत्त्वाचे मानले जात नव्हते. शाळाविषयक, सेवांतर्गत प्रशिक्षण आणि इतर तत्सम गोष्टींमधील गुंतवणूक ही खूप कमी होती. पण ह्या शतकात, नवीन वस्तूंची निर्मिती करण्यासाठी व त्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या नवनवीन पध्दती विकसित करण्यासाठी शास्त्राचे उपयोजन केले गेले आणि तेव्हापासून मूलगामी बदल झाला.

विसाव्या शतकात, शिक्षण कौशल्ये आणि ज्ञानाची प्राप्ती हे व्यक्ती आणि देशाची उत्पादन क्षमता ह्यासाठी फार महत्वाचे व निर्णायक ठरले आहेत.विसाव्या शतकाला मानवी संघटना युग म्हणता येईल. त्याचे कारण असे की, एखाद्या देशाचे राहणीमान दर्शविणारी निर्णायक गोष्ट म्हणजे, तो देश ज्ञान व क्षमता ह्यांच्या विकासासाठी व वापरासाठी, तसेच जास्तीत जास्त जनतेच्या आरोग्यासाठी व शिक्षणासाठी किती परिणामकारक / यशस्वी उपाययोजना करतो.

कोणत्याही देशाने, मानवी संसाधनात गुंतवणूक केल्याशिवाय सतत आर्थिक प्रगती साधलेली नाही. आतापर्यंत झालेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, विविध मानवी संसाधन संचयावर खालील बाबीत भरघोस प्राप्ती झालेली आहे : मूलभूत शिक्षण, संशोधन प्रशिक्षण, कृतीयूक्त शिक्षण आणि योग्य प्रवृत्तीची जोपासना. शिक्षण वितरण महत्वाचे असते. बहुतेक देशात शिक्षणाच्या असमतोल वितरणाचा दरडोई उत्पन्नावर विपरित परिणाम होतो. मानवी संसाधन वितरणाचे नियंत्रण आणि त्याचे कार्याशी संबंधित असे, तपशीलवार 'उपयुक्त वितरण नमुन्याशी' (Asset Allocation Model)

सुसंगत असणे, ह्याचा सर्वसाधारण शिक्षण व दरडोई उत्पन्न ह्यावर परिणाम होतो, तर ह्यात चुक झाल्यास, त्याचा सर्वसाधारण शिक्षणावर नगण्य परिणाम होऊ शकतो. जर व्यक्ती त्यांचे ज्ञान हे स्पर्धात्मक खुल्या बाजारपेठेत वापरू शकल्या नाहीत, तर मानवी संसाधनात केलेल्या गुंतवणुकीचा फारसा फायदा होणार नाही.

जितक्या प्रमाणात ह्या बाजारपेठा मोठ्या व जास्त स्पर्धात्मक असतात, तितक्या शिक्षण व कौशल्ये वापरण्याच्या संधी जास्त असतात.

## ९.अ.३ शिक्षण आणि उत्पादन क्षमता

कोणत्याही देशात, शिक्षणाच्या सोयी ह्या निश्चितपणे देशाचे उत्पादन आणि निर्यात ह्यांच्या पध्दती आणि विकासासाठी निर्णायक ठरतात. तसेच, संपुर्ण प्रणालीच्या दृष्टीने, परदेशी तंत्रज्ञान प्रभावीपणे वापरण्याच्या धारणक्षमतेचा एक महत्वाचा घटक ठरतात. उद. आरोग्य - पोषण आणि प्राथमिक - माध्यमिक शिक्षण हे सर्व खेड्यातील व शहरातील कामगारांची उत्पादनक्षमता, माध्यमिक आणि व्यवसायिक शिक्षण, क्षमता आणि व्यवस्थापकीय कौशल्यांच्या वाढीस मदत करते. उच्च शिक्षणामुळे, मूलभूत विज्ञानाची प्रगती होते, योग्य तंत्रज्ञानाची आयात शक्य होते, उपलब्ध तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग व विकास होतो. माध्यमिक व उच्च शिक्षण हे महत्वाच्या सरकारी संस्था - कायदा, आर्थिक व्यवस्था इ.च्या विकासासाठी मूलभूत ठरते. लहान व मोठ्या दोन्हीही पातळीवरील प्रायोगिक पुरावे, हे परस्पर संबध स्पष्ट करतात. लहान स्तरावरील विविध अभ्यासातून असे दिसून आले आहे की व्यक्तीच्या उत्पन्नातील वाढ ही शिक्षणासाठी खर्च केलेल्या (ज्यादा) वर्षांशी संबंधित असतात - शिक्षणाचा दर्जा जास्त, तर प्राप्ती जास्त.

शेती क्षेत्रातील पुरावे असे दर्शवितात की, सुशिक्षित शेतकरी, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढवतात, तर पारंपारिक पध्दतीचा वापर करणाऱ्यांमध्ये, अपेक्षेप्रमाणेच शिक्षणाचा प्रभाव कमी दिसतो.

शिक्षण हा औद्योगिक जगतातील तांत्रिक क्षमता व तांत्रिक बदल ह्यांवर परिणाम करणारा एक महत्वाचा घटक आहे. फक्त शिक्षण अर्थव्यवस्था बदलू शकत नाही. देशांतर्गत व परराष्ट्रीय गुंतवणूकीचे प्रमाण व दर्जा, धोरणे आखण्याची पध्दती, हेही आर्थिक परिस्थितीचे महत्वाचे निर्णायक घटक आहेत. असे असले तरीसुध्दा मानवी विकासाच्या पातळीचा ह्या घटकांवर परिणाम होतो.

## ९.अ.४ शिक्षण आणि उत्पन्न

सुधारित शिक्षण आणि जास्त उत्पन्न ह्या दोघांत धन संबंध आहे आणि त्यामुळे विकासाच्या वेगाला मदत होते. शिक्षणाचा जसजसा प्रसार होतो, तसतसा कमी उत्पन्न गटातील लोकांना जास्त संधी उपलब्ध होतात.

## ९.अ.५ मानवी भांडवल आणि कुटुंब : शिक्षण आणि कुटुंब

मानवी भांडवल येते कोठून ? मानवी भांडवलात व्यक्तींच्या किंवा राष्ट्रांच्या पातळीवरील यशस्वी गुंतवणूक कशामूळे होते ? हे समजण्यासाठी कुटुंबापासुन सुरूवात करायला हवी. 'कुटुंब' चांगल्या समाजाचा व आर्थिक यशाचा पाया आहे. काळावेळाप्रमाणे कुंटुंब बदलत गेले असले तरीही, आधुनिक अर्थव्यवस्थेतही ते महत्वाचे आहे. मानवी भांडवलाचा विचार करण्यासाठी आपल्याला कुटुंबाचा विचार करायला हवा. कुटुंबाचे लक्ष मुलांवर केंद्रीत

असते आणि उपलब्ध साधनांचा वापर हा मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांच्यात योग्य मूल्ये रूजविण्यासाठी केला जातो. कोणत्याही खुल्या किंवा काही प्रमाणात खुल्या असलेल्या समाजात सुध्दा कुटुंब हे मूल्य रूजविण्याचे / वाढविण्याचे कार्य करते.

कुटुंबामध्ये विविध निर्णय घेतले जातात - उदा. कुटुंबात मुलांची संख्या कमी असावी की जास्त. काही कुटुंबामध्ये, प्रत्येक मुलासाठी जास्तीत जास्त गोष्टी देण्याचा / करण्याचा प्रयत्न केला जातो. राष्ट्राचा जस जसा विकास होतो तसतसा ह्या गोष्टीकडे कल वाढू लागतो. प्रत्येक विकसित देशात हे घडलेले आहे, काही देशांनी तर हे अगदी लक्षणीय कमी वेळात साध्य केले आहे.

जास्त सुशिक्षित पुरूष व स्त्रिया स्वतःच्या व स्वतःच्या मुलांच्या आरोग्यावर जास्त खर्च करतात. व्यक्तीचे आरोग्य व आर्युमर्यादेच्या संदर्भात शिक्षण हा खरोखरच एकुलता एक महत्वाचा असा वैयक्तिक, निर्णायक घटक असू शकतो.

अशिक्षित बेकार चहाच्या टपरीत बसून वेळ फुकट घालवितात. काही धूम्रपान करतात.

शिक्षणामूळे गरिबांचा आहार सुधारतो - फक्त त्यांचे उत्पन्न वाढल्यामुळे व अन्नधान्यावर जास्त पैसे खर्च केल्यामुळे नव्हे, तर योग्य, चांगल्या व सकस गोष्टी निवडल्यामुळे.

## ९.अ.६ शिक्षण आणि उद्योग

काही देशांनी, अध्ययन आणि शिक्षण ह्याच्याशी मुक्तपणा व गुंतवणूक ह्यांची यशस्वी सांगड घातलेली आहे. जेणेकरून ह्याचे एक प्रभावी चक्र बनते. मुक्तपणामुळे शिक्षणाची मागणी निर्माण होते. अध्ययन आणि शिक्षणामूळे देशाचे निर्यात क्षेत्र जास्त स्पर्धात्मक बनते. स्पर्धात्मक वातावरणाशी जुळवून घेऊन, माहिती, ज्ञान आणि क्षमता ह्यावर भर देणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत अशा सुधारलेल्या देशांना कायम त्यांच्या कामगारांची गुणवत्ता सतत सुधारावी लागते, हे आता सर्वमान्य आहे.

## ९.अ.७ संधी, निःपक्षपात, गुणवत्ता आणि वेगवान सुधारणा

निम्नस्तरीय व मध्यम स्तरीय आर्थिक व्यवस्था असलेल्या देशांच्या अर्थव्यवस्था ह्या अतिशय वेगाने सुधारत आहेत. शिक्षणात प्रगती - वाढती पटसंख्या आणि शाळेतील जास्त कालावधी - ह्यामुळे ही शक्य झाली असून, त्यामुळे विकसनशील देशातील गरीबी कमी होण्यास मदत झाली आहे. निःपक्षपातीपणाचा परिणाम विविध प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या गटांवर होतो - ह्यात गरीब, भाषीय व वंशीय अल्पसंख्याक, भटक, विमुक्त, आश्रित, रस्त्यावरील मुले (Street Children) व बालकामगारांचा समावेश आहे. जगातील विविध भागात मुले आणि मुली ह्यांच्यासाठी उपलब्ध शिक्षणाच्या सोयी ह्या वेगवेगळ्या आहेत.येथून पुढील आयुष्यातील लिंगभेदाची सुरूवात होते. क्रांती घडून येण्यासाठी जो वेळ लागतो, तेवढ्या कालावधीत प्रगती खुंटते. ह्या विरूध्द, योग्यवेळी घडलेल्या क्रांतीमुळे गरीबी हटविण्यास व आर्थिक प्रगती घडून येण्यात मदत होते.

## ९.अ.८ निष्कर्ष /सारांश

शिक्षण आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. चांगल्या शिक्षणाशिवाय आर्थिक प्रगती शक्य नाही. संतुलित शिक्षण व्यवस्थेमुळे फक्त आर्थिक व्यवस्थाच नाही, तर उत्पादन क्षमताही सुधारते, दरडोई उत्पन्नही सुधारते. त्याचा परिणाम सुक्ष्म स्तरांवर कुटुंबावर दिसून येतो.

**आपली प्रगती तपासून पहा-१**

१) टिप लिहा : आर्थिक विकासात शिक्षणाची भूमिका.

---

---

---

---

## ९.ब.९ राजकीय विकासात शिक्षणाची भूमिका

आपण आपल्या देशात लोकशाही राज्यव्यवस्था प्रस्थापित केलेली असली तरीही असे खूप वेळा जाणवते की आवश्यक अशी सामाजिक जाणीव (Civic Sense) ची तत्वे आणि लोकशाही नागरिकत्वासाठी आवश्यक गुण आपल्या समाजात नाही. ह्याचे मुलभूत कारण म्हणजे राजकीय जबाबदारी जाणीवेची उणीव, म्हणूनच, ही जाणीव करून देण्यासाठी ‘राजकीय जाणीवेसाठी शिक्षण’ महत्वाचे आहे. राजकीय सुधारणेसाठी शिक्षणाची भूमिका खालील प्रमाणे आहे.

**१. खालील गोष्टींची जाणीव करून देणे :**

- मानवी हक्क, कर्तव्य व त्यांच्यासंबधीच्या संविधानातील तरतूदी.
- कायदा व न्याय.
- सामाजिक समस्या व जबाबदाऱ्या.
- पर्यावरण संरक्षण

**२. खालील गोष्टी निर्माण करणे :**

- चिकित्सक जाणीव
- सामाजिक कौशल्ये
- परिणामकारक निर्णय घेण्याची क्षमता, समस्या सोडविण्याचे सर्जनशील कौशल्य
- राष्ट्रविषयक जबाबदारीची जाणीव व बांधिलकी

**३. राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण**

लोकशाहीसाठी राष्ट्रीय एकात्मता आवश्यक बाब आहे. म्हणूनच राजकीय सुधारणेसाठी शिक्षणाची भूमिका ही विविधतेत एकात्मतेचे मूल्य रूजविणे ही आहे.

म्हणूनच, शिक्षणाला पुर्णत्वाने आणि सतत चालू राहील असा विकास साधण्यासाठी उत्प्रेरकाचे कार्य करायला हवे.

## १.क.१० सामाजिक विकासात शिक्षणाची भूमिका

वैयक्तिक प्रगतीमुळे व्यक्ती स्वकेंद्री बनू शकते. पण वैयक्तिक प्रगतीमुळे सामाजिक विकास साधला गेला पाहिजे. उदा. एखादी व्यक्ती डॉक्टर किंवा अभियंता होणे, ही त्याची वैयक्तिक प्रगती आहे.ही पात्रता प्राप्त झाल्यावर जर त्याने समाजासाठी कार्य केले तर त्यातून सामाजिक प्रगती साधते. नाहीतर, बुध्दीपलायनामुळे (brain-drain) समाजाची हानी होते.

व्यक्ती आणि समाज ह्यातील अपेक्षा आणि आकांक्षा ह्यात जर सुसंवाद नसेल, तर त्यातून मतभेद व ताण तणाव निर्माण होऊन, त्यामुळे प्रगतीला अडथळा निर्माण होईल. म्हणूनच, सामाजिक विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे.

सामाजिक विकासासाठी शिक्षणातून, व्यक्तीच्या मनात, सामाजिक गटासाठी सतत वृद्धिंगत होणाऱ्या सामाजिक निष्ठा व जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. आपल्या सभोवतालचे पर्यावरण सुधारण्यासाठी, भौतिक पर्यावरणासंदर्भात नवीन दृष्टिकोन निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपल्या आधीच्या अनुभवावरून, मानव निर्मित पर्यावरण हे भविष्याला अनुकूल असेल, अशा प्रकारे नियत्रित करण्याची आवश्यकता आहे. सुनियोजित मूल्य शिक्षणातून, योग्य गुण विशेष व्यक्तीत वृध्दीगंत करणे शक्य आहे. म्हणून शिक्षणातून, ज्यांच्या बद्दल अभिमान वाटेल असे स्त्री - पुरूष तयार व्हायला हवेत.

शिक्षणामुळे व्यक्ती समाजात परत परत होणाऱ्या बदलांशी समायोजन साधू शकला पाहिजे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वार्थाने मूल्याधिष्ठित सामाजिक विकास होऊन, व्यक्ती समाजात महत्वाचे / मानाचे स्थान प्राप्त करू शकेल, हे पाहिले जाते. शिक्षणामुळे, एखाद्या संकल्पनेचे बरे व वाईट परिणाम, मतप्रवाह व त्याचे परिणाम ह्याविषयी निर्णय घेण्याच्या तर्कशुध्द दृष्टिकोन तयार होण्यास मदत होते. शास्त्रीय दृष्टिकोनातून, तर्कशुध्द मानवतावादी दृष्टिकोन तयार करणे, ही शिक्षणाची मुख्य भूमिका आहे. शैक्षणिक प्रक्रियेमुळे व्यक्तीला चिकित्सक विचार करण्याची सवय लागते. शिक्षणामूळे, इतरांच्या कार्याबद्दल व त्याच्या उपयुक्ततेबद्दल योग्य जाणीव ठेवण्याचा बौद्धिक प्रामाणिकपणा निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासून पहा - २**

१. टिप लिहा : सामाजिक विकासात शिक्षणाची भूमिका.

२. टिप लिहा : राजकीय विकासात शिक्षणाची भूमिका.

## ९.११ सारांश

**आर्थिक विकासासाठी शिक्षण:**

- व्यावसायिक समतांचा विकास व व्यावसायिक प्रशिक्षण
- व्यावसायिक मूल्यांचा विकास
- उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी मानवी संपत्तीचा विकास
- गुणवत्ता नियंत्रणातून श्रेष्ठता प्राप्ती - ग्राहक जागृतता

**राजकीय विकासासाठी शिक्षण:**

- नागरिकांना हक्क व कर्तव्ये यांची जाणीव करून देणे.

**सामाजिक विकासासाठी शिक्षण:**

- तर्कशुध्द व वैज्ञानिक दृष्टिकोनातून सामाजिक जाणिव निर्माण करणे.

♦ ♦ ♦

# घटक -१०
# प्रात्यक्षिक कार्य

## उद्दिष्टे

ह्या स्वाध्यायामुळे तुम्हाला शिक्षणाच्या विविध संस्थांबद्दल माहिती मिळेल. ह्यातून, तुम्हाला विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक / अशासकीय / नगरपालिकेच्या शाळांची कार्यपध्दती शिकायला / सर्वेक्षण करायला / विश्लेषण करायला संधी मिळणार आहे.

**प्रात्यक्षिक कार्यासाठी सूचना :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने खालीलपैकी कोणत्याही एकाचा अभ्यास करून त्यावर पेपर सादरीकरण करायचे आहे.

२) स्वाध्यायाचा हस्तलिखित किंवा टंकलिखित प्रती दिलेल्या तारखेपर्यंत जमा करायच्या आहेत.

३) स्वतःचा पेपर व्यवस्थित वाचून, तो समजण्यासारखा आहे, तसेच त्यात भाषेच्या, व्याकरणाच्या किंवा टंकलेखनाच्या चुका नाहीत, ह्याची खात्री करून घ्या.

४) तुम्ही केलेल्या कामाच्या (अभ्यासाच्या) आधारावर पेपर सादर करायचा आहे.

**विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डांचा (कमीत कमी दोन) अभ्यास करा. त्यासाठी खालील मुद्दे लक्षात ठेवा.**

- बोर्डाचे नाव
- सुरुवात व ऐतिहासिक पार्श्वभूमी
- नियमावली
- आर्थिक रचना
- अधिकार क्षेत्र / भौगोलिक क्षेत्र
- उद्दिष्टचे व कार्यक्रम
- उपलब्ध अभ्यासक्रम
- प्रवेशासाठी निकष
- अभ्यासक्रम
- अभ्यासक्रमाचे आदान प्रदान

- परिक्षा
- मूल्यमापन पध्दती
- शिष्यवृत्ती
- निरिक्षणे
- निष्कर्ष

**२. अशासकिय संस्थांच्या शिक्षणातील भूमिकेचा अभ्यास (कमीत कमी दोन संस्थांचा अभ्यास)**

- अशासकीय संस्थेचे नाव
- स्थापनेचे वर्ष
- इतिहास
- उद्देश / हेतू
- ध्येय व उद्दिष्ट्ये
- भौगोलिक क्षेत्र
- कार्ये / राबविलेले कार्यक्रम / कार्यक्षेत्र
- कार्यक्षेत्रातील कार्यक्रमांची रूपरेषा

**संस्थेची रचना :**

- गट व त्यांच्या भूमिका
- पदाधिकारी
- मुख्य स्थायी गट
- क्षेत्र गट
- कार्यक्रमाची आखणी आणि निर्णय घेण्याची पध्दती
- समन्वय व नियंत्रण
- संस्थेचे भागीदार
- परिणामकारक कार्यासाठी इतर संस्थांशी संघटन
- साधन सामग्रीची जमवाजमव व पैशाचे स्त्रोत
- पैशाचा विनियोग

## निरिक्षणे - (समर्पकता व कार्ये ह्यांच्या संदर्भात)

- प्रकल्प त्याची उद्दिष्ट्ये साध्य करण्यात यशस्वी झाली आहे का?
- अशासकीय संस्थेच्या (Ngo) मध्यस्थीमुळे नियोजित लाभ घेणाऱ्यांचा सर्वसाधारण स्तर सुधारला आहे का?

- साध्य परिणामावर प्रभाव पाडणारे विविध घटक कोणते ?
- विविध घटकांमध्ये (मुले आणि मुली) ह्यांच्यात मदत समानतेने दिली (वाटली) जातेका ?
- प्रकल्पाच्या निष्कर्षावरून असे म्हणता येईल का की अशा प्रकारची मध्यस्थी इतर ठिकाणी केली तर त्यामुळे जास्त (लोकांना) फायदा मिळू शकेल का ?
- संस्थेसमोरील मुख्य आव्हाने कोणती ?

## निष्कर्ष

**३. महानगरपालिकेच्या शाळेचा अभ्यास:**

- शाळेचे नाव
- स्थापनेचे वर्ष
- इतिहास

**कोणत्याही विद्यार्थ्यांना / समाजाला शाळेचा फायदा होतो:**

- शाळेचा फायदा घेणाऱ्या समाजाची वैशिष्ट्ये,
- विद्यार्थ्यांची सामाजिक - आर्थिक परिस्थिती,
- विद्यार्थ्यांचे खास गट

**शाळेची दूरगामी उद्दिष्ट्ये:**

- शाळेची ध्येये व उद्दिष्ट्ये
- अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन
- दाखला व पटसंख्या सांभाळण्यासाठी धोरणे
- अधिकार व जबाबदाऱ्यांच्या संदर्भातील दृष्टिकोन
- मूल्यमापनाची धोरणे
- व्यवस्थापनाची पध्दती

**शाळेतील कर्मचारी:**

- व्यवस्थापकाची पात्रता
- शिक्षकाची पात्रता
- सहाय्यक कर्मचारी
- विद्यार्थी - शिक्षक प्रमाण
- शिक्षण प्रमाण
- कर्मचाऱ्याची प्रगती व सेवांतर्गत प्रशिक्षण

**भौतिक सामग्री:**

- शाळेचा आकार

- शाळेचे अंदाजपत्रक
- वर्गांचा आकार
- वर्गांच्या कामाच्या वेळा
- वर्गखोलीची जागा
- प्रयोगशाळा व वाचनालय
- संगणक सोयी
- खेळ व करमणूकीच्या सोयी
- शाळेचा परिसर

**शैक्षणिक उपक्रम व कार्यक्रम -**

- महत्वाचे शैक्षणिक उपक्रम
- वेगवेगळ्या (वैशिष्ट्यपूर्ण) विद्यार्थ्यांच्या गटांसाठी उपक्रम
- सहशालेय कार्यक्रम
- अभ्यासात मागास असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व उपचारात्मक उपाय योजना
- नाविन्यपूर्ण शालेय प्रकल्प
- प्रादेशिक / राष्ट्रीय प्रकल्पात सहभाग
- उपक्रमात पालकांचा व समाजाचा सहभाग
- स्वंयमूल्यमापन व नियोजनात्मक कार्यक्रम

**शाळेचे संपादन -**

- गळतीचे प्रमाण
- विद्यार्थ्यांचे प्रादेशिक / राष्ट्रीय पातळीवरील चाचण्या / परिक्षामध्ये संपादन
- विद्यार्थ्यांचे शाळेतील चाचण्यातील संपादन
- राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांत विद्यार्थ्यांचे संपादन
- पालकाचे समाधान
- शाळेला मिळालेली बक्षिसे व राष्ट्रीय पातळीवरील अधिकृत मान्यता

निरिक्षणे     निष्कर्ष

♦ ♦ ♦

## अनुक्रमाणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **घटक -१** | | |
| | भारतातील चालू शैक्षणिक पद्धती | |
| (१अ) | औपचारिक शिक्षणाची कार्ये | १ |
| | भारतातील चालू शैक्षणिक पद्धती- ब | ४ |
| (१ ब) | शिक्षणाचे घटक - विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था. | |
| **घटक - २** | | |
| | शिक्षणाची समान रूपे | |
| | अनौपचारिक आणि न-औपचारिक | ११ |
| **घटक - ३** | | |
| ३ अ) | कुटुंब या संस्थेची शिक्षणातील भूमिका | १३ |
| ३ ब) | शाळा एक शैक्षणिक संस्था म्हणून शिक्षणातील भूमिका | २२ |
| ३ क) | शिक्षणाच्या वाहिन्या म्हणून समुदाय, प्रसारमाध्यमे आणि | |
| | समवयस्क गट यांची शिक्षणातील भूमिका | ३३ |
| **घटक -४** | | |
| | शिक्षणाच्या राष्ट्रीय, राज्यस्तरीय | |
| | व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिका | ५० |
| **घटक ५** | | |
| | शिक्षणाची व्याख्या, स्वरूप, व्याप्ती आणि अर्थ | ७२ |
| **घटक - ६** | | |
| | शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता | ७९ |
| **घटक ७** | | |
| | शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य | ८६ |

**घटक ८**

शैक्षणिक विचारवंतांचे योगदान

८अ महर्षी कर्वे ९१

८ब डॉ. बी. आर. आंबेडकर

(१४ एप्रिल १८९१ ते ६ डिसें. १९५६) ९६

८क पंडिता रमाबाई १०३

८ड जिद्दू कृष्णमुर्ती (१२ मे, १८९५-१७ फेब्रुवारी १९८६) १०६

**घटक -९**

शिक्षणाची भूमिका

अ) आर्थिक विकासात ब) राजकीय विकासात क) सामाजिक विकासात १११

**घटक -१०**

प्रात्यक्षिक कार्य ११८

♦ ♦ ♦

# प्रथम वर्ष कला

# शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका क्र.- १

# शिक्षणशास्त्र परिचय

**डॉ. राजन वेळूकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्राध्यापक-नि-संचालक,
दूर व मुक्त शिक्षण संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक : डॉ. हेमलता चारी**
उपसंचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादन : डॉ. सुनिता मगरे, सहयोगी प्राध्यापक**
शिक्षणशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.

**भाषांतर :**

**श्रीमती पल्लवी एस. तळेकर, व्याख्याता**
एच. जे. अध्यापक महाविद्यालय,
खार (प.), मुंबई - ४०० ०५२

**श्री. के. एन. चौधरी, व्याख्याता**
जयभगवान अध्यापक महाविद्यालय,
कलवा, जि - ठाणे.

**श्रीमती नीला कामत, सहाय्यक प्राध्यापक**
गोखले एज्युकेशन संस्थेचे अध्यापक महाविद्यालय,
परेल, मुंबई - ४०० ०१२.

**श्री. दिपककुमार मा. कलंबरकर, व्याख्याता**
साईनाथ शिक्षण संस्थेचे एच. बी. बी. अध्यापक
महाविद्यालय, वाशी, नवी मुंबई - ४०० ०७३.

**मुळ लेखक :**

**मिस. उषा बोरकर, सहाय्यक प्राध्यापक**
एच. जे. अध्यापक महाविद्यालय,
खार, मुंबई - ४०० ०५२.

**मिस. सुजोना उन्नी, सहाय्यक प्राध्यापक**
अनजुमन ईस्लाम अध्यापक महाविद्यालय,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

**श्रीमती सुप्रिया डेका, सहाय्यक प्राध्यापक**
अनजुमन ईस्लाम अध्यापक महाविद्यालय,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

**डॉ. सराह मॅथ्यू, प्रमुख शिक्षणशास्त्र विभाग**
साठे महाविद्यालय, विलेपार्ले,
मुंबई - ४०० ०५७.

**फेब्रुवारी, २०११, प्रथम वर्ष कला - शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. - १, शिक्षणशास्त्र परिचय.**

**प्रकाशक : प्राध्यापक-नि-संचालक**
दूर व मुक्त शिक्षण संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

अक्षरजुळणी : वरदा ऑफसेट आणि टाईपसेटर्स
अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८.

मुद्रण :

# Syllabus

**Education I (Introduction to Education)**

**4 Lectures / week** **100 marks (50 + 50)**

**<u>Objectives:</u>**

i) To create awareness of the different educational systems in India.

ii) To appreciate the contribution of Educational Thinkers.

iii) To understand the role of education in national development.

iv) To create an interest in the subject.

**TERM -1**

**Unit 1:** Current educational system in India:

A) Functions of formal education

B) Components of formal education - Pupil, Teacher, Curriculum, Educational institution.

**Unit** 2: Parallel forms of education - informal, non formal.

**Unit 3:** Role of agencies of education - Family, School, Peer group, Community, Media.

**Unit 4:** Role of State, National and International agencies of education - D.I.E.T.,S..C.E.R.T., Department of Education, N.C.T.E., N.C.E.R.T, U.G.C., U.N.E.S.C.O.

**Unit 5:** Definition, nature, scope and meaning of education.

**TERM-II**

**Unit 6:** Education for National Integration - a) meaning & need of national integration; b) barriers to national integration-caste, religion, language; c) role of education in promoting national integration.

**Unit7:** Education and International Understanding - need and significance of international understanding, role of education in promoting international understanding.

**Unit 8:** Contribution of Educational Thinkers to education - D.K. Karve, B.R. Ambedkar, Pandita Ramabai, J. Krishnamurthy.

**Unit 9:** Role of Education for i) economic ii) political iii) social development.

**Unit 10: Practical:** Every student is expected to do **any one** of the following and present a paper thereon:

i) A study of different boards of secondary and higher secondary education.

ii) A study of the role of NGOs in education,

iii) A study of a municipal school.

♦ ♦ ♦